# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र

# डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे राजकीय विचार

**(Political Thought of Dr. B. R. Ambedkar)**

**सत्र १ : पेपर ४ (ऐच्छिक)**

(शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०१९

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-१ पेपर ४ (ऐच्छिक)

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ५००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-10-6

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूरशिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ राज्यशास्त्र समन्वय समिती ■

अध्यक्ष - **डॉ. व्ही. एम. पाटील**
आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, रामानंदनगर, जि. सांगली

- **प्रा. डॉ. पी. आर. पवार**
  अधिविभागप्रमुख,
  राज्यशास्त्र विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. मेजर एम. आर. घनवट**
  मुधोजी कॉलेज, फलटण,
  जि. सातारा

दूरशिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे राजकीय विचार**
**एम. ए. भाग–१ : राज्यशास्त्र ऐच्छिक पेपर ४**

## अभ्यास घटकांचे लेखक



| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. आनंदा कांबळे**<br>भोगावती महाविद्यालय, कुरूकली, ता. करवीर, जि. कोल्हापूर | १ |
| **डॉ. सूर्यकांत गायकवाड**<br>समन्वयक, दूरशिक्षण विभागीय केंद्र, सातारा | २, ३ |
| **डॉ. नितीन रणदिवे**<br>समन्वयक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |

■ **संपादक** ■

**प्रा. डॉ. अजितानंद यशवंत जाधव**
४६५/३७ स्वरूप कॉलनी,
कदम बागेसमोर, सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग एक च्या राज्यशास्त्र विषयाच्या ऐच्छिक पेपर क्रमांक ४ सत्र एक साठी 'डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे राजकीय विचार' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे राजकीय विचार यामध्ये डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या विचारांची बौद्धिक आणि सामाजिक-राजकीय पार्श्वभूमी, डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे राजकीय विचार, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक दृष्टिकोन व डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा लोकशाहीविषयक दृष्टिकोन या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. बी. शिंदे यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. रविंद्र भणगे, राज्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. वासंती रासम, मानवविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिरिष पवार व अधिसभा सदस्य डॉ. वसंत पाटील व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. अजितानंद यशवंत जाधव**
४६५/३७ स्वरूप कॉलनी,
कदम बागेसमोर, सातारा

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र**

अध्यक्ष – **प्रा. डॉ. श्रीमती भारती तुकाराम पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. प्रकाश पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अँण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अनिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **डॉ. श्रीमती मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज-४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या विचारांची बौद्धिक आणि सामाजिक–राजकीय पार्श्वभूमी | १ |
| २. | डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे राजकीय विचार | ३९ |
| ३. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक दृष्टिकोन | ५९ |
| ४. | डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा लोकशाहीविषयक दृष्टिकोन | ६१ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक–१

# डॉ.बी.आर.आंबेडकर यांच्या विचारांची बौध्दिक आणि सामाजिक–राजकीय पार्श्वभूमी

## (Intellectual and Socio-Political Backgraund of Dr. B. R. Ambedkar's Thought)

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक (जीवन परिचय)

१.२ विषय विवेचन

१.२.१ डॉ.बी.आर.आंबेडकर यांच्या विचारांची बौध्दिक पार्श्वभूमी

१.२.२ ब्राह्मणेत्तर चळवळ ते डिप्रेस्ड क्लासेस चळवळ

१.२.३ जात व्यवस्थेचे विश्लेषण आणि चिकित्सा

१.२.४ धर्म आणि धम्माचे विश्लेषण

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अध्ययनानंतर आपणांस–

* डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या विचारांची बौध्दिक पार्श्वभूमी समजून घेता येईल.

- ब्राम्हणेत्तर चळवळ ते डिप्रेस्ड क्लासेस चळवळ या चळवळींचा कार्य-उद्देश समजून घेता येईल.
- डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी जात व्यवस्थेचे केलेले विश्लेषण, चिकित्सा व जात निर्मूलनासाठी करावयाच्या कृतीचे आकलन होईल.
- धर्म आणि धम्म यातील भेदाबाबतचे डॉ. बी. आर. आंबेडकरांचे विचार समजून घेता येतील.

## १.१ प्रास्ताविक (जीवन परिचय)

डॉ. बाबासाहेब तथा भिमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल, १८९१ रोजी महू या ठिकाणी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण सातारा येथे झाले. १९०७ साली डॉ. आंबेडकर मॅट्रिक पास झाले. पुढे मुंबईच्या एलिफन्स्टन कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती देऊन त्यांनी आर्थिक सहकार्य केले. १९१२ मध्ये डॉ. आंबेडकर बी. ए. झाले. १९१३ साली ते अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी गेले.

कोलंबिया विद्यापीठाच्या एम.ए.च्या पदवीसाठी त्यांनी 'प्राचीन भारतातील व्यापार' या विषयावर प्रबंध लिहिला. तर 'भारतातील जाती : त्यांची घडण, उत्पत्ती आणि वाढ' या विषयावरील विद्वत्तापूर्ण निबंध मानववंशशाखाच्या परिसंवादात सादर केला. भारतीय समाज रचनेचे विश्लेषण करताना जात हा प्रमुख विषय असल्याचे स्पष्ट करून, भारतातील जात हा विषय सैध्दांतिक स्वरूपात व प्रत्यक्ष व्यवहारात किती गुंतागुंतीचा आहे याची उकल केली. या निबंधाचा निवडक भाग अमेरिकेच्या 'दि अमेरिकन जर्नल ऑफ सोशिऑलॉजी' या समाजशास्त्रातील मासिकाने 'वर्ल्डस् बेस्ट लिटरेचर ऑफ दि मंथ' मध्ये प्रसिध्द केला. ही डॉ. आंबेडकरांच्या अध्ययनाची जागतिक मान्यता होती.

१९१६ मध्येच डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी करताना 'भारतातील राष्ट्रीय नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथ:करणात्मक परिशीलन' या विषयावर प्रबंध सादर केला. या प्रबंधास पुढे पीएच.डी. ही पदवी मिळाली. अमेरिकेतील विद्याभ्यास पूर्ण होताच डॉ. आंबेडकर जुलै १९१६ मध्ये कायदा व अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी लंडनला गेले. लंडनमधील 'ग्रेज इन' मध्ये कायद्याचा अभ्यास करण्यासाठी तर 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अॅन्ड पॉलिटिकल सायन्स' या संस्थेत अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी प्रवेश मिळविला. पण बडोदा संस्थानाकडून मिळत असलेली शिष्यवृत्तीची मुदत संपल्याने डॉ. आंबेडकरांना भारतात परत यावे लागले.

दरम्यान १९२० मध्ये कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रेरणेने 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले. याच कालावधीत माणगांव व नागपूर येथे भरविण्यात आलेल्या अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये डॉ. आंबेडकर सहभागी झाले. पुढे राजर्षी शाहू महाराज यांच्या आर्थिक सहकार्याने लंडनमधून १९२० ते १९२३ या कालावधीत एम्.एस्सी., डी.एस्सी. व कायदा आणि निर्बंधशास्त्र विषयातील बॅरिस्टर ही पदवी मिळविली.

डॉ. आंबेडकर जागतिक पातळीवर उच्च शिक्षण घेत असतानाच भारताच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीचा उहापोह करत होते. १९१९ मध्ये साऊथबरो समितीला कायदेमंडळातील प्रतिनिधीत्वाच्या कायद्याबाबत अस्पृश्य वर्गाची बाजू लेखी निवेदनाने मांडली. राजकीय पटलावर आपली भूमिका मांडता यावी यासाठी 'मूकनायक' या पत्राची सुरुवात केली. डॉ. आंबेडकर व राजर्षी शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली व उपस्थितीत माणगांव परिषद मार्च १९२० मध्ये झाली. तर ३०, ३१ मे व १ जून १९२० ला शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. आंबेडकरांच्या उपस्थितीत नागपूर येथे भारतीय बहिष्कृत समाज परिषद संपन्न झाली. या दोन्ही परिषदा सामाजिक आंदोलनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरल्या. १९२४ मध्ये 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना करून बहिष्कृत समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच समाजाच्या सर्वांगीण सुधारणांसाठी या संस्थेमार्फत कार्य सुरू केले. डॉ. आंबेडकरांनी भारतीय समाज समानतेच्या पातळीवर आणण्याच्या हेतूने हिंदू समाजाला लागलेला अस्पृश्यतेचा कलंक नष्ट करण्यासाठी सामाजिक सुधारणांचा आग्रह धरला. या बहिष्कृत हितकारिणी सभेच्या स्थापनेबरोबर 'बहिष्कृत भारत' हे साप्ताहिक सुरू केले.

मुंबई प्रांतिक विधिमंडळातील ठरावानुसार महाडच्या नगरपालिकेने चवदार तळे अस्पृश्यासाठी खुले केले. पण स्पृश्य समाजाने त्यास विरोध केला. या कायदेशीर न्याय हक्काबाबत डॉ. आंबेडकरांनी मार्च १९२७ ला महाड या ठिकाणी चवदार तळ्याचा सत्याग्रह करून मानवतेचा व समतेचा लढा सुरू केला. डिसेंबर १९२७ च्या दुसऱ्या महाड सत्याग्रहाच्या वेळी हिंदू समाजातील अमानवीय शोषण व विषमतेची मांडणी ज्या मनुस्मृतीने केली. त्या मनुस्मृतीचे दहन महाड या ठिकाणी केले.

नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचा लढा १९३० मध्ये सुरू केला. अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींना नाकारलेल्या मंदिर प्रवेशाच्या विरुध्द हा लढा होता. हा सत्याग्रह हिंदू असूनही मंदिर प्रवेश नाकारणाऱ्या विषमतेविरुध्द होता, म्हणजेच सामाजिक समतेसाठी होता.

भारताला दिले जाणारे वसाहतीचे स्वराज्यासाठी घटना तयार करण्याच्या दृष्टीने भारतातील नेत्यांच्या बरोबर विचारविनिमय करण्याच्या हेतूने ब्रिटिश सरकारने आयोजित केलेल्या तिन्ही गोलमेज परिषदेला डॉ. आंबेडकर हजर राहिले. या परिषदेत भारतीय जनतेच्या स्वराज्यातील अपेक्षा, मागासलेले

समाज, अस्पृश्य वर्ग, स्त्रिया व संस्थानातील प्रजा या घटकांच्या हक्कांबाबत डॉ. आंबेडकरांनी मांडणी केली. अस्पृश्यांच्या स्वतंत्र राजकीय हक्कांबाबत डॉ. आंबेडकरांनी केलेल्या युक्तीवादावर आधारीत, ब्रिटनच्या पंतप्रधानानी 'जातीय निवाडा' १९३२ मध्ये जाहिर केला. या निवाड्याच्या विरोधात म. गांधीजीनी उपोषण केले. त्यामुळे जातीय निवाड्यातील तरतुदीबाबत पुणे कराराने तडजोडी करण्यात आल्या.

हिंदू समाजरचनेत सुधारणा करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश येत नव्हते. या पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांनी १९३५ मध्ये 'येवला' या ठिकाणी धर्मांतराची घोषणा केली. १९३६ मध्ये 'जातीप्रथेचे निर्मूलन' हा ग्रंथ प्रकाशित झाला. १९३६ मध्येच स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना डॉ. आंबेडकरांनी केली. १९३७ च्या मुंबई प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणुकीत डॉ. आंबेडकरांच्यासह स्वतंत्र मजूर पक्षाचे तेरा उमेदवार निवडून आले.

दुसऱ्या महायुध्दाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सरकारने डॉ. आंबेडकर यांची १९४१ मध्ये भारताच्या संरक्षण सल्लागार समितीवर नियुक्ती केली. २० जुलै १९४२ च्या गव्हर्नर जनरलच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळात डॉ. आंबेडकरांनी मजूर व बांधकाम खात्याचे मंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारली, ती १९४६ पर्यंत होय. बांधकाम खात्यामार्फत दामोदर व्हॅली प्रकल्प कार्यान्वीत करून डॉ. आंबेडकरांनी भारताच्या नवनिर्माणाचा पाया घातला. भारतातील दुष्काळावर मात करण्यासाठी 'नदीजोड प्रकल्प' राबण्याची त्याची इच्छा होती, पण ती साकार झाली नाही. १९४२ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाचे विसर्जन करून २० जुलै १९४२ रोजी 'ऑल इंडिया शेड्युल्ड कास्टस् फेडरेशन' या राजकीय पक्षाची स्थापना केली.

डॉ. आंबेडकर १९४६ मध्ये बंगाल विधिमंडळातून संविधान सभेवर निवडून गेले. पण १९४७ मध्ये बंगालची फाळणी झाल्याने त्यांचे संविधान सभेचे प्रातिनिधित्व रद्द झाले. पुढे मुंबई विधिमंडळातून संविधान सभेवर निवडून येऊन १४ जुलै, १९४७ रोजी घटना समितीच्या नोंदवहीत सदस्यत्वाची सही केली. घटना मसुदा समितीने ३ ऑगस्ट १९४७ रोजी ते अध्यक्ष झाले व स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री झाले. घटना समितीमध्ये केलेल्या असामान्य कार्यामुळे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून जग ओळखते. तर केंद्रीय कायदामंत्री पदावरून भारताच्या समाज व्यवस्थेच्या विविध अंगाचे कायद्याद्वारे संहितीकरण करताना, स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तयार केलेले हिंदू कोड बील मंजूर झाले नाही, म्हणून ११ ऑक्टोबर १९५१ रोजी डॉ. आंबेडकरांनी केंद्रीय कायदामंत्रीपदाचा राजीनामा दिला.

१९५४ मध्ये रंगून येथे झालेल्या जागतिक धम्म परिषदेला त्यांनी संबोधित केले. येवला या ठिकाणी केलेल्या धर्मांतराच्या घोषणेप्रमाणे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. अशा महामानवाचे ६ डिसेंबर १९५६ रोजी महापरिनिर्वाण झाले.

## १.२ विषय विवेचन

## १.२.१ डॉ.बी.आर.आंबेडकर यांच्या विचारांची बौध्दिक पार्श्वभूमी

डॉ. आंबेडकरांची जडण-घडण ज्या समाजव्यवस्थेत झाली, त्यातूनच त्यांच्या बौध्दिक विश्वाची निर्मिती झाली असे म्हणावे लागेल. कारण अस्तित्त्वात असलेल्या विषमतावादी समाज व्यवस्थेला मूळापर्यंत जाऊन, समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी सर्व प्रकारची आंदोलने, लिखाण व प्रत्यक्ष संविधान निर्मितीच्या माध्यमातून कायद्याचे संहितीकरण डॉ. आंबेडकर करताना दिसतात.

### ❐ घरातील लष्करी पेशा :-

भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार सुरू झाल्यापासून लष्करी पेशामध्ये सर्वांना संधी मिळू लागली. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांच्या घरातील पूर्वजांनी पारंपरिक गावातील विषम समाजव्यवस्थेच्या बाहेर जाऊन लष्कराच्या नोकरीचा स्वीकार केला. ही बाब त्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची होती. लष्करी कॅम्प मधील समानतेचे व्यवहार त्यांनी अनुभवले. पुढे ज्यावेळी पारंपरिक विषमतावादी समाजाचे अनुभव डॉ. आंबेडकरांना दिसू लागले. त्यांची तुलना होऊन त्या पारंपरिक व्यवस्थेत बदल झाला पाहिजे. ह्या सामाजिक परिवर्तनाच्या जागृतीचे उगमस्थान डॉ. आंबेडकरांना घरातील लष्करी पेशातून मिळाले.

### ❐ रामजींची शिकवण व कबीर पंथ :-

डॉ. आंबेडकरांचे वडील रामजी मिलिटरीतील सुभेदार पदावरून सेवानिवृत्त झाले होते. ते दापोलीला वास्तव्यास असताना रामानंद पंथ व कबीर पंथ या दोन पंथातील वादविवादात सहभागी होत असत. पुढे रामजीनी कबीर पंथाची दीक्षा घेतली. या पंथाच्या रिवाजाप्रमाणे पंथाची बंदगी रामजी दिवसातून दोन वेळा करीत. त्यांच्या ह्या वर्तनाचा घरातील इतर लोकांवर कसा परिणाम झाला हे स्पष्ट करताना डॉ. आंबेडकर म्हणतात. 'आमचे कुटुंब गरीब असले तरी त्यातले वातावरण पुढारलेल्या सुशिक्षित कुटुंबाला शोभेल असे होते. आम्हा भावंडांमध्ये विद्येची अभिरूची उत्पन्न व्हावी व आमचे चारित्र्य सोज्वळ बनावे. यासाठी आमचे वडील रामजी सुभेदार हे अतिशय दक्ष होते.'

रामजींचे वडील मालोजीराव रामानंद पंथी होते. त्यामुळे रामजींनी तोच पंथ पुढे चालवावा असे वाटे. पण हो-ला-हो म्हणणारा रामानंद पंथ न स्वीकारता, स्व-कर्तृत्वाची शिकवण देणाऱ्या कबीर पंथाची त्यांनी दीक्षा घेतली होती. डॉ. आंबेडकरांच्या घरी स्वकर्तृत्वास पोषक असे वातावरण तयार झाले. लहान वयातील भिमराव महाभारत, पांडवप्रताप हे ग्रंथ आपल्याला वाचनास आवडत नाहीत, असे

ते वडिलांना सांगत. त्याऐवजी कबीरांच्या दोह्यातील माणुसकी, समता व कर्तृत्व भिमरावांना खूप आवडे, मोठेपणी सुध्दा ते कबीरांचे दोहे गुणगुणत, त्यामुळे रामजीनी जाणीवपूर्वक स्वीकारलेल्या कबीरपंथाचे महत्त्व डॉ. आंबेडकरांच्या जीवनातील समाज पुनर्रचनेसाठी केलेल्या संघर्षाला पोषक ठरते. डॉ. आंबेडकरावर भागवत धर्मीय संत परंपरेतील उदार विचारांचा प्रभाव होता. भक्ती संप्रदायाची त्यांच्या घरात परंपरा होती.

## ❒ पाश्चात्त्य शिक्षण :-

भिमराव आंबेडकरांनी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात प्रवेश घेतला. कोलंबिया विद्यापीठाच्या एम.ए.च्या पदवीसाठी त्यांनी 'प्राचीन भारताचा व्यापार' या विषयावर प्रबंध लिहिला, तर १९१६ मध्ये 'भारतातील जाती : त्यांची घडण, उत्पत्ती आणि वाढ' या विषयावर मानववंशशास्त्राच्या परिसंवादात शोधनिबंध सादर केला. ज्यामध्ये भारतीय समाजरचनेच्या अत्यंत कठिण अशा जातव्यवस्थेचे विश्लेषण केले. त्याबरोबरच पीएच.डी. करीता 'भारतातील राष्ट्रीय नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथ्थ:करणात्मक परिशीलन' हा प्रबंध सादर केला. हा प्रबंध पुढे पुस्तक रूपाने प्रकाशित झाला. या पुस्तकाला प्रो. सेलिग्मन यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'डॉ. आंबेडकरांनी हाताळलेला हा विषय जगातील विचारवंतांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. कारण ज्यामध्ये निर्माण झालेल्या संघराज्य व्यवस्थांपुढील तो प्रश्न होता. केंद्र व प्रांतिक सरकारांना कोणते कर आकारण्याचे अधिकार असतात. याबाबतचा डॉ. आंबेडकरांचा अभ्यास इतका सखोल व सांगोपांग होता की, अन्य कोणी असा अभ्यास केल्याचे आपणास माहित नाही.'

भारताच्या शिक्षण क्षेत्रातील वर्णव्यवस्थेचे वर्चस्व, शाळांमधील विषमतावादी वातावरण, शिक्षकांचे जातीयपूर्वग्रह दूषित वर्तन, जातीवर आधारित विषय निवडण्याची सक्ती ह्याबाबी डॉ. आंबेडकरांनी भारतात असताना अनुभवल्या होत्या. तर अमेरिकेच्या वास्तव्यात कोलंबिया विद्यापीठातील प्रो. सेलिग्मन, प्रो. सीगर यांच्यासारखे प्राध्यापक भिमरावांच्याबरोबर समतेच्या भूमिकेतून शिकवीत व चर्चा करीत, अशी सर्वस्वी नवीन समाजाधिष्ठित शिक्षण व्यवस्था त्यांच्या अनुभवांस आली. त्याचा खूप व्यापक प्रभाव त्यांच्या बौध्दिक कार्यप्रणालीवर पडलेला दिसतो.

डॉ. आंबेडकरांच्या 'भारतातील जाती : त्यांची घडण, उत्पत्ती आणि वाढ' या प्रबंधातील निवडक भाग समाजशास्त्रातील मासिकाने 'वर्ल्डस् बेस्ट लिटरेचर ऑफ दि मंथ' मध्ये प्रसिध्द केला. ही डॉ. आंबेडकरांच्या बौध्दिक विश्वासाला मिळालेली जागतिक मान्यता होती. कोलंबिया विद्यापीठाच्या मानववंशशास्त्र विभागाच्यावतीने चालत आलेल्या 'सनातनी समाजरचना विरुध्द आधुनिक समाजरचना' यावरील वादविवादामुळे डॉ. आंबेडकरांना भारतीय समाजव्यवस्थेचे सखोल व सूक्ष्म आकलनास मदत झाली. त्यामुळे जातीवरील प्रबंधात पाश्चात्त्य विचारवंत सेनार्ट, नेसफील्ड व

रिजले यांचे सिध्दांत व भारतातील मनूच्या भ्रमाची चिकित्सा करून डॉ. आंबेडकरांनी स्वत:चे विश्लेषण मांडले.

अमेरिकेत शिक्षण घेत असताना डॉ. आंबेडकरांच्यावर दोन घटनांचा विशेष परिणाम झाला. एक म्हणजे अमेरिकेतील राज्यघटनेतील १४व्या घटना दुरुस्तीने निग्रोचे स्वातंत्र्य जाहिर झाले व दोन अमेरिकेतील निग्रोचे थोर सुधारक बुकर ही वॉशिंग्टन यांचा मृत्यू. या घटना सामाजिक पुनर्रचनेच्या दृष्टीने महत्त्वाच्या होत्या. तसेच बर्ट्रांड रसेल या जागतिक कीर्तीच्या विचारवंतांच्या 'प्रिन्सिपल ऑफ सोशल रिकन्स्ट्रक्शन' या पुस्तकाचे परिक्षण डॉ. आंबेडकरांनी १९१८ मध्ये 'जर्नल ऑफ द इंडियन इकॉनॉमिक सोसायटी' या मासिकात प्रकाशित झाले. रसेल यांच्या युध्दाचे तत्त्वज्ञान व मालमत्तेचे  परिणाम या दोन बाबींवर त्यांनी आपले मत व्यक्त करताना, मि. रसेल यांचा काही ठिकाणी गैरसमज तयार झाला असे म्हटले आहे. डॉ. आंबेडकरांनी रसेलच्या काही मतांचा पुरस्कार व काही मतांचे खंडन केले. रसेलच्या चुकीच्या संकल्पनांपासून वाचकांचे रक्षण करण्यासाठी प्रस्तुत परीक्षण केल्याचे डॉ. आंबेडकर म्हणतात. समाजाच्या पुनर्रचनेच्या बाबतच्या रसेल यांच्या मांडणीतील कमतरता नाहीसी करणे म्हणजे या विषयाची जागतिक पातळीवरील मांडणी डॉ. आंबेडकरांनी करणे होय.

अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ, ब्रिटन मधील 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲन्ड पॉलिटिकल सायन्स' आणि 'द ग्रेज इन' या विकसित राष्ट्रातील नामवंत संस्थामध्ये डॉ. आंबेडकरांचे अध्ययन झाले. तसेच जर्मनीतील बॉन विद्यापीठात त्यांना पुढील शिक्षण घ्यावयाचे होते, पण घेता आले नाही. पण काही काळ तेथेही त्यांनी अभ्यास केला. या जागतिक पातळीवरील शैक्षणिक संस्थांचा डॉ. आंबेडकरांच्या बौध्दिक विकासात मोलाचा वाटा आहे.

## ❐ भारतातील सामाजिक व राजकीय जडणघडण :-

भिमराव आंबेडकर १९०७ साली मॅट्रिकची परीक्षा पास झाले. त्यानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. या समारंभात गुरुवर्य कृष्णाजी केळुसकर यांनी स्वत: लिहिलेले गौतम बुध्दाचे चरित्र भीमरावांना भेट दिले. हा प्रसंग त्यांच्या आयुष्यात महत्त्वाचा आहे. कारण बुध्दाचे तत्त्वज्ञान अखिल मानवजातीच्या उत्कर्षाचे व संवर्धनाचे तत्त्वज्ञान आहे, त्याचा प्रभाव भीमराव आंबेडकरांच्यावर पडलेला दिसतो.

१९१९ मध्ये राजर्षी शाहू महाराजांची व डॉ. आंबेडकर यांची मुंबई मुक्कामी प्रथम भेट झाली. ह्या दोन्ही महापुरुषांना समाज पुनर्रचनेचा श्वास होता. मार्च १९२० मध्ये झालेल्या अस्पृश्यांच्या माणगांव परिषदेत शाहू महाराज डॉ. आंबेडकरांना अस्पृश्यांचे उध्दारकर्ते म्हणतात, पण त्याचबरोबर ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील अशी आशा व्यक्त करतात. पुढे डॉ.आंबेडकर ब्राम्हणेत्तर, अस्पृश्य व स्त्रिया

या भारतीय समाजाच्या घटकांच्या सर्वांगीण विकासाची रूपरेषा आखताना दिसतात. या दोघांमध्ये सामाजिक बदलाचे वैचारिक साम्य व कृती करण्याचे धाडस आपल्याला दिसून येते. १९२१ मध्ये शाहू महाराजांना लिहिलेल्या पत्राच्य ाअखेरीस डॉ. आंबेडकर म्हणतात, 'आम्हाला आपली फारच गरज आहे, कारण हिंदुस्थानात जी मोठी चळवळ सामाजिक लोकशाहीच्या दिशेने प्रगती करीत आहे, तिचे आपण आधारस्तंभ आहात' यावरून डॉ. आंबेडकरांची सामाजिक लोकशाहीबाबतची बौध्दिक धारणा पक्की होती हे स्पष्ट होते व तशा प्रकारचे कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या कार्याकडे भारताच्या भावी राज्यव्यवस्थेची रचना म्हणून ते पाहताना दिसतात.

ब्रिटनमधील वास्तव्यात लंडन विद्यापीठाच्या विद्यार्थी संघापुढे १९२३ ला 'जबाबदार सरकारचे दायित्व' या विषयावर निबंध वाचला. तो इतका कडक आणि बोचक होता की, शैक्षणिक क्षेत्रात त्यांच्या या लिखाणाने खळबळ माजली. त्यांच्याविषयी भारतीय क्रांतिकारक म्हणून शंका घेण्यात आली. लंडन स्कूलमधील प्रो. हेरॉल्ड लास्की यांनी डॉ. आंबेडकरांच्या या निबंधाचे कौतुक करून तो क्रांतीकारी असल्याचे भाष्य केले.

१९२४ मध्ये सामाजिक चळवळीच्या अनुषंगाने डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. त्यावेळी बोलताना ते म्हणाले, मी मिळविलेल्या ज्ञानशक्तीच्या उपयोग सर्व अस्पृश्य समाजाच्या चळवळीसाठी करणार आहे. त्यासाठी आपण आखलेल्या अनेक योजना सफल झाल्या, तर अस्पृश्य व स्पृश्य समाजाचा फायदाच होईल. या सभेच्या माध्यमातून लोकांची मानवी हक्कांसाठी लढण्याची तयारी त्यांनी केली. मानवी हक्कांच्या उपभोगाबाबत संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्याच्या अगोदर डॉ. आंबेडकर विचार व कृती करताना दिसतात.

विषमतेने शोषल्या गेलेल्या अस्पृश्य समाजाला खेड्यापासून-शहरापर्यंत सर्वांना एकत्रित करून त्यांना शोषणाविरुध्द बंड करायला उभे करण्यास त्यांनी सुरुवात केली. डॉ. आंबेडकरांना भारतीय समाजाच्या पुनर्रचनेसाठी हिंदू धर्म व्यवस्थेची अमानवी व विषमतावादी तत्त्वे बदलायची होती. यासाठी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करून, मनुस्मृतीचे दहन केले. ज्याने हिंदूधर्माचे पुनरुज्जीवन करता येईल असे त्यांना वाटत होते. नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशाचे आंदोलन करून, हिंदू धर्माचा घटक म्हणून अस्पृश्यांना सुध्दा हिंदूच्या मंदिरात जाण्याचा समान अधिकार आहे. हे प्रस्थापित करू इच्छित होते. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय तत्त्वप्रणालीच्या ध्येयाने संपूर्ण मानव मुक्तीची चळवळ उभारलेली दिसते. या चळवळीच्या कार्यासाठी मूकनायक, बहिष्कृत भारत, समता व जनता यासारखी पत्रके सुरू केली. ज्या पत्रकांनी भारतातील पारंपरिक विषमतावादी रचनेवर कोरडे ओढले, तर मानवतावादाची, लोकशाहीची बीजे रुजवण्याचे कार्य केले.

भारतातील अस्पृश्याच्या हक्काबाबत काँग्रेस नेत्यांची भूमिका सलोख्याची नव्हती. सहा कोटी

अस्पृश्य लोकसमूहाच्या राजकीय हक्कांना स्वतंत्र मान्यता देण्याच्या तयारीत म. गांधीजी नव्हते. अस्पृश्यांना हिंदूधर्माचा एक भाग मानून त्यांच्यात सुधारणा करता येईल असे म. गांधीजींचे मत होते. तर डॉ. आंबेडकर अस्पृश्यांना हिंदूपासून अलिप्त स्वतंत्र राजकीय हक्कांची मागणी करत होते. कारण हिंदूंनी कधीही अस्पृश्यांना माणूस म्हणून जगण्याचे अधिकार दिले नव्हते. यातून गांधी-आंबेडकर विचार संघर्ष झालेला दिसतो. चातुर्वर्ण्य स्थिर ठेवून अस्पृश्यांना पंचमवर्ग म्हणून समाजात स्थान द्यावे अशी म. गांधीजींची मतप्रणाली होती. तर डॉ. आंबेडकर स्वत: अस्पृश्य समाजात जन्मले असल्यामुळे अस्पृश्यांच्या वेदना, दु:ख, दारिद्र्य व दास्य त्यांनी अनुभवले होते. अस्पृश्यता निवारणासाठी त्यांना कोणाची दया नको होती, डॉ. आंबेडकरांना अस्पृश्यांच्या आत्मोध्दाराचे हक्क हवे होते. समाज सुधारणेच्या तत्त्वाचे सार हेच की, उपकारकर्त्याच्या सहानुभूतीतून निर्माण झालेली सुधारणा ही खरी सुधारणा नसते. तर एखादा समाज जेव्हा स्वत:च्या मतस्वातंत्र्यासाठी व हक्कासाठी आग्रह धरतो. तेव्हाच त्याची सुधारणा होते. या तत्त्वानुसार डॉ. आंबेडकरांची अस्पृश्यांच्या उध्दारासाठी 'गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या, म्हणजे तो आपोआपच बंड करील.' ही धारणा ठेवली. त्याच्या या संघर्षात स्वाभिमान, स्वावलंबन आत्मोध्दार ही सूत्रे होती. जी खऱ्या अर्थाने अस्पृश्यांचा आत्मोध्दार करणारी होती.

डॉ.आंबेडकरांच्या संघर्षाच्या भूमिकेतील स्वातंत्र्य, समता व बंधुता ही आदर्श तत्त्वे 'बुध्द आणि त्याचा धम्म' या ग्रंथात सातत्याने येतात. 'फिलॉसॉफी ऑफ हिंदूइझम' या लेखनात हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान 'न्याय' या संकल्पनेच्या आधारे डॉ. आंबेडकरांनी तपासले आहे. न्याय म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुता हे स्पष्ट करून, त्याच्या आधारेच धार्मिक तत्त्वज्ञानाचे मूल्यमापन केले पाहिजे असे त्यांनी म्हटले आहे. 'राज्ये आणि अल्पसंख्यांक' व भविष्यात होऊ घातलेल्या रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाच्या कार्यक्रमामध्ये व्यक्ती स्वातंत्र्य, समान न्याय, समान संधी आणि भीतीयुक्त समाजाची निर्मिती ही उद्दिष्ट्ये डॉ. आंबेडकरांनी मांडली होती. 'ॲन्हिलेशन ऑफ कास्ट' या ग्रंथातही जातीव्यवस्थेच्या निर्मूलनाची मांडणी करताना, स्वातंत्र्य, समता व बंधुभावाची व्यापकचर्चा पहावयास मिळते. त्यांच्या धर्म, चिंतन, समाज चिंतन, तत्त्व विचार आणि राजकीय विचारांमध्ये ही तत्त्वे समाविष्ट आहेत.

धर्म, अर्थ आणि सामाजिक प्रतिष्ठा या सत्तेच्या आणि विषमतेच्या उगमस्थानांची चिकित्सा करून धार्मिक, सामाजिक, आर्थिक अशा शोषणाच्या सर्व अंगावर हल्ले करून, स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांच्या आधारावर नवसमाज उभारणीचे ध्येय डॉ. आंबेडकरांनी समोर ठेवले होते. या सर्वांसाठी राजकीय विचार प्रणाली म्हणून सामाजिक-लोकशाहीची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली होती. डॉ. आंबेडकरांची स्वत:ची लोकशाहीची व्याख्या मांडली. 'ज्या सरकारी पध्दतीमध्ये लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतीकारी स्थित्यंतरे रक्तपाताशिवाय घडवून आणता येतात, ती लोकशाही होय.' यावरून स्पष्ट होते की, डॉ. आंबेडकरांची राजकीय लोकशाहीची संकल्पना कल्याणकारी

राज्याची असून, ती सामाजिक लोकशाहीच्या भक्कम पायावर आधारलेली आहे. स्वातंत्र्य, समता, बंधूता या तत्त्वावर आधारित लोकशाहीमध्ये राजकीय, सामाजिक व आर्थिक न्याय मूल्यांची जपणूक डॉ. आंबेडकर करतात.

१९३० मध्ये दलित रेल्वे कर्मचारी सभेत बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले, मजूरांचे दोन शत्रू आहेत. (१) ब्राम्हणवाद (२) भांडवलवाद होय. कारण हे दोन घटकच भारतातील सर्व प्रकारच्या विषमतेला कारणीभूत आहेत. ब्राम्हणवाद म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुता यांना नाकारले जाणे. हे फक्त ब्राम्हणांनाच लागू नाही, तर त्यांनी सुरू केलेल्या ह्या गोष्टींत सहभागी होणाऱ्या सर्वजणांना ते लागू होते. म्हणजेच ज्या ठिकाणी स्वातंत्र्य, समता व बंधुता नाकारली जाते, त्या ठिकाणी ब्राम्हणवाद कार्यरत असतो. भारतीय समाज व्यवस्थेतील ब्राम्हणवाद व भांडवलवाद या दोहोंचे शोषण करणे हेच कार्य आहे. या शोषणाच्या विरुध्द लढण्यासाठी मार्क्सच्या मार्गाचा प्रभाव त्यांच्यावर होता. पण या दोन घटकांच्या विरुध्द लढताना ब्राम्हणवादाशी लढायचे तर जातींचा पाठिंबा पाहिजे व भांडवलवादाशी लढायचे तर वर्गाचा पाठिंबा पाहिजे. या पातळीवर मार्क्सच्या वर्गीय संघर्षाची मर्यादा स्पष्ट होते. कारण भारतात जातीच्या विषमतेचा प्रश्न शिल्लक राहतोच. ब्राम्हणवाद व भांडवलवाद यांच्या विरोधात लढताना एकाच संकल्पनेचा सर्व समाजाकरिता कसा उपयोग करूनघेता येईल. या प्रयत्नात डॉ. आंबेडकरांना एक उत्तर सापडते ते म्हणजे बौध्द धम्महोय. यातून जातीचा प्रश्न सुटणार होता, तसेच तो आर्थिक शोषणावरचा उपायही होता. या बाबी प्रत्यक्षात उतरविताना त्यांनी राज्यसमाजवादाचा आग्रह धरलेला दिसतो. राज्यातील गरिबी नष्ट करण्याचा उपाय म्हणजे राज्यातील संपत्तीचे पुनर्वाटप होय. शेवटी भांडवलवादात घुसलेली अनैतिकता डॉ. आंबेडकरांना जाणवायला लागली व त्यातून त्यांनी 'नैतिक अर्थशास्त्राची' गरज प्रतिपादन केली.

भारतीय समाजव्यवस्थेची पुनर्रचना करण्याचे ध्येय समोर ठेवून केलेली सामाजिक लढ्याची मांडणी, वैचारिक व आंदोलनात्मक सर्व प्रयत्न, भारतीय संविधानाची निर्मिती आणि अखेरीस बौध्द धम्माचा स्वीकार या सर्व टप्प्याचा विचार करता डॉ. आंबेडकरांच्या बौध्दिक विश्वावर लक्षवेधी प्रभाव गौतम बुध्द, संत कबीर आणि महात्मा जोतीराव फुले यांचा होता. आकाशवाणीला दिलेल्या मुलाखतीत डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधानात समाविष्ट केलेली स्वातंत्र्य, समता व बंधूता ही वैश्विक मानवतावादी मूल्ये बुध्द तत्त्वज्ञानातून घेतल्याचे सांगितले. धर्मचिकित्सा व समतेच्या लढ्याची तत्त्वे आणि मार्ग म. जोतीराव फुले यांच्या विचारातून, तर समाजवादी संत कबीर यांच्या विचारातून समतेची व बंधूभावाची तत्त्वे स्वीकारली. बुध्द, कबीर आणि फुले यांना डॉ. आंबेडकरांनी आपले गुरू मानून, भारतीय समाजव्यवस्थेची पुनर्रचना मानवतावादी मूल्यांवर आधारीत बनविण्यासाठी स्वत:ची भूमिका जगासमोर ठेवली. इतकेच नाही तर विचारांशी आणि तत्त्वांशी एकनिष्ठ असणाऱ्या या महामानवाने आपली दैवतेसुध्दा विचार आणि संस्काराचीच मानली

ती म्हणजे प्रज्ञा, शील, करूणा होय. या सर्व पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकरांचे जागतिक कीर्तीचे व्यक्तीमत्त्व विकसित झालेले दिसून येते.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-१

❐ **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. रामजींनी कोणत्या पंथाची दीक्षा घेतली होती?

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानववंशशास्त्राच्या परिसंवादात कोणता शोधनिबंध सादर केला?

३. ब्रिटनमधील कोणत्या दोन शिक्षण संस्थेत डॉ. आंबेडकरांनी शिक्षण घेतले?

४. माणगांव परिषदेत राजर्षी शाहू महाराज कोणती आशा व्यक्त करतात?

५. डॉ. आंबेडकरांच्या मते, भारतातील सर्व प्रकारच्या विषमतेला कारणीभूत असणारे दोन घटक कोणते?

## १.२.२ ब्राह्मणेत्तर चळवळ ते डिप्रेस्ड क्लासेस चळवळ

ब्राम्हणी धर्म व वर्चस्वातून निर्माण झालेले शोषण, विषमता यांच्याविरुध्द ब्राम्हणेत्तर वर्गाने केलेली चळवळ म्हणजे ब्राम्हणेत्तर चळवळ होय. ब्राह्मणेत्तर चळवळीची सुरुवात महाराष्ट्रातून झाली. ब्राम्हणी धर्म वर्चस्वाला विरोध करण्याचे धाडस ब्राम्हणेत्तर वर्गामध्ये शिक्षणाने आले. ब्रिटिश सरकारने भारतात शिक्षणास सुरुवात केल्यामुळे, येथील पिढीला प्रथमच भौतिक प्रगतीचे ज्ञान झाले. भारतातील वरिष्ठ जातींनी निर्माण केलेले भ्रम त्यांना समजू लागले. त्यामुळे या नवीन शिक्षित वर्गाने सामाजिक सुधारणांना सुरुवात केली. वृत्तपत्रे व ख्रिस्ती धर्म प्रसारकांच्या कार्यामुळे नवीन पिढी विचार करू लागली.

या नवीन पिढीला पाश्चात्त्य संस्कृती, भौतिक प्रगती, उदारमतवाद, स्वातंत्र्य, समता, मानवता या आधुनिक विचारांचे ज्ञान झाले. त्यामुळे ते धार्मिक व सामाजिक व्यवस्थेची चिकित्सा करू लागले. त्यातून सामाजिक सुधारणांना चालना मिळाली. भारतीय समाज जातीमध्ये विभागलेला असून, जातीबंधनानी जखडलेल्या या समाजातील कनिष्ठ जातींना मानवतेचे अधिकारसुध्दा उपभोगता येत नाहीत. या वास्तवाची जाणीव नवशिक्षित पिढीला झाली. ब्राम्हण धर्माने सामाजिक व धार्मिक जीवनात तयार केलेल्या अनिष्ठ प्रथा, परंपरा व अंधश्रध्देमुळे समाजाची अधोगती व नैतिक अध:पतन झाल्याचे नवशिक्षीत पिढीला समजू लागले. त्यातून धार्मिक व सामाजिक परिवर्तनाची आवश्यकता जाणवू लागल्याने ब्राम्हणेत्तर चळवळ उदयास आली.

## ❒ महात्मा जोतिबा फुले

महाराष्ट्रात पाश्चात्त्य शिक्षणामुळे नवीन दृष्टी प्राप्त झालेल्या महात्मा जोतिबा फुलेंनी ब्राम्हण वर्चस्वाच्या विरोधी बंड पुकारले. फुलेंचे व्यक्तिमत्त्व प्रयोगप्रवण व विकसनशील असल्यामुळे त्यांनी समाजव्यवस्थेतील वाईट प्रथा, परंपरांचा अन्वयार्थ लावला. त्या घटनांच्या मुळाशी जावून चिंतनशीलतेने त्यावर उपाय ठरणारी कृती केली. ब्रिटिशांकडून होणारा शिक्षण प्रसार सुध्दा कसा मर्यादित वर्गापुरता आहे व तोच वर्ग आर्थिक प्रगतीकडे कशी वाटचाल करतो याचे स्पष्टीकरण ब्रिटिश सरकारला हंटर आयोगासमोरील साक्षीने दिले. सर्व बहुजन वर्गाच्या सामाजिक व आर्थिक विकासाला पोषक ठरेल, अशा सर्वव्यापी शिक्षणाची गरज महात्मा फुलेंनी ओळखली होती. त्यामुळेच १८४८ साली मुलींची पहिली शाळा फुलेंनी सुरू केली. कारण अर्थव्यवस्थेने स्त्रियांना बंदिस्त करून त्यांची स्थिती पशूहूनही वाईट केली होती, तिचा उद्धार करावयाचा असेल, तर तिला शिक्षण दिले पाहिजे. हे महात्मा फुलेंनी ओळखले व मुलींच्यासाठी शाळा सुरू केली. तसेच जातिभेदाने अस्पृश्यांची स्थिती अतिशय अमानवीय केली होती. उच्चवर्णीयांकडून अस्पृश्यांना हीन वागणूक दिली जात होती. अस्पृश्यवर्ग हा सामाजिक, आर्थिक, धार्मिक असे सर्व अधिकार हिरावून घेतलेला वर्ग होता. अस्पृश्यांना या गुलामगिरीची जाणीव व्हावी म्हणून त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य महात्मा जोतिबांनी हाती घेतले. १८५२ मध्ये अस्पृश्यांसाठी वेताळ पेठेत स्वखर्चाने शाळा सुरू केली. महात्मा जोतिबा फुलेंनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून, उच्चवर्णीय जातींवर टीका केली, जातव्यवस्थेतील त्यांचा दांभिकपणा उघड केला. तसेच शूद्रांनी आपल्या उन्नतीसाठी शिक्षण संपादन करण्याचा संदेश त्यांना दिला. ब्राम्हणांकडून शूद्रातिशूद्राची फसवणूक कशी होते हे समजण्यासाठीच हा ग्रंथ लिहिल्याचे जोतिबा सांगतात.

## ❒ सत्यशोधक समाज

महात्मा जोतिबा फुले ब्राम्हणेत्तर समाजातून सामाजिक सुधारणासाठी पुढे आले होते. बहुजन समाजाला आपल्या सामाजिक कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी व शूद्रातिशूद्रांची स्थिती सुधारण्यासाठी महात्मा जोतिबा फुलेंनी १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. 'सर्वसाक्ष जगत्पती। त्याला नकोच मध्यस्थी।' हे ब्रीद वाक्य धारण करून, धार्मिक, सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हे मुख्य उद्दिष्ट सत्यशोधक समाजाचे होते. सत्यशोधक समाजाने निर्मिकाची पूजा करताना पुरोहिताला मध्यस्थ म्हणून घेणार नाही अशी शिकवण बहुजण समाजाला दिली. कारण हे पुरोहित मतलबी ग्रंथांच्या आधारे शूद्रातिशूद्राना नीच मानून लूटत आहेत याची जाणीव करून देणे व समाजात समता, बंधूता, स्वातंत्र्याचे विचार रुजविण्यासाठी सत्यशोधक समाज स्थापन केला होता. 'सर्व मानवप्राणी एकाच देवाची लेकरे आहोत. सबब, ती माझी भावंडे आहेत. अशा बुध्दीने मी त्यांच्याशी वागेन. परमेश्वराची पूजा, भक्ती

अगर ध्यानधारणा करतेवेळी, अगर धार्मिक विधीच्यावेळी मी मध्यस्थाची गरज ठेवणार नाही. मी माझ्या मुलामुलींना सुशिक्षित करीन! अशी शपथ घेणाऱ्या कोणत्याही जाती-धर्माच्या लोकांना या समाजाचे सदस्य होता येते. त्यामुळे सर्वांना समानतेच्या पातळीवर आणणारी अशी सत्यशोधक समाजाची तत्त्वे होती.

ब्राम्हणेत्तर चळवळीच्या नेत्यांनी बहुजन समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा विचार केला आसक्त, तरीही चळवळ प्रामुख्याने पुरोहित वर्गाच्या विरुध्द होती. निर्भिक आणि आपण यात मध्यस्थांची आवश्यकता नाही. तर आपले धार्मिक विधी आपण करावे या हेतूने 'सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकांसह सर्व पूजाविधी' ही पुस्तिका त्याने प्रकाशित केली. पण महात्मा फुलेंचा १८९० मध्ये मृत्यू झाल्यानंतर सत्यशोधक समाजाच्या कार्याचा प्रभाव हळूहळू कमी होत गेला.

## ❐ राजर्षी शाहू महाराज

महात्मा फुलेंच्या कार्याने प्रभावित होऊन राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या जनतेवरील धार्मिक व सामाजिक अन्याय नष्ट करण्याचा प्रयत्न केला. कोल्हापूर संस्थानातील वेदोक्त प्रकरणाने ब्राम्हणेत्तर समाजात असंतोष निर्माण झाला. साहजिकच या काळात ब्राम्हणेत्तर समाज संघटित होऊ लागला.

दरम्यानच्या काळात १९१७ मध्ये ब्रिटिश सरकारने साम्राज्यांतर्गत स्वराज्य देण्याची घोषणा केली. या घोषणेतील राजकीय हक्क मिळविण्यासाठी ब्राम्हणेत्तर समाजाने चळवळ उभारली. या पार्श्वभूमीवर ब्राम्हणेत्तर चळवळीचा उदय असला तरी. सत्यशोधक चळवळ व वेदोक्त चळवळीचा त्यात मिलाफ घडून आला. महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचे शाहू महाराजांनी पुनरुज्जीवन केले. पण बदलत्या काळाबरोबर चळवळीतही बदल घडून आले. म. फुलेंच्या काळातील सत्यशोधक चळवळीत शूद्रातिशूद्रांची संख्या जास्त होती. मात्र राजर्षी शाहूंच्या काळात जैन, लिंगायत, कायस्थ प्रभू अशा विविध जातीधर्माचे लोक त्यात सहभागी झाले. ब्राह्मणेतर चळवळ सुरू करण्यात राजाराम शास्त्री भागवतांची भूमिका महत्त्वाची होती.

स्वाभाविकच पुढे जेव्हा ब्राम्हणेत्तर चळवळ सुरू झाली. तेव्हा ही सर्व मंडळी सत्यशोधक समाजाच्या कार्याबरोबर ब्राम्हणेत्तर चळवळीत सहभागी झाली. महाराष्ट्रातील सर्व सत्यशोधक कार्यकर्ते ब्राम्हणेत्तर चळवळीत होते, पण ब्राम्हणेत्तर चळवळीचे सर्व कार्यकर्ते हे सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते नव्हते. ही बाब विचारात घेतली पाहिजे; ब्राम्हणेत्तर चळवळ मॉन्टेग्यू साहेबांच्या घोषणेचा हिंदूस्थानच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रात होणाऱ्या परिणामांच्या खातर उदयास आली होती. साम्राज्यांतर्गत स्वराज्यामध्ये मिळणारे अधिकार ब्राम्हण वर्गाच्या हातात पडतील व त्या अधिकारांच्या जोरावर ब्राम्हणशाही अधिकच प्रबळ होईल. अशी प्रबळ बनलेली ब्राम्हणशाही बहुजन समाजाच्या प्रगतीमधील

अडसर ठरेल अशी भीती ब्राम्हणेत्तर नेत्यांना वाटत होती. याला शह देण्याच्या हेतूने ब्राम्हणेत्तर समाजामध्ये राजकीय जागृती निर्माण करून, राजकीय हक्कांसाठी संघर्ष करण्याच्या हेतूने ब्राम्हणेत्तर चळवळ कार्य करीत होती. महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर समाजाने स्वत:च्या हितरक्षणार्थ स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. तर ब्राह्मण वर्ग या मागणीला मौन स्वीकारून पाठिंबा देईल. अशी भूमिकाब्राम्हण वर्गाने घेतली. पण अवघ्या दोन महिन्यात ही भूमिका बदलून ब्राम्हणेत्तरांच्या मागणीची कुचेष्टा करण्यापर्यंत ब्राम्हण वर्गाची मजल गेली. त्यामुळे ब्राम्हणेत्तर चळवळ आक्रमक झाली. या काळात राजर्षी शाहू महाराजांना या चळवळीचे नेतृत्व करणे आवडले असते, पण संस्थानिक म्हणून त्यांच्यावर काही मर्यादा होत्या. ऑक्टोबर १९२० मध्ये शाहू महाराजांच्या पुण्यातील सभेत विरोधकांनी दंगल केल्यावर, ब्राम्हणेत्तरांच्या सभांमध्ये सहभागी होण्यास शाहू महाराजांना ब्रिटिश सरकार प्रतिबंध करू लागले. पण ब्राम्हणेतर समाजाच्या हितरक्षणाचे कार्य त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. त्यामुळे शाहू महाराज कधी प्रत्यक्ष, तर कधी अप्रत्यक्ष ब्राम्हणेत्तरांच्या सभांमध्ये सहभागी होत असत. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या अखेरच्या काळात ब्राम्हणेत्तर चळवळीची सूत्रे आपल्या हाती घेऊन चळवळीचे संचलन केले.

नव्या कायद्यात स्वतंत्र मतदारसंघ मिळाले नाहीत. पण राखीव जागा मिळाल्या. या राखीव जागांवरून निवडून आलेल्या ब्राम्हणेत्तर सदस्याचे कामकाज पाहण्याचे भाग्य शाहू महाराजांना खूप कमी मिळाले. कारण १९२२ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात चळवळीची शिस्त पाळायला लावणारा नेता ब्राम्हणेत्तर चळवळीला मिळाला नाही. दरम्यान काँग्रेसमधील टिळकपर्व संपुष्टात येऊन गांधीपर्वाचा उदय झाला. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत सर्व जातीधर्मातील सामान्य माणसांना सहभागी करून घेणे हे काँग्रेसचे सूत्र बनले. त्यामुळे केशवराव जेधेच्या नेतृत्वाखालील बहुसंख्य ब्राम्हणेत्तर कार्यकर्ते काँग्रेसमध्ये सहभागी झाले. तसा महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीचा ऱ्हास झाला.

## ❒ जस्टिस पार्टी

दक्षिणेतील जस्टिस पार्टी ही ब्राम्हणेत्तर चळवळ होती. डॉ. माधवन नायर, सर चेट्टी, मुदलियार, सर शंकरन नायर या जस्टिस पार्टीच्या नेत्यांशी शाहू महाराजांचे घनिष्ठ संबंध होते. ब्राम्हणेत्तरांमध्ये शैक्षणिक जागृती निर्माण करण्याचे कार्य या पार्टीने केले. तसेच राजकीयदृष्ट्या ब्राम्हणेत्तर वर्गाला जागृत केले. जस्टिस पार्टीत मध्यमवर्गीयांचा समावेश अधिक होता. या पार्टीने काँग्रेसच्या ब्राम्हणी वर्चस्वाच्या राष्ट्रीय चळवळीला विरोध केला.

रामस्वामी नायकर यांनी १९२५ च्या दरम्यान स्वाभिमान संवर्धन चळवळीचा आरंभ केला. या चळवळीने ब्राम्हणी श्रध्दा व आचारांवर हल्ले करून, ब्राम्हणेत्तरांमध्ये जागृती निर्माण केली. मूळ द्रविडीयन संस्कृतीचा विध्वंस ब्राम्हणांनी केला हे जाहीर केले. द्रविड संस्कृतीमधील उज्ज्वल घटनांची

मांडणी ब्राम्हणेत्तरांसमोर केली. ब्राम्हणेत्तरांनी आपल्या कोणत्याही प्रकारच्या धार्मिक विधी करण्यासाठी ब्राम्हणाला बोलावू नये याचा प्रचार-प्रसार केला. निरिश्वरवाद, पारंपरिक रूढींना विरोध, जातिनिर्मूलन या बाबींवर दक्षिणेतील ब्राम्हणेत्तर चळवळीचा रोख राहिला.

महाराष्ट्रातील ब्राम्हणेत्तर चळवळीपेक्षा दक्षिणेतील ब्राम्हणेत्तर चळवळ आक्रमक होती. या ब्राम्हणेत्तर चळवळीमुळे शिक्षणाचा प्रसार झाला, त्यामुळे बहुजन समाज राजकीय व सामाजिक जाणीव, जागृती निर्माण झाली. सामाजिक सुधारणांना गती मिळाली. ब्राम्हणेत्तरात स्वत्वाची जाणीव निर्माण झाल्याने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संसदीय लोकशाहीतील राजकीय सत्ता काही प्रमाणात बहुजन समाजाच्या हाती आली.

## ❐ डिप्रेस्ड क्लासेस चळवळ

भारतीय समाजातील अस्पृश्यांच्या उध्दारासाठी काही सामाजिक सुधारकांनी प्रयत्न चालविले होते. पाश्चात्य शिक्षणाने घडविलेल्या प्रबोधन कार्यामध्ये, समाजातील अस्पृश्य घटकांचा विकास घडवून आणल्याशिवाय भारतीय समाजाची प्रगती दुरापास्त ठरेल. या जाणिवेने अस्पृश्यतेच्या रूढीला कारणीभूत असलेल्या जाती व्यवस्थेच्या विरोधात काही सुधारक व संस्थांनी कार्य करण्यास सुरुवात केली. संस्थांमध्ये थिऑसॉफिकल सोसायटी, प्रार्थना समाज, आर्य समाज, सत्यशोधक समाज यांनी जातीप्रथेच्या निर्मूलन कार्याला चालना दिली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी १९०६ मध्ये अस्पृश्यता निवारणाच्या कार्यासाठी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना केली. डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कार्यामुळे, अस्पृश्य समाजातील मुलांना सर्व शाळांमधून प्रवेश दिला जावा, इतरांप्रमाणे अस्पृश्यांनाही शैक्षणिक सवलती मिळाव्यात असा आदेश मुंबई सरकारने काढला. १९१५ मध्ये डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या अध्यक्षपदावरून बोलताना न्यायमूर्ती चंदावरकरांनी स्पष्ट केले की, फक्त शाळाच नाही, तर सर्व सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांसाठी खुली करण्याची मागणी केली. तर अस्पृश्यांवरील अन्याय, अत्याचार व निर्बंध फक्त दूर करून भागणार नाही, तर त्या अन्यायाला, अत्याचाराला व निर्बंधाला कारणीभूत असलेली जातिव्यवस्था नष्ट करणे गरजेचे आहे असा मूलभूत विचार १९१९ च्या अमृतसर परिषदेमध्ये मांडण्यात आला. तसेच 'रिफॉर्मर' या पत्रकातून अस्पृश्यतेची रूढी नष्ट करण्यावर भर देणारे लेख प्रकाशित होऊ लागले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रयत्नांमुळे अस्पृश्यांवरील अन्याय, अत्याचार नष्ट करण्याचे आवाहन करणारा ठराव १९१७ च्या काँग्रेस अधिवेशनात पास करण्यात आला.

अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्याला अधिक गती येण्यास दोन गोष्टी कारणीभूत होत्या. एक अस्पृश्य हिंदूसमाजाचा घटक नाही, त्यामुळे त्यांना वगळून उरलेल्या सवर्ण हिंदूच्या प्रमाणात मुस्लिमांना विधिमंडळात प्रतिनिधीत्व मिळावे असा मुस्लिम लीगने प्रचार चालविला, दुसरे कारण म्हणजे तत्कालीन शिरगणती आयुक्त एडवर्ट गेट यांनी अस्पृश्य समाज हिंदू समाजाहून वेगळा आहे असे विधान केले. या

पार्श्वभूमीवर १९०९ च्या कायद्याने मुसलमानांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व मिळाल्यामुळे अस्पृश्य वर्गाच्या राजकीय आकांक्षा जागृत झाल्या. परिणामी, डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या १९१७ च्या मुंबई अधिवेशनात, अस्पृश्यांवर सामाजिकच नाही, तर राजकीय अन्यायही होतो. याचा राष्ट्रीय काँग्रेसने विचार करावा असे आवाहन करण्यात आले. तसेच भारतीयांना स्वतंत्र प्रतिनिधीत्वाचा अधिकार दिला जाणार असेल, तर अस्पृश्यांनाही तो मिळावा अशी मागणी सरकारकडे करणारा ठराव या अधिवेशनात संमत करण्यात आला. संपूर्ण भारतातील अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या पुढाकाराने 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्स'ची अधिवेशने भरवली जाऊ लागली. या काळात शिक्षणाच्या प्रसाराबरोबर अस्पृश्यांवरील सर्व बंधने आपोआप नष्ट होतील. या विचाराची मर्यादा स्पष्ट होऊन, वर्णाश्रम व्यवस्था नष्ट झाल्याखेरीज अस्पृश्यांना न्याय मिळणार नाही व हिंदूचे संघटनही होणार नाही हा विचार पुढे आला. या काळात अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य पंजाबमध्ये 'अच्छूत सुधार मंडळ', लाहोरमध्ये 'दयानंद दलितोध्दार मंडळ', मुंबईमध्ये 'समाज सुधार मंडळ', 'बहिष्कृत हितकारिणी सभा', दक्षिणेतील 'ब्राम्हणेत्तर चळवळ' यांचे विशेष उल्लेखनीय होते.

अस्पृश्योध्दाराच्या या चळवळीत दोन प्रवाह होते. पहिला प्रवाह डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेने व नेतृत्वाखाली चाललेली चळवळ, दुसरा प्रवाह- मं.गांधीजींच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली चाललेली चळवळ. या दोन्ही प्रवाहाची उद्दिष्ट्ये एकच असले तरी उद्दिष्टपूर्तीची साधने वेगवेगळी होती. डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील चळवळ ही अस्पृश्यांच्या आत्मोध्दाराची चळवळ होती, म. गांधीजींच्या नेतृत्त्वाखालील चळवळ ही अस्पृश्यांना मदतीचा हात देणारी, सवर्णांचे मतपरिवर्तन घडवून आणणारी होती.

१९२० ते १९३० या काळात हे दोन्ही प्रवाह आपआपले कार्य करीत होते. १९३० च्या दरम्यान स्पृश्य समाजाचे मतपरिवर्तन हे फक्त मृगजळ असल्याचा अनुभव डॉ. आंबेडकरांना आला. त्यामुळे सामाजिक बंधने तोडण्यावर शक्ती खर्च करण्याऐवजी, अस्पृश्यांना राजकीय अधिकार मिळविण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. तसेच अस्पृश्य वर्गाच्या उत्थानासाठी योग्य व अपेक्षित कार्य काँग्रेस करत नाही असे दिसून आल्याने डॉ. आंबेडकरांनी काँग्रेस विरोधी आक्रमक भूमिका घेतली व अस्पृश्याच्या राजकीय हक्कांची मागणी ते करू लागले. अस्पृश्यांच्या चळवळीचे नेतृत्त्व करताना, अस्पृश्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जागृत करणे, संघटित करणे, शिक्षणप्रसार करणे, त्यांच्यावरील अन्याय दूर करणे या कार्यक्रमावर डॉ. आंबेडकरांनी भर दिला. अस्पृश्यांच्या प्रश्नांबाबत विचारविनिमय करताना सरकारने आपल्याशी बोलावे अशी आग्रही मागणी डॉ. आंबेडकरांनी केली. अस्पृश्यांवरील अन्यायाबाबत स्पृश्यांमध्येही विचारमंथन व्हावे यासाठी समाज समता संघाची स्थापना करण्यात आली. १९२७ च्या महाडच्या सत्याग्रहामध्ये अस्पृश्यांना, इतर समाजाच्या बरोबरीने हक्क मिळवून देण्याचा निर्धार डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केला. भारतीय समाजातील विषम जातीव्यवस्था मनुस्मृतीवर

आधारलेली असून, त्यामुळेच अस्पृश्यांचे अमानवीय शोषण होते. या विषमतेला, शोषणाला, अत्याचाराला आधारभूत असलेल्या मनुस्मृतीचे दहन करून डॉ. आंबेडकरांनी सामाजिक क्रांतीच्या लढ्याची सुरूवात केली.

डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली अस्पृश्यांना राजकीय जाणीवा प्रगल्भ बनल्या. ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस परिषदेच्या नागपूर येथील अधिवेशनाच्या अध्यक्षपदावरून डॉ. आंबेडकरांनी प्रांतिक विधिमंडळात व शासकीय सेवांमध्ये अस्पृश्यांना पुरेशे प्रतिनिधित्व मिळावे. तसेच संयुक्त मतदार संघात अस्पृश्यासाठी राखीव जागा असाव्यात, अशी मागणी केली. दरम्यान गोलमेज परिषदेसाठी अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. आंबेडकर व श्रीनिवासन यांना ब्रिटिश सरकारने आमंत्रित केले. डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेमध्ये अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. जातीय निवाड्याद्वारे ब्रिटिश सरकारने ती मान्य केली. पण दक्षिणेतील एम.सी.राजा यांनी स्वतंत्र मतदारसंघाला दोन मुद्यावर विरोध केला.

१) जातीय निवाड्यानुसार अस्पृश्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कमी जागा मिळणार.

२) स्वतंत्र मतदारसंघामुळे हिंदू समाजापासून अस्पृश्यांना वेगळे केले जाणार.

यातील पहिला मुद्दा डॉ. आंबेडकरांना मान्य होता. पण दुसऱ्या मुद्यांत काही तथ्य नव्हते. कारण आजपर्यंतच्या इतिहासात अस्पृश्य वर्गाला आपल्यातील एक घटक मानून, त्याला मानवतेची वागणूक हिंदूकडून कधीच मिळाली नव्हती. या पार्श्वभूमीवर अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघाऐवजी संयुक्त मतदारसंघात राखीव जागा ठेवण्याच्या निर्णयाला राजा यांनी मान्यता देऊन राजा-मुंजे करार झाला. पण या कराराला मान्यता देण्यास डॉ. आंबेडकर तयार नव्हते. जातीय निवाड्यातील तरतूदी विरोधात म. गांधीजींनी येरवडा तुरुंगात आमरण उपोषणाला सुरुवात केली. यावर राष्ट्रीय नेत्यांनी डॉ. आंबेडकरांची भेट घेऊन तडजोडीचे आवाहन केले. बराच खल झाल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी संयुक्त मतदारसंघाला मान्यता दिली. प्रांतिक विधिमंडळात एकूण १४८ जागा व केंद्रीय विधिमंडळातील सर्वसाधारण जागापैकी १८ टक्के जागा अस्पृश्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या. याबाबतचा करार म्हणजेच पुणे करार होय. या कराराचा फायदा प्रामुख्याने काँग्रेसला झाला, पण काँग्रेस अस्पृश्यांच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न करत नाही असे डॉ. आंबेडकरांना जाणवू लागले. गुरू वायूर मंदिराच्या प्रश्नांबाबत म. गांधीजींच्या भूमिकेचा डॉ. आंबेडकरांनी निषेध केला. पर्यायाने काँग्रेस व डॉ. आंबेडकर यांच्यातील मतभेदाची दरी रुंदावली.

पुणे करारानंतर काही नेत्यांनी एकत्रित येऊन 'अखिल भारतीय अस्पृश्यता विरोधी मंडळा'ची स्थापना केली. भारतीय समाजातील स्पृश्य वर्गाचे मतपरिवर्तन घडवून शांततेच्या मार्गाने सार्वजनिक ठिकाणे व संसथा अस्पृश्यांना खुल्या करण्याचे कार्य निश्चित केले. या संस्थेचे म. गांधीजींनी नाव बदलून 'हरिजन सेवक संघ' असे ठेवले. अस्पृश्यांना ते हरिजन असे संबोधू लागले. पण १९४०

पर्यंतच्या हरिजन सेवक संघाच्या कार्याचा आढावा घेतल्यास, अस्पृश्योध्दाराचे कार्य संघ तळमळीने व प्रामाणिकपणे करत नाही. तो फक्त काँग्रेसची एक शाखा म्हणून कार्य करतो, असे डॉ. आंबेडकरांना जाणवले. तसेच हरिजन सेवक संघाच्या कार्यकारी समितीतील डॉ. आंबेडकर, श्रीनिवासन व राजा हे अस्पृश्य प्रतिनिधी त्यातून बाहेर पडले. त्याच्या रिक्त जागांवर कोणीही अस्पृश्य प्रतिनिधी नव्याने घेतले नाहीत. या घटनेचे म. गांधीजींनी समर्थन केले. तसेच हरिजन सेवक संघ हा अस्पश्यांना त्यांच्या मूलभूत हक्कांची मागणी करण्याची शिकवण देत नाही, तर तो अस्पृश्यांना स्पृश्यांच्या मदतीवर अवलंबून राहण्यास शिकवितो. संघाने अस्पृश्यांना निवारणाबाबत स्पृश्यांमध्ये प्रबोधन व प्रचार केलेला नाही, त्यामुळे स्पृश्यांचे फारसे मतपरिवर्तन झालेले नाही. जातिप्रथा नष्ट करण्यास स्पृश्य समाज तयार होत नाही, म्हणजेच हिंदू धर्म सुधारणेस तयार नाही. हे पाहून १९३५ मध्ये डॉ. आंबेडकर धर्मांतराची घोषणा 'येवला' या ठिकाणी करतात. काँग्रेस आणि गांधीजींच्या अस्पृश्योध्दाराच्या कार्याची चिकित्सा करून अस्पृश्यांना काँग्रेसपासून सावध राहण्याचा सल्ला डॉ. आंबेडकरांनी 'काँग्रेसने व गांधीजींनी अस्पृश्यासाठी काय केले?' हा ग्रंथ लिहून दिला.

केंद्रीय विधिमंडळात मांडण्यात आलेल्या मंदिर प्रवेशाच्या पाच प्रस्तावना झालेला विरोध व जी मंदिरे कायद्याने अस्पृश्यांसाठी खुली करण्यात आली होती, येथील पुरोहित वेगवेगळ्या युक्त्या करून अस्पृश्यांना प्रवेश नाकारत होते. हे डॉ. आंबेडकरांना स्पष्ट दिसत होते. पण पुणे करारानुसार निवडून आलेले अस्पृश्य प्रतिनिधी अस्पृश्यांच्या हक्कांबाबत स्वतंत्र भूमिका घेऊ शकत नव्हते. कारण ते काँग्रेसचे प्रतिनिधी होते. या पार्श्वभूमीवर स्पृश्य समाजाकडून मदतीची अपेक्षा न करता, अस्पृश्यांनी उच्च शिक्षण व उच्चपदे मिळवावीत, अर्थार्जनाचे व्यवसाय करावेत व समान राजकीय हक्क मिळविण्यासाठी संघटित संघर्ष करावा अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती. आत्मनिर्भर होऊन अस्पृश्यांनी आत्मसन्मानाने जगण्याची वृत्ती बाळगावी असा उपदेश डॉ. आंबेडकर सतत आपल्या भाषणातून, लिखाणातून व कृती कार्यक्रमातून देत होते. अशा प्रकारे जातिप्रथेच्या अन्यायी व अमानुष बंधनातून मुक्त होऊन, मूलभूत मानवी हक्क मिळविण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या आत्मोद्धाराच्या प्रवाहाखाली अस्पृश्य वर्गाने लढा दिला.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-२

❑ **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. महात्मा जोतिबा फुले यांनी कोणत्या समाजाची स्थापना केली?

२. राजर्षी शाहू महाराजांच्या सभेत कुठे दंगल झाली?

३. दक्षिणेतील ब्राम्हणेत्तर पार्टीचे नाव काय?

४. १९२५ मध्ये रामस्वामी नायकर यांनी कोणत्या चळवळीचा आरंभ केला?

५. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी कशाची स्थापना केली?

६. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली अस्पृश्यांची चळवळ कसली होती?

## १.२.३ जात व्यवस्थेचे विश्लेषण आणि चिकित्सा

डॉ. बाबासाहेब ओंबडकरांनी भारतातील जातीव्यवस्थेसंबंधी आपले सखोल विचार मांडले आहेत. त्यांच्या मते, भारतातील लोकसंख्या आर्य, द्रविड, मंगोलियन आणि शक या वंशाच्या मिश्रणाने बनलेली आहे. सुरुवातीस त्यांच्यात संघर्ष झाले तरी नंतर सततचे संबंध व परस्परांच्या व्यवहारातून त्यांच्यात एक संस्कृतीची निर्मिती झाली. त्यांच्या वेगवेगळ्या संस्कृतींचा लोप झाला. पण त्यांच्यातील वांशीक भिन्नता पूर्ण नष्ट झाली नाही. वंशशास्त्रदृष्ट्या सर्व लोकसमूह वेगवेगळे असले तरी, एकात्मतेसाठी केवळ सांस्कृतिक ऐक्य हेच त्याचे गमक असते. त्या सांस्कृतिक एकत्वामुळे जातीच्या समस्येचे स्पष्टीकरण करणे अधिकच बिकट झाले आहे. एकसंध असलेल्या समाजाचा जात हा एक तुकडा आहे. त्यामुळे जातीच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण अवघड ठरते.

याबाबत सेनार्ट, नेसफील्ड, रिस्ले व केतकरांच्या जातींच्या व्याख्याचे विश्लेषण केल्यानंतर त्यातील अपुरेपणा जाणवतो असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. कारण जात ही जातींच्या साखळीतील एक दुवा असून, तिचा दुसऱ्या जातीशी एक निश्चित प्रकारचा संबंध असतो. या सर्व जाती मिळून एक जातीसंस्था निर्माण होते. हा मध्यवर्ती मुद्दाच जातीव्यवस्थेच्या जडणघडणीतील वरील विचारवंतांच्या नजरेतून सुटतो.

### ❐ विटाळाची कल्पना

जातीचे वैशिष्ट्ये म्हणून विटाळाच्या कल्पनेकडे सेनार्टने लक्ष वेधले. पण हे खास वैशिष्ट्ये ठरत नाही. कारण ती कल्पना ब्राम्हणी कर्मकांडातून निर्माण होते. तसेच कोणत्याही जातीच्या कार्यपध्दतीत फारसा बदल न करताही विटाळाची कल्पना नष्ट करता येण्यासारखी आहे. पण जोपर्यंत जातींना धार्मिक बैठक असते तो पर्यंत विटाळ ही कल्पना जातीचे वैशिष्ट्ये ठरू शकते.

नेसफील्डच्या मते, जातिबाह्य भोजनावर बंदी हे जातीचे वैशिष्ट्य आहे. पण जात ही एक स्वयंमर्यादित संस्था असल्याने तिच्या सभासदांवर भोजनासह सर्व सामाजिक व्यवहार जाती अंतर्गतच करण्याची मर्यादा पडते. त्यामुळे भोजनबंदी ही बाहेरून लादलेली बाब नसून, जातीच्या स्वभावधर्माचा म्हणजेच फुटीर वृत्तीचा तो एक परिणाम आहे.

तसेच डॉ. केतकरांच्या जातीच्या विश्लेषणाची बाब पाहता त्यांनी जातीबाह्य विवाहबंदी व जातीत जन्मलेल्यांनाच जातीचे सदस्य हे दोन मुद्दे मांडले आहेत. पण डॉ. आंबेडकर म्हणतात, जातिबाह्य विवाहाला बंदी घातल्यानंतर परिणामत: सदस्यत्व जातीत जन्मल्यांपुरतेच मर्यादित राहते, त्यामुळे ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत त्या वेगवेगळ्या नाहीत हे स्पष्ट होते.

जातींच्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यांचे परीक्षण केल्यानंतर डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, जात्यंतर्गत विवाह हाच खराखुरा जातीचा आत्मा आहे. पण जातीची समस्या निर्माण न करताही जगाच्या पाठीवर गटांतर्गतच विवाह करणारे समाज आढळून येतात.

त्यामुळे भारतातील जाती एकसंध समाजाचे कृत्रिमपणे लचके तोडून निर्माण केलेले निश्चित व स्थिर असे घटक होत. यातील प्रत्येक जातीवर विवाहाच्या रूढीद्वारे परस्परांत मिळसून न जाण्याची बंदी घालण्यात आली. यावरून हेच स्पष्ट होते की, जाती अंतर्गत विवाह हेच जातीचे लक्षण ठरते. ही जाती अंतर्गत विवाहाची रूढी टिकवून कशी ठेवली गेली, याचे स्पष्टीकरण केल्यास जातीचा उगम व घडण समजते.

## ❀ जातिव्यवस्थेची कारणे :-

भारतातील समाजव्यवस्था ही जगातील इतर देशांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण समाजव्यवस्था आहे. कारण भारतात जातिसंस्था निर्माण झाली. कोणत्याही समाजाची निर्मिती ही विविध सामाजिक वर्ग एकत्र येऊन होत असेल व समाजात वर्ग अस्तित्त्वात असतात ही वस्तुस्थिती असेल आणि ती जागतिक प्रक्रिया असेल असे मानले, तर जगात हे वर्ग बंदिस्त झाले नाहीत. पण भारतात मात्र हे वर्ग बंदिस्त झाले.

भारतातील जातिव्यवस्था समजून घेण्यासाठी विवाहसंस्थेचा सखोल विचार करावा लागतो. भारताच्या प्राचीन रूढीपैकी महत्त्वाची रूढी म्हणजे- गटबाह्य विवाहाची रूढी (ऐेलरा्) ही होय. केवळ रक्ताचे नातेवाईक वगळल्यास विवाहाच्याबाबत कोणतेही सामाजिक बंधन शिल्लक राहत नाही. परंतु भारतीय लोक गटबाह्य विवाहाचा कायदा आजही सक्तीने पाळतात. कारण आजही भारतात सपिंड व सगोत्र वधुवरांचे विवाह हा धर्मभ्रष्टपणा मानला जातो. त्यामुळे जात्यंतर्गत विवाहाची रूढी (एपवेसरा्) भारतात प्रचलित असली तरीही सगोत्रबाह्य विवाहाची रूढी मोडण्याचे कोणीही धाडस करू शकत नाही. त्यामुळे सगोत्रबाह्य विवाह म्हणजे परस्परात मिसळून जाण्याची प्रक्रिया असल्यामुळे जेथे सगोत्रबाह्य विवाहाची पध्दती असते, तेथे जाती असू शकत नाहीत.

पण भारतात स्वगटांतर्गत विवाह पध्दतीचा गटबाह्य विवाह पध्दतीवर वर्चस्व निर्माण झाल्याने भारतात जातीची निर्मिती झाली. त्यामुळे जातीव्यवस्थेचे विश्लेषण करण्यासाठी गटबाह्य विवाह पध्दतीचा

विरोध नष्ट करून स्वगटात विवाह करण्याची प्रथा कोणत्या साधनांनी टिकवून ठेवण्यात आली याचे विश्लेषण महत्त्वाचे ठरते. साधारणत: गटांतर्गत विवाहाच्या पध्दतीने गटबाह्य विवाहाच्या पध्दतीनंतर मिळविलेला विजय म्हणजेच जातीची निर्मिती होय.

एखाद्या लोकसमूहातील गटबाह्य विवाहाची पध्दती नष्ट करून, गटांतर्गतच विवाह केला पाहिजे, असा नियम केला तरी तो सर्व लोक पाळतीलच असे नाही. कारण परस्परांच्या सानिध्यात राहणाऱ्या लोकसमूहांमध्ये परस्परात मिसळून जाण्याची सहजप्रवृत्ती असते, यासाठी गटबाह्य संबंधावर बंधने घालणे आवश्यक होते.

पण गटबाह्य संबंधांवर बंधने घातल्यानंतरही, गटांतर्गत अत्यंत क्लिष्ट समस्या निर्माण होतात. त्यामध्ये महत्त्वाची समस्या म्हणजे, गटातील लग्नायोग्य स्त्री-पुरुषांची संख्या समान राहील अशी व्यवस्था करणे. पण विवाहित पती-पत्नीपैकी पतीचा मृत्यू झाल्यास स्त्रियांच्या संख्येत एका स्त्रीची भर पडते व पत्नीचा मृत्यू झाल्यास पुरुषांच्या संख्येत एका पुरुषाची भर पडते. त्यांची व्यवस्था लावली नाही तर जातीबाह्य विवाह करून ते जात कायद्याचा भंग करतील. त्यामुळे वाढीव स्त्री-पुरुषांचा प्रश्न सोडविणे महत्त्वाचे ठरते.

## ❑ वाढीव स्त्रीचा प्रश्न :-

जात्यंतर्गत विवाहाचा नियम जतन करण्यासाठी -

## १. पहिला उपाय :-

वाढीव स्त्रीला तिच्या मृत पतीच्या चितेवर जाळून, तिच्यामुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नातून मुक्त होणे पण प्रत्येक स्त्रीची याच पध्दतीने विल्हेवाट लावणे शक्य होणार नाही. कारण तो मार्ग व्यवहार्य वाटत नाही. पण अशी वाढीव स्त्री जातीत तशीच राहिली तर तिच्या अस्तित्वामुळे दुहेरी धोका निर्माण होतो. एक म्हणजे ती जातीबाह्य विवाह करेल किंवा आपल्याच जातीत विवाह करून, एका उपवर मुलीच्या विवाहविषयक हक्कांवर आक्रमण करेल, त्यामुळे तिची काहीतरी व्यवस्था लावणे अपरिहार्य ठरते.

## २. दुसरा उपाय :-

म्हणजे तिच्या उर्वरित आयुष्यात वैधव्य लादणे, हे युक्तीचे वैधव्य, जाळून टाकण्याच्या प्रथेपेक्षा व्यवहार्य वाटते. पण जातीअंतर्गत नीतीचे रक्षण करण्यात ती अपयशी ठरते. कारण जबरदस्तीने वैधव्य लादल्यामुळे ती कायदेशीर संसार थाटू शकत नसली तरीही तिचा कल अनैतिक व्यवहारांकडे वाढू शकतो.

पण यावर मात म्हणून कोणालाही तिचा मोह होणार नाही, अशी निष्कृष्ट राहणीची बंधने तिच्यावर लादून जात त्यातून मुक्तता करून घेते.

## ❒ वाढीव पुरुषांचा प्रश्न :-

जातीच्या लोकसमूहाच्या दृष्टीने वाढीव पुरुषांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे व वाढीव स्त्रीच्या प्रश्नापेक्षा अधिक कठीण आहे. मृत पत्नीबरोबर त्याला चितेवर जाळण्याची कल्पना दोन बाबींनी फसवी आहे. कारण–

१) तो पुरुष असल्याने असे घडू शकत नाही. कारण तो नियम तयार करणाऱ्या भूमिकेत अल्याने तो नियमांच्या पलीकडे असतो.

२) दुसरे म्हणजे जर त्याला चितेवर जाळले तर जातीतून एक धष्टपुष्ट व्यक्ती नष्ट हाते. त्यामुळे या मार्गाचा अवलंब केला जात नाही. त्यासाठी पुढील पर्याय शिल्लक राहतो. विधवेप्रमाणे त्यांच्यावर विधुर म्हणून राहण्याचे बंधन घालणे किंवा त्याचे मन वळवले जाणे. पण हा पर्याय अत्यंत कठीण आहे.

पण मनुष्य स्वभाव लक्षात घेता हा उपाय यशस्वी होणे अतिशय अवघड आहे. वाढीव पुरुष जातीच्या व्यवहारामध्ये सक्रिय सहभागी राहिला तर त्याच्यामुळे जातीच्या नीतीमत्तेला धोका निर्माण होण्याचाच अधिक संभव असतो. तसेच वाढीव पुरुषाने ब्रम्हचर्य व्रताचे पालन केल्यास जातीला संपन्नावस्था, निर्माण करून देण्याच्या दृष्टीने तो मेल्यासारखाच असतो. त्यामुळे जातीच्या हितासाठी त्याला गृहस्थावस्थेत ठेवणे गरजेचे असल्याने, जातीतल्या जातीत त्याच्यासाठी वधूची व्यवस्था करावी लागते. यासाठी लग्नायोग्य वय न झालेल्या मुलीलाच वधू म्हणून पुरविले जाते. यामुळे ती व्यक्ती जातीबाहेर जात नाही आणि जात्यंतर्गत विवाहाच्या नियम व जातीची नीतिमत्ता यांचे रक्षण होते.

अशाप्रकारे स्त्री-पुरुषांच्या संस्थेतील तफावत पुढील चार उपायांनी नाहीशी केली जाते.

१) विधवेला तिच्या मृत पतीच्या शवाबरोबर जाळून टाकणे.

२) वैधव्य लादणे-जाळून टाकण्याचाच सौम्य प्रकार/पर्याय.

३) विधुरावर ब्रम्हचर्यावस्था लादणे.

४) लग्नायोग्य वय नसलेल्या मुलीशी विवाह करणे. म्हणजेच बालविवाह घडवणे.

या साधनांनी प्राप्त होणारे उद्दिष्ट कोणते? तर ही साधने जातीतंर्गत विवाह पध्दतीला शाश्वत

स्वरूप प्राप्त करून देतात व जातीतच त्यांचा अंतर्भाव असतो. डॉ. आंबेडकरांच्या मते, जातीची सामान्य घडण अशी असते.

भारतातील जातीव्यवस्था ही एक अत्यंत जुनी संस्था आहे. पण तिच्या भूतकाळाची उकल करणे अवघड आहे. पण या संस्थेचा विचार करताना, वाढीव स्त्री-पुरुषांचा प्रश्न सोडविण्यासाठी हिंदूंनी जो निर्णय घेतला, त्यानुसार स्त्रैण स्वरूपाच्या तीन रूढी त्यांनी निर्माण केल्या.

१) सती किंवा विधवेला मृत पतीच्या चितेवर जाळणे.

२) विधवेला पुनर्विवाहाची बंदी घालून सक्तीचे वैधव्य लादणे.

३) बालविवाह.

या रूढीचे शास्त्रीय स्पष्टीकरण न देता, या रूढींना मान्यता देणारे तत्त्वज्ञान मात्र विपुल प्रमाणात मांडण्यात आले. पण जातीच्या उगमाची व अस्तित्वाची कारणे सांगणारी माहिती उपलब्ध नाही.

सतीच्या प्रथेला मान्यता देण्यात आली, कारण ती पती आणि पत्नीच्या शरीर व आत्म्याच्या निस्सीम एकत्वाचे ते एक गमक आहे. कारण त्यातून पतीवरील प्रेम व्यक्त करताना मृत्यूच्या सीमा ओलांडणारी भक्ती त्यामधून व्यक्त/व्यतीत होते. कारण पत्नी पदाची तोच उच्च आदर्श असतो.

याबरोबरच बालविवाहाची प्रशंसा डॉ. केतकरांनी करताना ते कुमारिकेला तिच्या लैंगिक भावनेची जाणीव होण्याअगोदरच तिचे प्रेमपात्र माहित करून देण्यासाठी बालविवाहाचे उदात्तीकरण करतात. याबाबीने बालविवाहाची पध्दती सम्मानित झाली. या रूढीची जातीत जास्त प्रशंसा लक्षात घेता अशा स्तुती/प्रशंसेशिवाय त्या टिकून राहणार नाहीत. हे सिध्दच होते. या रूढी जातीच्या घडणीसाठी आवश्यक होत्या. त्यामुळे त्यांना लोकप्रिय करण्यासाठी त्यांच्या गौरवाचे तत्त्वज्ञान निर्माण झाले. कारण आरंभी विवेकी बुध्दीच्या लोकांना या रूढी इतक्या किळसवाण्या व भयंकर वाटल्या असतील की, त्या रूढींना मोहक रूप देण्यासाठी बरेच परिश्रम घेण्यावाचून गत्यंतर उरले नाही.

सती, सक्तीचे वैधव्य व बालविवाह या रूढी मूलत: वाढीव स्त्री-पुरुषांचा प्रश्न सोडविण्याच्या हेतूने व अंतर्गत विवाहाची पध्दती सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने निर्माण झाल्या. या रूढीवाचून अंतर्गत विवाहाची पध्दती तंतोतंत कार्यशील राहू शकली नसती व अंतर्गत विवाह पध्दतीवाचून जात म्हणजे एक फसवणूक होय.

## ❒ जातीचा उगम

भारतातील जातीच्या उगमासंबंधीचा प्रश्न अतिशय त्रस्त करणारा असला तरी डॉ.बाबासाहेब

आंबेडकरांच्या मनात त्याबाबत कोणताही गोंधळ नसल्याचे पहावयास मिळते. डॉ. आंबेडकर म्हणतात, जात्यंतर्गत विवाह हेच जातीचे एकमेव वैशिष्ट्य होय. ह्या जात्यंतर्गत विवाहासाठी लागणाऱ्या यंत्रणेचे मूळ म्हणजे नातीचे मूळ किंवा उगम होय.

व्यक्तीच्या समूहाने समाज निर्माण होतो. या विधानाबरोबरच समाज हा नेहमीच वर्गाच्या समावेशाने तयार होतो. त्याचा आधार आर्थिक, बौध्दिक किंवा सामाजिक असेल, परंतु समाजातील प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या वर्गाची घटक असते. हिंदू समाजही याला अपवाद नव्हता व नाही.

या नियमानुसार जातीमध्ये प्रथम कोणत्या वर्गाचे जातीमध्ये रूपांतर झाले हे ठरवणे आवश्यक आहे. कारण जात आणि वर्ग हे दरवाजासमोर दरवाजा असलेले शेजारी असून फारच थोड्या भेदामुळे त्यांचे अस्तित्व वेगळे ठरते.

या जातीच्या रूढीचे पूर्ण कडक स्वरूप सापडते ते म्हणजे ब्राम्हण जातीतच होय. याबराबेरच हिंदू समाजातील ब्राम्हणांनी सामाजिक दर्जात सर्वोच्च स्थान प्राप्त केलेले असल्यामुळे, अब्राम्हण जातीत ही या रूढीनंतरच्या काळात अनुकरणांने पाळण्यास सुरू झाल्या. पण अब्राम्हण जातीत त्या रूढी कडक व सर्वच्या सर्व पाळल्या जात नाहीत. यावर डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, या रूढीचे कडकपणे पालन व उपाध्याय वर्गाने जुन्या संस्कृतीत आढ्यतेने उपभोगलेली सामाजिक श्रेष्ठता ह्या दोन पुराव्याद्वारे जात या कृत्रिम संस्थेचे ब्राम्हण हेच जनक असून, ब्राम्हणांनीच या अस्वाभाविक रूढींच्याद्वारे जातीची जोपासना केली हे स्पष्ट होते.

## ❑ जातीप्रथेची वाढ व प्रसार

जगातील इतर समजाप्रमाणेच भारतीय समाज हा सुध्दा अनेक वर्गांनी मिळून बनलेला होता. भारतात प्राचीन काळी-

१) ब्राम्हण किंवा उपाध्याय वर्ग.

२) क्षत्रिय किंवा सैनिक वर्ग.

३) वैश्य किंवा व्यापारी वर्ग.

४) शूद्र किंवा शेतकरी व मजुरांचा वर्ग.

ही वर्गपध्दती अस्तित्वात होती. हिंदूच्या इतिहासात ब्राम्हण वर्गाने सामाजिक संबंधाच्या बाबतीत इतर लोकांपासून स्वत:ला वेगळे तोडून अलिप्त करून घेतले व बाकीच्या लोकांचेही श्रमविभागणीनुसार त्यांची विभागणी झाली. अशा एका वर्गाचे पोटविभाग पडण्याची प्रक्रिया पूर्णत: स्वाभाविक असली तरी,

त्यातील एक अस्वाभाविक गोष्ट म्हणजे त्यांनी वर्गपध्दतीतील मुक्त प्रवेश पध्दती गमविली व ते स्वयंमर्यादित वर्ग बनले, त्यांनाच जाती असे म्हणतात.

स्वयंमर्यादित होऊन अंतर्गत विवाह करणारी एक जात होण्यास त्या पोटविभागांना इतर कोणी भाग पाडले? की त्यांनी स्वेच्छेने प्रवेशद्वार बंद केले? असे जातीचे स्पष्टीकरण करून डॉ. आंबेडकर म्हणतात, काहींनी स्वत: दारे बंद केली, तर काहींना त्यांच्यासाठी दारे बंद असल्याचे आढळून आले. यातील पहिले भाष्य मानसशास्त्रीय असून दुसरे यांत्रिक स्वरूपाचे आहे. तरी ते परस्परपूरक असून जातीच्या समस्येचे स्पष्टीकरण करण्यासाठी दोन्हींही आवश्यकता आहे.

## ❐ जातीच्या घडणीसंबंधी मानसशास्त्रीय भाष्य

पोटविभाग स्वयंमर्यादित किंवा अंतर्गत विवाह करणारे वर्ग/विभाग का बनले? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे ब्राम्हण तसे होते, म्हणून असे उत्तर डॉ. आंबेडकरांनी दिले. अंतर्गत विवाह किंवा प्रवेश बंदी ही हिंदू समाजात एक टुम होती. ही टुम ब्राम्हण जातीतून सुरू झाल्यामुळे सर्व अब्राम्हण पोटविभागांनी अंत:करणपूर्वक तिचे अनुकरण केले व ते पोटविभाग ही अंतर्गत विवाहाची रूढी पाळणाऱ्या जातीत रूपांतरित झाले. हा अनुकरणाचा संसर्ग सर्वच पोटविभागांना झाला. अनुकरणाची प्रवृत्ती मानवी मनात खोलवर रूजलेली असून भारतीय समाजातील जातीच्या घडणीला ती कारणीभूत आहे. यास्तव वॉल्टर बॅगहॉट असे म्हणतो की, ''अनुकरणाची प्रवृत्ती ऐच्छिक किंवा जाणीवपूर्वक असते, असे आपण मुळीच समजता कामा नये, याउलट तिची बैठक मुख्यत: मनाच्या अत्यंत सुप्त भागात असते व या सुप्त मनातील भावनांची जाणीव प्रत्यक्ष कार्य होईपर्यंत प्रगट मनाला होत नाही. इतकेच नव्हे तर आधी जाणीव होण्याच्यादृष्टीने या भावना इतक्या गूढ असतात की, कार्य होत असतानासुध्दा त्या जाणवत नाहीत. आपल्या स्वभावातील अनुकरणप्रियतेचा मुख्य आधार म्हणजे आपल्या श्रध्दा होत. काही गोष्टींबद्दल आपल्या मनात अनुकूल पूर्वग्रह व काहींबद्दल प्रतिकूल पूर्वग्रह असतात. याची कारणे आपल्या स्वभावाच्या गूढ भागात असतात. परंतु श्रध्दाजन्य अनुकरण वृत्तीबद्दल शंकाच असू शकत नाही.

अनुकरणाद्वारे जातीच्या घडणीला आवश्यक असणारी परिस्थिती हिंदू समाजात अस्तित्वात होती. अनुकरणासाठी (१) ज्यांचे अनुकरण करावयाचे आहे त्यांना समाजात मानाचे स्थान असले पाहिजे. (२) त्या समाजातील लोकांचे परस्परसंबंध विभिन्न व नित्य असले पाहिजेत. अशी परिस्थिती असावी लागते ती भारतात उपलब्ध होती व आहे.

ब्राम्हण वर्गाला समाजात मानाचे स्थान आहे, कारण तो भूदेव आहे. त्यामुळे एखादी प्रथा सुरू करतो व बाकीच्यांनाही तसेच वर्तन करण्यास भाग पाडतो. त्यांचा समाजातील अधिकार नि:संशय असून

तोच आशीर्वाद आणि कल्याणाचा मुख्य स्रोत आहे. त्याबरोबर मनुष्य स्वभावही अतिशय दुर्बल असून, एखादा तत्त्ववेत्ता असो की, एखादी शूद्र मोलकरीण ते दोघेंही संधी मिळताच अनुकरणाला बळी पडतात. कारण अनुकरण सोपे असते तर स्व-संशोधन कठीण असल्यामुळे याशिवाय दुसरे काहीच घडू शकत नाही.

## ❒ जातीच्या घडणीची यांत्रिक प्रक्रिया

डॉ. आंबेडकरांच्या मते, जात कधीच एकवचनी रूपात नसते. तर जात नेहमीच अनेकवचनी रूपातच अस्तित्त्वात असते. याचा अर्थ ब्राम्हण वर्गाने स्वत:ला जातीचे रूप देत असतानाच परिणामी अब्राम्हणाची एक जात निर्माण केली. याच्या स्पष्टीकरणासाठी हिंदू मुसलमान, ज्यू. ख्रिश्चन व पारशी या धर्मगटांचा विचार करता पहिल्या चार धर्मातील लोकांनी आपल्या वर्गाची दारे बंद केल्यास, पारश्यांनी स्वत:ला मर्यादा घालून घेतली नसली तरीही आपोआपच ते वेगळा बंदिस्त वर्ग बनतात. अशा जातीव्यवस्थेच्या सामाजिक, धार्मिक व आर्थिक नियमांना धोका निर्माण करणारी कोणतीही नवी प्रथा या जाती निर्माण होऊ देत नाहीत. जातीचे नियम भंग/नष्ट करण्याचे धाडस दाखवणाऱ्या पापी माणसासाठी जात, दया, माया दाखवत नाही. तर त्याला जातीबहिष्कृत करते याचा परिणाम म्हणून जातीबहिष्कृताची नवी जात निर्माण होते. याउलट जातीबहिष्कृत लोकांना दुसरी जात सदस्य करून घेण्यास तयार असल्यास ते सदस्यत्व स्वीकारण्यास तयार असतात. परंतु जाती याद्वारे बंद असणाऱ्या संस्था असून, त्यांचे परस्परांत जाणीवपूर्वक संगनमत असते. त्यामुळे बहिष्कृतांना नवी जात बनविणे भाग पडते.

याचा परिणाम असा होतो की, नवनवीन वर्ग जातीच्या चौकटीला आव्हान देणारे कोणत्याही पायावर निर्माण झालेले वर्ग यांत्रिक प्रक्रियेने सतत जातीमध्ये रूपांतरित होत जातात.

जात ही श्रध्देवर आधारलेली आहे. पण जात या संस्थेचा आधार म्हणून श्रध्दा उदयास येण्यापूर्वी तिला बळकटी आणण्याची व तिला सतत चालू ठेवण्याची आवश्यकता असते. या अनुषंगाने डॉ. आंबेडकरांनी पुढील चार बाबींची मांडणी केलेली आहे.

१) हिंदू समाजाची रचना संयुक्त स्वरूपाची असली तरीही तेथे गंभीर स्वरूपाचे सांस्कृतिक ऐक्य आहे.

२) जात म्हणजे एका मोठ्या सांस्कृतिक ऐक्य असलेल्या समाजाचा एक अंशात्मक तुकडा आहे.

३) जातीची सुरवात करणारी पहिली एक जात आहे.

४) अनुकरणाच्या व बहिष्काराच्या माध्यमाद्वारे वर्गाचे रूपांतर जातीमध्ये झाले.

अशा या जातीच्या सर्वसामवेशक विषयाबाबत डॉ. आंबेडकरांनी प्रस्थापित विचारवंतांकडून केलेली मांडणी व निसटलेले मुद्दे याचा उहापोह करून आपले जातीविषयक विचार मांडले आहेत.

## ❐ जातीव्यवस्थेचे निर्मूलन

डॉ. आंबेडकरांच्या मते, 'जातीभेद' ही हिंदू समाजासमोरील एक समस्या आहे. हे मानायलाच अजून हिंदू तयार नाहीत. 'हिंदूंची जीवनविषयक दृष्टि' या ग्रंथातील डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे विचार हृदयास भिडणारे आहेत. त्यांच्या विचारांचा आधार घेऊन हिंदू समाजात 'जगणे' म्हणजे 'जगण्यास लायक असणे' असे मत निर्माण होऊ शकते. पण डॉ. आंबेडकरांच्या मते, एखादा समाज जगतो की मरतो हा मूलभूत प्रश्न महत्त्वाचा असून जगण्याच्या अनेक तऱ्हा असतात. त्यामुळे नुसतेच जगणे व मानाने जगणे यात फरक आहे. कोणत्याही हिंदूने काळाच्या ओघात जिवंत राहिलो. या कल्पनेत समाधान मानणे (मूर्खपणाचे) योग्य नाही. कारण ते सतत पराभूताचे जीवन जगत आले व त्यामध्ये अधोगती मात्र कायम स्वरूपाची आहे.

जोपर्यंत भारतातील सामाजिक घडण बदलणार नाही, तोपर्यंत कोणतीही सुधारणा घडवून आणणे असंभव आहे, असे डॉ. आंबेडकरांचे मत आहे. ते म्हणतात, जातीच्या आधारावर कोणतीही इमारत उभा करता येणार नाही, तुम्ही राष्ट्र निर्माण करू शकत नाही. इतकेच काय पण चारित्र्यसंपन्न पिढीसुध्दा तुम्ही तयार करू शकत नाही. तुम्ही जातीच्या आधारावर काहीही करायला जाल तर ते कोसळून पडल्याशिवाय राहणार नाही.

## ❐ सहभोजन व आंतरजातीय विवाह

जाती-जातींमध्ये सहभोजनाची सुरवात करून जातीभेद नष्ट करण्याची योजना मांडली जाते. पण डॉ. आंबेडकरांच्या मते, ही योजना अपरिपक्व आहे. कारण अशा अनेक जाती आहेत, ज्यांच्यामध्ये सहभोजन सुरू आहे. पण जातीयवृत्ती किंवा जातीय भावना मुळीच नष्ट झालेली नाही, असा अनुभव आहे.

जातीभेद नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाह हाच जालीम उपाय आहे, असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते. रक्तमिश्रण ह्या एकमेव औषधानेच हिंदू समाजात बंधुभाव निर्माण होऊ शकतो व जातीने निर्माण केलेली फुटीरतेची भावना नष्ट होऊ शकते. अहिंदू समाजापेक्षा हिंदूंच्या सामाजिक जीवनात आंतरजातीय विवाहास सर्वाधिक महत्त्व आहे. कारण तोच समाज विखुरलेला/विभागलेला असल्याने

त्यांच्या एकसंध निर्मितीसाठी आंतरजातीय विवाह ही प्राथमिक गरज आहे. पण आंतरजातीय भोजन व विवाह या कल्पना जात नष्ट करण्याच्या कामी प्रभावी ठरत नाहीत किंवा हिंदू त्यांचे अनुसरण करत नाहीत. कारण हिंदूंनी उराशी बाळगलेल्या व पवित्र समजल्या गेलेल्या श्रध्दा, कल्पना व समजुतींशी त्या विसंगत आहेत.

जात ही काही भितीप्रमाणे भौतिक बंधन नाही की, ज्यामुळे तिला भौतिक वस्तुप्रमाणे तोडफोड करून झुगारून देता येईल. जातीविनाश म्हणजे भौतिक बंधनाची विनाश असे म्हणता येत नाही, तर जात ही एक मनाची अवस्था आहे, वृत्ती आहे. जातीविच्छेद म्हणजे मनोवृत्तीतील परिवर्तन होय. जातीतील परस्परसंबंध मानवाचे मानवाप्रती माणुसकीशून्य व्यवहार करण्याइतपत खालच्या थरास गेले असताना बुध्दिहीन व अमानुष आहेत म्हणून हिंदू जातीभेद पाळत नाहीत, तर ते अतिशय धर्मपरायण असल्यामुळेच जातीभेद पाळतात. म्हणजेच लोकांच्या मनात जातीय वृत्ती रुजविणारा धर्मच याला जबाबदार आहे. त्यामुळे खरे शत्रू जातीभेद पाळणारे लोक नसून, त्यांना जातीभेद पाळावयास शिकविणारी धर्मशास्त्रे आहेत. त्यामुळे लोकांची धर्मशास्त्रप्रामाण्यावरील श्रध्दा प्रथम नष्ट करणे हाच खरा उपाय आहे.

धर्मशास्त्रप्रामाण्यास स्वत: विरोध करावयाचा नाही, लोकांना धर्मशास्त्रांनी दिलेल्या आज्ञांवर विश्वास ठेवूद्यायचा व पुन्हा आपणच म्हणजे त्यांच्या समाजसुधारकांनी लोकांच्या वर्तनाला अमानुष, अविवेकी, भावनात्मक अशा प्रकारे टीका करायची. हा समाजसुधारणेचा विपरीतच मार्ग म्हटला पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. म्हणून समाजसुधारणेसाठी लोकांच्या वागणुकीत बदल पाहिजे असेल तर, लोकांची वागणूक ज्या धर्मशास्त्रावर आधारित आहे त्या धर्मशास्त्रावरील लोकांचा विश्वास उडविल्यावाचून त्यांच्या वागणुकीत बदल होणार नाही. धर्मशास्त्रांच्या जोखडातून प्रत्येक स्त्री-पुरुषास मुक्त करून, त्यांच्या मनावरील दूषित संस्कार नष्ट केल्यास ते आपोआपच सहभोजन व आंतरजातीय विवाह करतील.

यास्तव धर्मशास्त्रांचा सत्य अर्थ वेगळाच आहे व लोक त्याचा चुकीचा अर्थ लावतात असा युक्तिवाद धर्मशास्त्राच्या रक्षणासाठी केला जातो. पण याला महत्त्व नाही, तर धर्मशास्त्रांचा लोक काय अर्थ लावतात हे महत्त्वाचे आहे. यासाठी धर्मशास्त्रप्रामाण्य धुडकावण्याबाबत भगवान बुध्दाने, गुरूनानकाने घेतलेली भूमिका घेणे महत्त्वाचे आहे. हिंदूंना निर्भिडपणे सांगितले पाहिजे की, ही जी सारी विषमतेची कीड आहे, ती हिंदू धर्माने जातीभेद पवित्र आहे अशी जी भावना लोकमाणसात पसरविली त्या धर्मातच आहे.

त्यामुळे डॉ. आंबेडकर म्हणतात की, ‘हिंदू लोक सामाजिक व्यवस्था पवित्र मानतात, जातींना दैवी आधार आहे. म्हणून जातींना चिकटलेली पावित्र्य व आधिदैविक उपपत्ती प्रथम नष्ट करायला

पाहिजे. म्हणजेच वेद व धर्म शास्त्रे यांचे आधिपत्य प्रथम उद्‌ध्वस्त करायला पाहिजे. तरच जात व्यवस्था नष्ट होईल, या प्रामाण्यावर डॉ. आंबेडकर ठाम होते.

## स्वयं-अध्ययन प्रश्न-३

❒ **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. भारतातील लोक विवाहाच्या बाबतीत कोणता धर्मभ्रष्टपणा मानतात?

२. वाढीव स्त्री-पुरुषांचा प्रश्न सोडविण्यासाठी हिंदूंनी कोणत्या रूढी निर्माण केल्या?

३. अनुकरणाद्वारे जातीच्या घडणीला कोणती परिस्थिती आवश्यक असते?

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, समाजसुधारणेसाठी लोकांच्या वागणुकीत कोणता बदल झाला पाहिजे?

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जातीभेद नष्ट करण्यासाठी कोणती विवाह पध्दती अवलंबावी?

## १.२.४ धर्म आणि धम्माचे विश्लेषण

डॉ. आंबेडकरांच्या मते, धर्म हा शब्द निश्चित अर्थ-दुर्लभ, व्याख्याविहिन शब्द आहे. कारण धर्म हा संकल्पनेत वेगवेगळी स्थित्यंतरे होऊन स्थित्यंतराच्या प्रत्येक अवस्थेतील संकल्पनेला धार्मिक विचार असे संबोधण्यात आले. धर्म संकल्पनेच्या सर्व अवस्थांत विषमतेवर आधारलेली समाजरचना अस्तित्त्वात राहिली आहे. या विषमतेचे आधार वर्ण व जात आहेत, तर वर्ग व जातीचे आधार धार्मिक ग्रंथ आहेत. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला स्वत: बौध्द धम्माचा स्वीकार केला व आपल्या लाखो अनुयायांनाही धम्म दीक्षा दिली. विषमतेवर आधारलेल्या भारतीय समाज रचनेचे निर्मूलन करून समता, स्वातंत्र्य व बंधूता या तत्त्वांवर आधारलेल्या नवसमाज निर्मितीच्या दृष्टीने ही धम्मक्रांती होती. या धम्मक्रांतीच्या उद्दिष्टानुरूप वैज्ञानिक कसोटीला उतरलेले विश्लेषण डॉ. आंबेडकर यांनी केले. त्यांनी आपल्या साहित्यात धर्म आणि धम्माचे केलेले विश्लेषण पुढीलप्रमाणे :-

### ❒ धर्म

धर्म हा शब्द निरनिराळ्या अवस्थांमधून गेला असल्याने व त्याच्या वेगवेगळ्या अवस्थांमधील अर्थ वेगवेगळा असला तरी शब्द मात्र एकच वापरला गेला, त्यामुळे धर्म हा एक अनिश्चित शब्द असून,

त्याचा ठराविक असा अर्थ नाही. धर्म विकासाच्या पहिल्या अवस्थेत वीज, पाऊस, पूर इ. घडणाऱ्या घटनांचे कार्यकारणभाव आदिमानवाला स्पष्ट करता येत नसल्याने, त्यांच्या निग्रहाच्या नावाने जे काही चमत्कार करी त्याला जादू असे म्हणत. प्रारंभीच्या काळात धर्म आणि जादू एकरूपच असलेले पहावयास मिळतात.

धर्माच्या विकासाच्या दुसऱ्या टप्प्यावर धर्माने विश्वास, धार्मिक, कर्मकांड, विधी, प्रार्थना आणि यज्ञ असे स्वत:चे स्वरूप धारण केले. पण या सर्व गोष्टी धर्मापासून उद्‌भवलेल्या असल्याने गौण आहेत. पण विश्वास हा धर्माचा केंद्रबिंदू असून हा विश्वास असा की, 'अशी एक शक्ती आहे, जिच्यामुळे हे सर्व चमत्कार घडून येतात. परंतु ती आदिमानवाच्या ज्ञान सामर्थ्याच्या पलीकडे आहे.' प्रारंभी ही अज्ञात शक्ती सैतानी समजली जाई. पण पुढे ती कल्याणकारीही वाटू लागली. ती कल्याणकारी शक्ती प्रसन्न करून घेण्यासाठी व सैतानी शक्तीला संतुष्ट करण्यासाठी विश्वास, कर्मकांड, विधी व यज्ञ यांची निर्मिती झाली.

यानंतर धर्माच्या तिसऱ्या अवस्थेत 'देवानेच हे सर्व जग आणि माणसे निर्माण केली' अशी समजूत रूढ झाली. या अवस्थेत माणसाला आत्मा असतो, तो अमर असतो व माणसाच्या इहलोकीच्या कर्माबद्दल परलोकात म्हणजेच देवासमोर जाब द्यावा लागणार अशी समजूत रूढ झाली. धर्म विकासाचा आलेख तयार होताना, देवावर श्रध्दा, आत्मासंबंधी विश्वास, ईश्वर पूजा, चुकणाऱ्या आत्म्याची सुधारणा, प्रार्थनाविधी व यज्ञ-याग इतयादी प्रथा, परंपरा, रूढी निर्माण झाल्या. या रूढींचा वापर करून देवाला प्रसन्न करणे म्हणजे धर्म आणि हे सर्व आशय धर्म या शब्दात व्यक्त होतात.

## ❐ धम्म

डॉ. आंबेडकर म्हणतात, गौतम बुध्द ज्याला धम्म संबोधतात, तो धर्मापासून मूलत: वेगळा आहे. कारण धर्म आणि धम्मामध्ये साम्यापेक्षा भेदच जास्त आहेत. धर्म ही व्यक्तीगत बाब असून, तो व्यक्तीपुरताच मर्यादित ठेवावा. सार्वजनिक जीवनात त्याला वाव देऊ नये.

याउलट धम्म हा मूलत: व तत्त्वत: सामाजिक आहे. धम्म म्हणजे सदाचार होय. मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात माणसा-माणसातील व्यवहार उचित असणे म्हणजे सदाचरण होय. यावरून हे स्पष्ट होते की, मनुष्य एकटाच असला की त्याला धम्माची आवश्यकता नाही, परंतु जेव्हा दोन माणसे कोणत्याही संबंधाने एकत्र येतात, तेव्हा त्यांना आवडो अगर न आवडो त्यांच्या संबंधात धम्म हा असलाच पाहिजे. समाज धम्माशिवाय असूच शकत नाही. समाज धम्माबरोबरच धम्माचे उल्लंघन करणाऱ्या लोकांना शासन करणारा मॅजिस्ट्रेटचा स्वीकार करू शकेल. मानवी जीवना जागा राहू नये म्हणून गौतम बुध्दाने प्रज्ञेला आपल्या धम्माची एक कोनशिला बनविले. तर करुणेशिवाय समाज

जगू शकत नाही, त्याची उन्नती होऊ शकत नाही, म्हणून गौतम बुध्दाने करूणेला धम्माची दुसरी कोनशिला बनविले. करूणा म्हणजे प्रेम, प्रज्ञा आणि करूणेचे अपूर्ण मिश्रण म्हणजेच गौतम बुध्दाचा धम्म होय.

धम्माचे विश्लेषण करताना धम्म म्हणजे काय? याबाबतचे विचारतत्त्व समजून घेणे आवश्यक आहे, ती पुढीलप्रमाणे :-

१. जीवन शुचिता राखणे म्हणजे धम्म होय. या जीवन शुचितेचे तीन प्रकार पडतात.

***(अ) देह शुचिता :*** माणसाने हिंसा, चोरी आणि मिथ्याचार यापासून विरक्त होणे म्हणजे देहशुचिता होय.

***(ब) वाक्शुचिता :*** असत्य संभाषणापासून विरक्त होणे.

***(क) मन शुचिता :*** माणसामध्ये कामवासना, द्वेष, आळस, उध्दटपणा, शंका, गोंधळ उत्पन्न झाल्यास त्याला त्याची जाणीव होणे. या सर्व मानसिक दु:स्थितीचा उगम कसा होतो, त्याचा त्याग कसा करता येतो व अशा परिस्थितीत चित्तस्थिती कशी साधायची याचे ज्ञान असणे म्हणजेच मानसिक शुचिता होय.

२. जीवनात पूर्णत: साधणे म्हणजे धम्म होय. यात कायिक, वाचिक आणि मानसिक परिपूर्णता साधणे आवश्यक असते.

३. **निब्बाण प्राप्त करणे :** गौतम बुध्दांनी सांगितलेल्या सर्व सिध्दांताचा निब्बाण हा केंद्रबिंदू आहे. निब्बाणाच्या कल्पनेत तीन विचारांचा अंतर्भाव होतो.

(अ) आत्म्याच्या मोक्षाऐवजी प्राण्याचे सुख हा विचार महत्त्वाचा आहे.

(ब) जिवंतपणी ह्या सर्व संसारात असताना मिळणारे सुख महत्त्वाचे आहे.

(क) सदैव प्रज्वलित असणाऱ्या विकारांच्या ज्वालांवर निग्रह साधणे.

या विचारांनुसार धम्म मार्गावर वाटचाल करताना माणसाने आपल्या प्रवृत्तीवर ताबा मिळविणे. इतकाच निब्बाण या शब्दाचा अर्थ अभिप्रेत आहे. म्हणजेच निब्बाण हा निर्दोष जीवनाला प्रतिशब्द आहे असे गौतम बुध्दानेच स्पष्ट केले आहे.

४. **तृष्णा त्याग करणे :** गौतम बुध्दांच्या मते, सर्वात अधिक लाभदायक गोष्ट म्हणजे आरोग्य आणि सर्वात मौल्यवान धन म्हणजे संतोष. संतोष हे सर्वश्रेष्ठ धन असे म्हणताना, माणसाने अमर्याद अशा लोभाच्या आधीन होऊ नये, इतकाच त्याचा अर्थ अभिप्रेत आहे. तृष्णेतून

मारामारी, आघात, झगडे, वाद प्रतिवाद, भांडण, निंदा, असत्य ह्या गोष्टींचा उदय होतो, त्यामुळे माणसाने तृष्णा आपल्या काबूत ठेवली पाहिजे म्हणजेच धम्म होय.

५. **सर्व संस्कार अशाश्वत आहेत :** याचा अर्थ जो प्राणी भूतकाळात जीवन व्यतीत करीत होता. तोच प्राणी वर्तमानकाळात असू शकत नाही आणि तोच प्राणी भविष्यकाळात असणार नाही. म्हणजेच मनुष्यप्राणी हा परिवर्तनशील आणि संवर्धनशील आहे. जीवनाच्या कोणत्याही दोन क्षणी तो एकसारखाच असू शकत नाही. म्हणजेच तो शाश्वत नाही. सजीव प्राणी केव्हा तरी मरणार हे समजायला सोपे आहे. पण तो जिवंत असताना सारखा बदलत आहे हे समजायला कठीण आहे.

६. **कर्म हे जगातील नैतिक व्यवस्थेचा आधार आहे :** हे मानणे म्हणजे धम्म होय. कर्म म्हणजे मनुष्याकडून केले जाणारे कार्य होय. त्या कार्याबरोबर त्याचा परिणामही असतो. जर मनुष्याचे कार्य कुशल, चांगले नसेल तर नैतिक व्यवसथ वाईट असते, आणि नैतिक व्यवस्था चांगली असेल तर त्याचा अर्थ इतकाच की मनुष्याचे कार्य चांगले आहे. या कर्मनियमाचा बुध्द प्रणीत अभिप्राय असा की, ज्याप्रमाणे दिवसामागून रात्र येते, त्याप्रमाणे कर्माभागून त्याचे परिणाम ही येतात. हा हा एक नियम आहे. अकुशल कर्म केल्यास नैतिक व्यवस्थेची हानी होऊन मानवता दुःखी होते.

## ❒ धर्म आणि धम्म यातील फरक

### ❀ धर्म :-

१) धर्मामध्ये सत्याची कल्पना ही ईश्वर केंद्रीत आहे. ती ईश्वराभोवती फिरत असल्याने सत्य पडताळून पाहण्याची व्यवस्था नाही.

२) धर्म जग काय आहे ते सांगतो तो वर्णनात्मक आहे.

३) आत्मा, कर्मकांडे, पूजा-अर्चा, पोथी-पुराणे धर्माच्या अनुषंगाने निर्माण होतात.

४) धर्म दुःख पचवण्यास भाग पाडतो.

५) धर्मामध्ये आत्म्याचा शोध आहे, त्यामुळे मोक्षाला महत्त्व आहे.

६) धर्म, ईश्वर केंद्रीत असल्याने मनुष्याला दुय्यम स्थान देऊन ईश्वर आणि मनुष्याच्या संबंधाबद्दलचे विचार आहेत.

७) धर्मात मोक्षाकडे घेऊन जाणारा प्रेषीत असतो.

८) धर्मामध्ये उत्तराधिकारी ठरविला जातो.

९) धर्माला राजकीय सत्तेचे बळ लागते. त्याशिवाय धर्म जगत नाही, वैचारिक बळ, जमिनादारांचे बळ, राजकीय बळ असल्यामुळे धर्म टिकून राहतो.

### धम्म :–

१) धम्म हा माणसा-माणसातील संबंधाचे विश्लेषण करतो, त्यामुळे तो सार्वजनिक आहे.

२) बुध्द हा धम्मात मार्गदाता आहे, मोक्षदाता नाही.

३) धम्मामध्ये मध्यस्थाची पध्दत नाही.

४) धम्मामध्ये बुध्दाचे स्थान वेगळे नसून तो सर्वसामान्य आहे.

५) धम्मामध्ये उत्तराधिकारी नाही, तर स्वत: प्रकाशमय व्हा.

६) धम्माला राजकीय सत्तेचे बळ लागत नाही. धम्म व्यक्तीच्या वैचारिक परिवर्तनाची शक्ती आहे. ही खरी धम्माची ताकद आहे.

७) धम्मात साक्षात्कार नाही तो कोणी निर्माण केलेला नाही. डॉ. आंबेडकरांच्या मते, धम्म हा एक शोध आहे. तो मानवी जीवनाच्या सखोल अभ्यासातून उद्‌भवला आहे.

८) धम्म बुध्दिवादावर आधारलेला असल्याने त्यात बुध्दीवादाला वाव आहे. सत्यशोधक वृत्ती, न्यायबुध्दी यांचा अंतर्भाव आहे.

९) धम्मातील सत्य हे अनुभवनिष्ठ आहे व विज्ञाननिष्ठ आहे. मनुष्याची विचारशक्ती आणि प्रयत्नातून त्याचा उगम होतो.

१०) धम्म जग काय आहे याचे विश्लेषण करून ते बदलण्याची भाषा करतो.

## ❑ अधम्म व सद्‌धम्म म्हणजे काय?

१) गौतम बुध्दाच्या मते, दैवी चमत्कारावर विश्वास ठेवणे म्हणजे अधम्म होय. तर कार्यकारणांचा शोध घेणे सद्‌धम्म होय.

२) अधम्मात परिणामांची काळजी नसते किंवा करीत नाही. पण सद्‌धम्म परिणामांच्याबाबत जागृत असून, परिणामांची काळजी करतो.

३) अधम्म ईश्वरावर विश्वास ठेवतो. सद्‌धम्म ईश्वरावर विश्वास ठेवत नाही.

४) अधम्मात जग हे कल्पनेतून रचलेले आहे. तर सद्धम्मात जग हे कल्पनेत रचलेले नसून विकास पावलेले आहे.

५) अधम्मात ईश्वरावर श्रध्दा किंवा विश्वास म्हणजे असत्यावरती विश्वास होय. तर सद्धम्मात फक्त सत्यावरच विश्वास ठेवला जातो.

६) यज्ञावर विश्वास ठेवणारा अधम्म, तर सद्धम्मात यज्ञावर विश्वास नसतो.

७) अधम्म काल्पनिक अनुमानावर अवलंबून असतो, तर सद्धम्मात काल्पनिकतेला विकृतीचे लक्षण मानले जाते.

८) धर्मग्रंथ प्रमाणित मानून केवळ त्यांचे पठण करणे म्हणजे अधम्म होय. तर सदाचार तत्त्वाचे आचरण करताना बौध्दिक, भौतिक मार्गांचा अवलंब करून ग्रंथप्रामाण्यवाद नाकारणे म्हणजे सद्धम्म होय.

९) या सर्व विवेचनावरून अधम्म म्हणजे विज्ञान नाही, तर सद्धम्म म्हणजे विज्ञान होय.

### स्वयं-अध्ययन प्रश्न-४

❒ **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. डॉ. आंबेडकरांनी बौध्द धम्माचा स्वीकार कधी केला?

२. धर्माच्या तिसऱ्या अवस्थेत कोणती समजूत रूढ झाली?

३. सदाचार म्हणजे काय?

४. देह शूचिता म्हणजे काय?

५. धम्म कशाची भाषा करतो?

## १.३ सारांश

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म अस्पृश्य जातीमध्ये झाला. अस्पृश्यांच्या अमानवीय जीवन पध्दतीचे अनेक चटक त्यांनी स्वत: सहन केले. पण अद्वितीय बुध्दीमत्तेच्या जोरावर डॉ. आंबेडकरांनी अमेरिका, ब्रिटन येथे उच्चशिक्षण संपादन केले. या बुध्दीमत्तेचा वापर भारताच्या सर्वांगीण विकासासाठी करण्याचा त्यांचा मनोनिग्रह होता. भारतातील विकासाच्या प्रक्रियेत अडसर असणारी विषमतावादी जात व वर्ग व्यवस्था नष्ट करण्याच्या हेतूने, जातीव्यवस्थेचे समूळ अध्ययन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

जातव्यवस्था ही ब्राम्हणी कृतीतून निर्माण झालेली अमानवीय प्रथा आहे, हे त्यांनी स्पष्ट केले. वर्ग व जात व्यवस्थेला हिंदू धर्मशास्त्राचा आधार असल्यामुळे, हिंदू धर्म शास्त्रेच नष्ट केली पाहिजेत असे त्यांचे मत होते. म्हणूनच त्यांनी मनुस्मृतीचे दहन करून सामाजिक समतेच्या लढ्याची सुरुवात महाड येथे केली.

हिंदू धर्म व्यवस्थेमध्ये सुधारणा घडून येतील, हिंदूमधील उच्चवर्णियांचे मतपरिवर्तन घडेल व अमानवी, विषमतावादी जातव्यवस्था, अस्पृश्यता नष्ट होईल. यासाठी वेगवेगळ्या कृती कार्यक्रमाद्वारे धर्म सुधारणा व मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी १९३५ पर्यंत केला. पण हिंदूची कर्मठ मानसिकता कोणताच प्रतिसाद देत नाही म्हटल्यावर त्यांनी येवला या ठिकाणी धर्मांतराची घोषणा केली. १९३५ ला केलेल्या धर्मांतराच्या घोषणेनंतर तब्बल २१ वर्षांनी त्यांनी धर्मांतर केले. या कालखंडात त्यांनी इतर सर्व धर्मांचा अभ्यास केला. पण भारतीय परंपरेतील व माणसाला-माणुसकीची शिकवण देणारा बौध्द धम्म त्यांना अधिक जवळचा वाटला. भारताच्या राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप असणाऱ्या बौध्द धम्माची दीक्षा डॉ. आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी घेतली. भारतातील अनुयायांना धम्माचे आकलन व्हावे यासाठी 'भगवान बुध्द अणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ लिहिला. आधुनिक भारताच्या उभारणीत बुध्द तत्त्वज्ञानातील स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वावर आधारीत भारतीय राज्यघटनेची निर्मिती डॉ. आंबेडकरांनी केली. त्या राज्यघटनेद्वारे भारतातील जनतेच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय बदलाची प्रक्रिया सुरू करून, सामाजिक संबंध नवमूल्यांवर म्हणजेच स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारित तयार होतील. अशी सर्वांगीण बदलाची प्रक्रिया डॉ. आंबेडकरांनी घडवून अआणली.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- **समताधिष्ठित** : समतेवर आधारलेला
- **बंधुता** : परस्पर प्रेम
- **शोषण** : पिळवणूक
- **दर्जाहीन** : निकृष्ट
- **विध्वंस** : नष्ट करणे
- **आंतरजातीय** : वेगवेगळ्या जातीमधील
- **अस्पृश्यता** : विशिष्ट समुदायाचा स्पर्श नाकारणारी प्रथा
- **निवारण** : उच्चाटन करणे

- **रक्तविरहित** : रक्त न सांडता
- **बहिष्कृत** : सर्व अधिकार व सत्तेपासून वंचित असलेला घटक
- **स्वातंत्र्य** : प्रत्येक व्यक्तीला संपूर्ण विकास करण्याची समानसंधी मिळणारी परिस्थिती
- **समता** : योग्य संधी/संधीची समानता

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❐ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१. रामजींनी कोणत्या कबीर पंथाची दीक्षा घेतली होती.

२. डॉ. आंबेडकरांनी मानववंश शास्त्राच्या परिसंवादात 'भारतातील जाती : त्यांची घडण, उत्पत्ती आणि वाढ' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

३. ब्रिटनमधील (१) लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अॅन्ड पॉलिटिकल सायन्स व (२) ग्रेज इन. या दोन शिक्षण संस्थेत डॉ. आंबेडकरांनी शिक्षण घेतले.

४. माणगांव परिषदेत राजर्षी शाहू महाराज डॉ. आंबेडकरांबाबत अस्पृश्यांचे उध्दारकर्ते व सर्व हिंदूस्थानचे पुढारी होतील अशी आशा व्यक्त करतात.

५. डॉ. आंबेडकरांच्या मते, भारतातील सर्व प्रकारच्या विषमतेला (१) ब्राम्हणवाद (२) भांडवलवाद हे दोन घटक कारणीभूत आहेत.

### ❐ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. महात्मा जोतिबा फुले यांनी १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली.

२. राजर्षी शाहू महाराजांच्या ऑक्टोबर १९२० मधील पुण्यातील सभेत विरोधकांनी दंगल केली.

३. दक्षिणेतील ब्राम्हणेत्तर पार्टीचे नाव 'जस्टिस पार्टी' असे होते.

४. १९२५ मध्ये रामस्वामी नायकर यांनी 'स्वाभिमान संवर्धन चळवळी'ला आरंभ केला.

५. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी १९०६ मध्ये 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना केली.

६. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली अस्पृश्यांची चळवळ ही अस्पृश्यांच्या आत्मोद्धाराची चळवळ होती.

## ❐ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

१. भारतातील लोक विवाहाच्या बाबतीत सपिंड व सगोत्र वधू-वरांचे विवाह हा धर्मभ्रष्टपणा मानतात.

२. वाढीव स्त्री-पुरुषांचा प्रश्न सोडविण्यासाठी हिंदूनी खालील तीन रूढी निर्माण केल्या :-

(१) सतीची रूढी.

(२) विधवेला पुनर्विवाहाची बंदी घालून सक्तीचे वैधव्य लादणे.

(३) बालविवाह.

३. अनुकरणाद्वारे जातीच्या घडणीला (१) ज्यांचे अनुकरण करावयाचे आहे त्यांना समाजात मानाचे स्थान पाहिजे. (२) समाजातील लोकांचे परस्परसंबंध विभिन्न व नित्य असले पाहिजेत अशी परिस्थिती आवश्यक असते.

४. डॉ. आंबेडकरांच्या मते, समाजसुधारणेसाठी लोकांची वागणुक ज्या धर्मशास्त्रावर आधारित आहे त्या धर्मशास्त्रावरील लोकांचा विश्वास उडाला पाहिजे.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, जातीभेद नष्ट करण्यासाठी 'आंतरजातीय विवाह पध्दती' अवलंबावी.

## ❐ स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ची उत्तरे

१. डॉ. आंबेडकरांनी बौध्द धम्माचा स्वीकार १४ ऑक्टोबर १९५६ रोजी केला.

२. धर्माच्या तिसऱ्या अवस्थेत 'देवानेच हे सर्व जग आणि माणसे निर्माण केली' अशी समजूत रूढ झाली.

३. मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात माणसा-माणसांतील व्यवहार उचित असणे म्हणजे सदाचार होय.

४. माणसाने हिंसा, चोरी आणि मिथ्याचार यापासून विरक्त होणे म्हणजे देहशुचिता होय.

५. धम्म जग काय आहे याचे विश्लेषण करून ते बदलण्याची भाषा करतो.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या बौध्दिक पार्श्वभूमीचे विश्लेषण करा.

२. ब्राम्हणेत्तर चळवळ ते डिप्रेस्ड क्लासेस चळवळीचा आढावा घ्या.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातव्यवस्थेचे विश्लेषण स्पष्ट करा.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जातव्यवस्थेची चिकित्सा स्पष्ट करा.

५. धर्म आणि धम्माचे विश्लेषण करून, अधम्म व सद्धम्म म्हणजे काय? ते स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ ग्रंथ


१. **धनंजय कीर :** 'डॉ. आंबेडकर'.

२. **डॉ. भी. रा. आंबेडकर :** *'भारतातील जाती : त्यांची घडण, उत्पत्ती आणि प्रसार'.*

३. **डॉ. बी. आर. आंबेडकर :** *'जातिव्यवस्थेचे निर्मूलन'.*

४. **डॉ. आंबेडकर :** *'राज्य आणि अल्पसंख्यांक'.*

५. **डॉ. आंबेडकर :** *'हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान'.*

६. **महर्षी विठ्ठल रामजी शिंदे :** *'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न'.*

७. **डॉ. जयसिंगराव पवार :** 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य'.

८. **डॉ. भी. रा. आंबेडकर :** *'भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म'.*

९. **डॉ. वैद्य, डॉ. कोठेकर :** *'आधुनिक भारताचा इतिहास'.*


❒❒❒

घटक–२

# डॉ.बी.आर.आंबेडकर यांचे राजकीय विचार
# ( Political Thought of Dr. B. R. Ambedkar )

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ डॉ. आंबेडकरांचे स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेविषयीचे विचार

२.२.२ डॉ. आंबेडकरांचे न्यायविषयक विचार

२.२.३ डॉ. आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ सरावासाठी स्वाध्याय

२.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्ट्ये

आधुनिक भारतीय राजकीय विचारांचे अनेक प्रवाह भारतात आहेत, त्यामध्ये उदारमतवाद, जहाल राष्ट्रवाद, समाजवाद, हिंदू राष्ट्रवाद, मुस्लिम राष्ट्रवाद दलिताचा विचारप्रवाह, साम्यवादी, नवमानवतावादी इत्यादी विचारांचा समावेश होतो. आधुनिक काळात विशेषत: फ्रेंच राज्यक्रांतीनंतर स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या तत्वाची जाणीव जगभर झाल्याचे दिसून येते. परंतु प्रत्येक देश हा या काळात स्वातंत्र्यासाठी संघर्ष करीत होता. प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता व स्त्रीविषयक विचार इत्यादी गोष्टीची चर्चा करावयाची आहे, कारण भारतामध्ये तेंव्हा अनेक जातीसमूहांना स्वातंत्र्य नव्हते, भारत हा देश ब्रिटिश अंमलाखाली आल्यानंतर जी प्रबोधन काळाची सुरूवात झाली, त्यामध्ये शिक्षित लोकांना स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या तत्त्वाची जाणीव

झाली. त्यातून अनेक विचारवंतांनी या तत्त्वाचा पुरस्कार केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले विचार महत्त्वाचे आहे, म्हणून ते अभ्यासणे गरजेचे आहे.

## २.१ प्रास्ताविक

भारत हा विविध जातीचे, धर्माचे, पंथाचे लोक वास्तव्य करणारा देश आहे. प्रादेशिक विविधता आणि मानवनिर्मित विषमता यामुळे देश एकात्मतेच्या भावनेने कधी एकत्र आला नव्हता. अशावेळी अनेक परकीय आक्रमणे झाली, आणि ब्रिटिशांनी दीडशे वर्षे भारतावर अधिसत्ता प्रस्थापित केली. भारतीय समाजामध्ये वर्षानुवर्षे असणाऱ्या वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थांमुळे समाजातील अस्पृश्य समाजाला स्वातंत्र्य समतेपासून दूर ठेवण्यात आले होते, त्याचबरोबर स्त्रीयांनाही अस्पृश्याप्रमाणेच वागणूक दिली जात होती. वर्णव्यवस्थेतून अनेक जाती, पोटजाती निर्माण झाल्या. समाजात जातिभेद उत्पन्न झाल्यामुळे जातीजातीत तीव्र द्वेष निर्माण झाला. त्याच्यात आपआपसात प्रेम, बंधुता, एकता राहिली नाही, त्यामुळे संपूर्ण समाज व्यवस्था खिळखिळी बनली. चार्तुवर्ण्य व्यवस्थेमुळे अस्पृश्य समाजाला हीन दर्जाचे काम करावे लागत होते. त्यामुळे त्यांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनवण्यात आले. त्याना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य मिळाले नाही. आंबेडकरांच्या मते, वर्णव्यवस्था ही पायरी नसलेली उतरंड आहे. तर जाती व्यवस्था धर्मावर आधारित आहे, त्यामुळे वर्णव्यवस्था जातिव्यवस्था नष्ट करून समाजातील प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय मिळवून देण्यासाठी आपले सारे जीवन त्यांनी व्यतित केले. डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत व अस्पृश्य वर्गाच्या उद्धारासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन आहे, असे स्पष्ट केले. बाबासाहेब म्हणतात की, स्वातंत्र्य हे माणसामाणसाच्या परस्पर संबंधाच्या बांधणीतून साकारावे लागते. ही बांधणी राज्यसत्तेमार्फतच शक्य होते. माणसाला व्यक्ती म्हणून आर्थिक, सामाजिक, स्वातंत्र्य लाभेल अशी समाजरचना कशी करायची या समस्येशी ते संघर्ष करीत राहिले आणि भारतीय समाजाला स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि स्त्रीयांना स्वातंत्र्य मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ डॉ. आंबेडकरांचे स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेविषयीचे विचार

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वाचा विचार केला तर ही तत्त्वे एकमेकांपासून वेगळी करता येत नाहीत. कारण स्वातंत्र्यातूनच समतेची मागणी करण्याची ताकद माणसाला मिळते आणि समता असेल तरच स्वातंत्र्याचा आशय अधिक समृध्द होतो आणि स्वातंत्र्य व समता निर्माण झाले, तरच लोकांमध्ये बंधुता निर्माण होते. आंबेडकरांच्या मते, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्वे वेगवेगळी नाहीत. त्या तिघांचा

मिळून एक संच आहे, त्या तिघांची मिळून एक त्रिगुणात्मक मूळ आहे, ती एकमेकांपासून अलग करण्याचा प्रयत्न केला तर लोकशाहीचा मूळ हेतू नष्ट होऊन जाईल. स्वातंत्र्य समतेपासून वेगळे करता येणार नाही व समतेची स्वातंत्र्यापासून फारकत होऊच शकणार नाही किंवा स्वातंत्र्य म्हणजे बहुसंख्यांकावर अल्पसंख्यांकांचे प्रभुत्व होय. स्वातंत्र्याशिवाय नुसतीच समता असेल तर ती वैयक्तिक कर्तृत्वशक्ती नाहीशी करू शकेल आणि बंधुभाव नसेल तर स्वातंत्र्य व समता यांचा नैसर्गिक विकास होऊ शकणार नाही, अशी मांडणी डॉ. आंबेडकरांनी केली आहे, परंतु अभ्यासाच्या सोयीसाठी स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यांचा स्वतंत्ररित्या अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ❑ आंबेडकरांचे स्वातंत्र्यविषयक विचार :-

स्वातंत्र्य हा शब्द लिबर्टी व फ्रीडम या दोन्ही इंग्रजी शब्दासाठी वापरण्यात येतो. काही लेखक लिबर्टीसाठी बंधनमुक्तता आणि फ्रीडम यासाठी स्वातंत्र्य असे शब्द वापरतात. परंतु हे सर्वमान्य नाही, परंतु स्वातंत्र्य म्हणजे सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, व्यक्तीने किंवा समूहाने स्वत:च्या स्वत्वाचे दृढकथन करणे होय. रॅसमे मूर यांच्या मते, व्यक्तीना किंवा राष्ट्र, धर्म, कामगार, संघटना यासारख्या नैसर्गिक व स्वयंस्फूर्त समूहांना आपल्या विचारांचे चिंतन, आविष्करण आणि त्यानुसार कृती करण्याचा आपल्या पध्दतीने कायद्याच्या संरक्षणाबरोबरच उपयोग करून घेण्याचा सुरक्षित अधिकार स्वातंत्र्यापासून मिळतो, परंतु त्यावर एक बंधन म्हणजे त्यांनी इतरांच्या अशाच अधिकारांना बाधा पोहचवता कामा नये, परंतु स्वातंत्र्याची संकल्पना काळानुरूप बदलत गेलेली दिसते. प्राचीनकाळी स्वातंत्र्य म्हणजे आत्मा पुनर्जन्मातून मुक्त होणे किंवा बर्नार्ड शां यांनी स्वातंत्र्य म्हणजे विश्रांती असा अर्थ सांगितला. मार्क्सच्या मते, स्वातंत्र्य हे फक्त समाजवादी समाजातच लाभू शकते, कारण तेथे विषमता नष्ट झालेल्या असतात. समता ही स्वातंत्र्याची एक पूर्व अट असली तरी समता व स्वातंत्र्य या संकल्पना समानार्थी नाहीत. हेगेलच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे कायदा असे समीकरण तो मांडतो तर जे. एस. मिल स्वातंत्र्याचे दोन प्रकार सांगतो. एक म्हणजे स्वसंबंधी स्वातंत्र्य असून व्यक्तीला अनिर्बंध स्वातंत्र्य असले पाहिजे त्यात विचारस्वातंत्र्य, बौध्दिक उपक्रम, धर्मकल्पना, व्यक्तीगत आवडी-निवडी इत्यादी घटकांचा अंतर्भाव होतो. त्याच्या मते, यात राज्याचा अजिबात हस्तक्षेप होता कामा नये. दुसरे म्हणजे परसंबंधी स्वातंत्र्य यामध्ये आपल्या स्वातंत्र्याचा परिणाम इतरांवर होता कामा नये. आपल्या स्वातंत्र्याचा वाईट परिणाम इतराच्या स्वातंत्र्यावर होऊ न देणे होय.

इसाया बर्लीन यांनी नकारात्मक स्वातंत्र्य आणि सकारात्मक स्वातंत्र्य मांडले आहे. प्रामुख्याने नकारात्मक मध्ये व्यक्तीच्या विकासातील अडथळे दूर करणे व सकारात्मकामध्ये व्यक्ती स्वत: होऊन स्वातंत्र्य मिळवण्याचे प्रयत्न करणे होय, तर टी. एच. ग्रीन यानी आपल्याला स्वातंत्र्याचे सकारात्मक प्रारूप सांगितले. माणसाला आपले वर्तन आपल्या स्वत:च्या इच्छेनुरूप व्हावे असे वाटत असते. भारतीय राजकारणामध्ये अनेक समाजसुधारकांनी समाजातील अनिष्ठ रूढी, प्रथा, परंपरा नष्ट करण्यासाठी

अनेक संस्थांच्या माध्यमातून कार्य केले आहे. प्रामुख्याने राजाराम मोहनरॉय, रानडे, आगरकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, गोखले इत्यादी विचारवंतानी सामाजिक जीवनातील अनेक समस्यांचे निराकरण करण्यासाठी कार्य केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र सामाजिक कार्याबरोबरच समाजातील पिडीत शोषित समाजासाठी कार्य करताना त्यांच्यामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता यांची जागृती करून ते त्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहे.

प्राचीन काळापासून भारतीय समाजव्यवस्थेचा स्वातंत्र्य, समता, बंधुता याच्याशी असलेला संपर्क क्षीण होता किंबहुना तो नव्हताच असे म्हणता येईल. कारण प्राचीन काळापासून भारतीय समाजाची रचना विषमतेच्या तत्त्वावर आधारलेली होती, त्यामुळे समता ही नाहीसी झाली होती. उच्चवर्णीयांकडून अस्पृश्यांचा अमानुष छळ होत होता, जातिव्यवस्था प्रचंड मोठ्या प्रमाणात होती. ही व्यवस्था बदलण्यासाठी आणि समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता प्रस्थापित करण्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लढा होता. त्यातून महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह असेल, काळाराम मंदिर प्रवेशाचा लढा असेल किंवा मनुस्मृती दहनाची ती कृती असेल. या सर्व गोष्टी या समतेच्या स्वातंत्र्याच्या प्रस्थापनेसाठी केल्याचे दिसून येते. भारतीय समाज हा जातीव्यवस्थेमुळे अस्पृश्यांवर अन्याय, अत्याचार करणारा समाज होता, त्यामुळे समाजात आर्थिक, सामाजिक विषमता निर्माण झाली होती. त्यांना कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. डॉ. आंबेडकरांनी भारतातील विषमता शोषण, दारिद्र्य याचे मूळ जातिव्यवस्थेत आणि पर्यायाने इथल्या हिंदू समाजव्यवस्थेत असल्याचे दाखवून दिले. त्यावरच न थांबता आयुष्यभर याविषयी समाज व्यवस्थेच्या विरोधात लढा पुकारला. विषमतायुक्त जातिव्यवस्था मोडून काढण्यासाठी अखंड चळवळ उभारली, त्यांनी मांडलेल्या विचारातून समाज जातमुक्त होऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता निर्माण होण्याच्या दिशेने कार्य केले आहे असे दिसते. आंबेडकर स्वातंत्र्याविषयी विचार मांडताना असे म्हणतात की, ब्रिटिशापासून स्वातंत्र्य मिळविणे हे स्वातंत्र्य लढ्यातील राजकारण होते. पण भारताचे राजकारण हे संविधानाचे स्वरूप कसे असावे, यासंबंधी होते. देशाला स्वातंत्र्य मिळणे म्हणजे लोक स्वातंत्र्य होणे असे नव्हे तर देश स्वतंत्र झाला असला तरी तेथील जनतेला स्वातंत्र्य असेल असे नाही. कारण समाज हा गटागटानी वा जाती वर्गामध्ये विभाजित झालेला असतो. त्याच्यामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे रुजवणे महत्त्वाचे असते. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्याचे विचार मांडताना त्याचे वेगवेगळे प्रकार सांगितले ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## १. राजकीय स्वातंत्र्य :-

डॉ. आंबेडकरांच्या मते, राजकीय स्वातंत्र्य म्हणजे सरकार स्थापन करण्यामध्ये आणि कायदा तयार करण्यामध्ये लोकांना सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला मत देण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्याचबरोबर निवडणूक लढवण्याचा सरकारबद्दल मत व्यक्त करण्याचा, राजकीय धोरणावर चर्चा करण्याचे राजकीय स्वातंत्र्य देण्यात आले आहे. डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत या सर्व गोष्टींचा

समावेश केला आहे, त्यामुळे हे राजकीय स्वातंत्र्य हे प्रत्येक व्यक्तीला मिळाले पाहिजे. राजकीय स्वातंत्र्य ही मागास जातीसाठी वर्गासाठी महत्त्वाची गोष्ट आहे की, ज्यामुळे त्यांना स्वत:चा विकास करता येईल. राजकीय स्वातंत्र्य नसेल तर स्वातंत्र्य आहे असे म्हणण्याला काहीच अर्थ रहात नाही.

## २. आर्थिक स्वातंत्र्य :-

स्वत:च्या सर्वांगीण विकासासाठी राजकीय बरोबर आर्थिक स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. समाजव्यवस्था ही विषमतेवर आधारलेली असल्यामुळे अस्पृश्य वर्गामध्ये आर्थिक संसाधने नाहीत, त्यामुळे त्यांना आपल्या उपजीविकेसाठी आणि विकासासाठी उन्नतीसाठी आर्थिक स्वातंत्र्य असले पाहिजे, जेणेकरून त्याना आपल्या गरजा पूर्ण करता येतील, त्यातून त्याना गरीबी दारिद्र्यापासून मुक्तता मिळेल. यासाठी शासनाने आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कार्य केले पाहिजे. अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे.

## ३. सामाजिक स्वातंत्र्य :-

सामाजिक स्वातंत्र्यामध्ये दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत, त्यात एक म्हणजे समाजातील स्वातंत्र्य आणि दुसरे म्हणजे दुसऱ्या समाजापासून स्वातंत्र्य. माणसाला हा आनंद उपभोगण्यासाठी समाजातील हुकूमशाही नष्ट झाली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला सामाजिक स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी प्रत्येक व्यक्तीने इतर व्यक्तीचे स्वातंत्र्य मान्य केले पाहिजे, त्यांनी प्रत्येकाला स्वतंत्र असल्याच्या भावनेतून सहकार्याने वागवले पाहिजे, त्यावेळेसच समाजामध्ये सामाजिक स्वातंत्र्य प्रस्थापित होते.

## ४. नागरी स्वातंत्र्य :-

डॉ. आंबेडकरांनी नागरी स्वातंत्र्यामध्ये स्वातंत्र्याची चळवळ निर्माण करण्यासाठी बोलण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, विचार करण्याचे स्वातंत्र्य, लिहिण्याचे स्वातंत्र्य, काम करण्याचे स्वातंत्र्य इत्यादी स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. सामाजिक समता व आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी ही सर्व स्वातंत्र्ये समाजातील प्रत्येक व्यक्तीला मिळाली पाहिजे, ही भूमिका त्यांनी मांडली.

याचबरोबर आंबेडकरांनी सांस्कृतिक, आध्यात्मिक, धार्मिक इत्यादी स्वातंत्र्याची हमी राज्याने व्यक्तीला दिली पाहिजे, अशी भूमिका मांडली आहे. व्यक्तीला कायद्याचे समान संरक्षण दिले पाहिजे. अशाप्रकारे स्वातंत्र्यासंदर्भात चर्चा केली आहे, त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत कलम १९ नुसार सर्व स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न केला आहे, कारण स्वातंत्र्य हे माणसामाणसाच्या परस्पर संबंधाच्या बांधणीतून साकारावे लागते ही बांधणी राज्यामार्फत शक्य होते.

## ❑ आंबेडकरांचे समतेविषयक विचार :-

स्वातंत्र्याइतकेच महत्त्वाचे लोकशाही तत्त्व म्हणून समतेचा उल्लेख करता येईल. समता ही संकल्पना ग्रीकांच्या काळात जात असली तर तिची व्याप्ती मर्यादीत होती. आधुनिक काळामध्ये समताही संकल्पना वापरण्यात येऊ लागली. समताही संकल्पना स्वातंत्र्याबरोबरच वापरली जाते. समता ही गोष्ट समाजात महत्त्वाची असते, कारण राज्यसंस्थेने सर्व नागरिकांना समानतेची वागणूक देणे आवश्यक असते. समता म्हणजे सार्वत्रिक सारखेपणा नाही तर समता जरी व्यक्ती-व्यक्तीमध्ये तफावत करत असली तरी राजकीय जीवनात भाग घेण्याच्या समान संधी ती सर्वांना देते. कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असतील. कोणत्याही प्रकारचे भेदभाव केले जाणार नाही अशी भावना होय. समतेचे तत्त्व हे जर स्वातंत्र्य नसले तर प्रस्थापित होऊ शकत नाही आणि समतेशिवाय स्वातंत्र्य उपभोगता येत नाही. डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्याबरोबर समता आणि बंधुतेच्या तत्त्वाचा ही पुरस्कार केला आहे. कारण भारतीय समाज हा विषमतेने बनला आहे. डॉ. आंबेडकर सांगतात की, फ्रेंच राज्यक्रांतीने समतेचा पुरस्कार केला. काही लोकांच्या मते, जगात वेगवेगळ्या गुणवत्तेची माणसे आहेत, सर्व माणसे समान नाहीत म्हणून त्याच्यामध्ये समानता प्रस्थापित करणे शक्य नाही. सर्व माणसे सारख्या गुणवत्तेची नाही, ती समान नाहीत ही गोष्ट बाबासाहेबांना मान्य आहे, तरीही ते म्हणतात की, सर्व माणसे समान आहेत, हे आपल्या वागण्याचे मुख्य सूत्र असले पाहिजे, त्याच्यामते तीन बाबी महत्त्वाच्या आहेत.

१) माणूस विकास करीत असताना त्याला मिळणाऱ्या अनुवांशिक वारशाचा तो लाभ घेत असतो.

२) सामाजिक वारसा ज्यात त्याचे आई-वडिलांनी घेतलेली काळजी, शिक्षण व त्याच्या जातीच्या व कुटुंबाच्या जवळ असणारा ज्ञानाचा साठा याचा त्यास लाभ होत असतो.

३) व त्याचे प्रयत्न.

बाबासाहेबांच्या मते, या तिन्हीबाबत माणसे समान नसतात हे खरे आहे, पण त्याच्यात असमानता आहे म्हणून आपण त्याच्याशी असमानतेने वागणे योग्य नाही. तसे वागले तर असमानताच वाढेल म्हणून लोकशाहीचा मुख्य उद्देश समाजात समता प्रस्थापित करणे हा आहे. डॉ. आंबेडकर समतेचा विचार करताना असे म्हणतात की, विषम समाजात आंधळेपणाने आपणास समतेचे तत्त्व लागू करता येत नाही, तेथे जे लोक मागास आहेत. त्याच्यासाठी काही खास सवलती देऊन त्यांना पुढारलेल्या लोकांच्याबरोबर आणणे गरजेचे असते. डॉ. आंबेडकरांची समानतेची मांडणी खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

## १. राजकीय समता :–

राजकीय समता प्रत्येक व्यक्तीला मिळाली पाहिजे, संधीची समानता मिळणे आवश्यक आहे, कारण प्रत्येक व्यक्तीला राजकीय स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी राजकीय समता आवश्यक आहे. कारण भारतीय समाज हा विषमतेवर आधारलेला आहे. मागास जातीच्या लोकांना राजकीय जीवनामध्ये कोणत्याही प्रकारची संधी दिली जात नाही, त्यामुळे त्यांना राजकीयदृष्ट्या निवडणूक लढविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती, जेणेकरून राजकीय क्षेत्रामध्ये मागासवर्गीय समूहाना प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळेल. सर्वांना मताधिकार देऊन राजकीय समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केला आहे.

## २. सामाजिक समता :–

भारतीय समाज विषमतेचा मूळ स्रोत असल्यामुळे डॉ. आंबेडकरांचा सर्व लढा हा समाजात विषमता दूर करून समता प्रस्थापित करण्यासाठीच आहे. कारण समाजातील विषमता नष्ट झाल्याशिवाय आर्थिक व सामाजिक प्रगती होत नाही, म्हणून डॉ. आंबेडकरांनी सर्वांना समान दर्जा समाजामध्ये प्राप्त झाला पाहिजे, अशी भूमिका मांडली आहे. ही सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी कलम १५ व १७ मध्ये तरतूदी करण्यात आल्या आहेत, कारण समाजामध्ये अस्पृश्यता पाळणे हे कायद्याने गुन्हा ठरविण्यात आले आहे, त्यामुळे सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी हा कायदा महत्त्वाचा मानला जातो.

## ३. आर्थिक समता :–

सामाजिक विषमतेमुळे आपोआपच आर्थिक विषमता वाढीस लागते, त्यामुळे समाजातील उच्चवर्गीय, उच्चजातीय समाज मागासवर्गाचे आर्थिक शोषण करतो, त्यामुळे आंबेडकरांनी समाजातील शोषित पीडित आणि वंचित समाजाच्या विकासासाठी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते. सामाजिक वंचित अनुसूचित जातीजमातीना इतर मागासांसाठी रोजगार किंवा सेवामध्ये प्रतिनिधीत्व द्यावे. म्हणजेच त्यांना नोकऱ्यात आरक्षण द्यावे असे सांगितले. त्यांच्या मते, केंद्र सरकार, राज्य सरकार ज्या सेवामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व द्यावे अशी भूमिका मांडली व कलम १६ मध्ये त्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेच्या तत्वाचा विचार करून समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला आहे, जे मताधिकार प्रत्येक व्यक्तीला एकच मत देण्याचा अधिकार दिला त्यातून राजकीय समतेचा प्रवाह आर्थिक व सामाजिक समतेच्या दिशेने वहात जातो. आंबेडकरांच्या दृष्टीने समता हे सर्वश्रेष्ठ लोकशाहीचे मूल्य आहे. स्वातंत्र्य आणि समता यापैकी बाबासाहेबांनी समतेला

प्राधान्य देतात. मंदिर प्रवेश, चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृतीचे दहन या लढ्यातून डॉ. आंबेडकर हे स्वातंत्र्याचा जसा विचार करतात तसेच हे लढे समतेसाठी होते याचाही विचार करतात. एकूणच समतेच्या तत्वाची चर्चा आंबेडकरांनी प्रामुख्याने भारतीय समाजातील विषमतेच्या संदर्भातच केली आहे. समतेबरोबर न्याय, समान दर्जा, समान संधी यांना आंबेडकर जास्त महत्त्व देतात. एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समता, स्वातंत्र्याचा लढा हा भारतातील विषमतेच्या तत्वावर विभागलेल्या समाजव्यवस्थेच्या विरोधातला होता. तो समतेच्या प्रतिष्ठापनेसाठीचा होता. बाबासाहेबांचा विचार हा गेल्या हजारो वर्षांपासून जातीच्या नावावर दबल्या गेलेल्या शोषण आणि विषमतायुकत व्यवस्थेलाच पराभव करण्याचा विचार होता, ते म्हणतात, राजकीय, धार्मिक, सामाजिक व आर्थिक बाबतीत समतेचे तत्त्व लागू करणे म्हणजे समाजरचना नीतीच्या पायावर उभी करणे होय.

## ❑ आंबेडकरांचे बंधुतेविषयक विचार :-

स्वातंत्र्य व समता यांच्यापेक्षा बंधुभावाच्या तत्त्वाची व्याख्या करणे निश्चितच अवघड आहे, कारण बंधुभाव हे तत्त्व असल्यापेक्षा ती एक कल्पना आहे. स्वातंत्र्य आणि समता ही तत्त्वे व्यक्तीला व्यक्तीगतरित्या आवश्यक असतात, तर बंधुता या तत्वाची व्यक्तींना सामूहिकरीत्या आवश्यकता असते. सामाईकतेची भावना हा बंधुभावाचा मानसिक पैलू असला तर एकजूट किंवा सहकार्य हा त्याचा राजकीय पैलू आहे. व्यक्ती ज्या गटात, राज्यात, राष्ट्रात राहते, त्याच्याविषयी तिला आत्मीयता वाटते. एका समान हेतूसाठी अनेक व्यक्ती एकत्र झटतात, तेव्हा त्याच्या ठिकाणी एकजूटीची भावना निर्माण होते. बंधुभाव, राष्ट्रभावना व देशभक्ती या तिन्ही संज्ञा राजकीय क्षेत्रात वारंवार वापरल्या जात असल्या तरी बंधुभाव ही संज्ञा सर्वाधिक व्यापक व समावेशक आहे. कारण व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास करावयाचे असेल तर तेथे बंधुभाव निर्माण झाला पाहिजे. परंतु भारतीय समाजव्यवस्थेमध्ये विषमता असल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी हिंदू समाजामध्ये बंधुभावाची भावना नाही असे म्हटले, कारण हिंदू असे प्रमाण मानतो की, ब्राम्हण हे ब्रम्हाच्या तोंडातून जन्मला, क्षत्रीय हे छातीमधून जन्मला, वैश्य हे त्याच्या मांडीतून जन्मले आणि शूद्र हे त्याच्या पायाभूत जन्मला. हे चार वर्ण एकमेकांपासून वेगळे आहेत. ब्राम्हण हे क्षत्रियाचे भाऊबंद होऊ शकत नाही. क्षत्रिय वैश्याचे व वैश्य शूद्राचे भाऊबंद होऊ शकत नाही. म्हणजेच कोणत्याही प्रकारचा बंधुभाव या वर्ण व्यवस्थेमध्ये नाही. मूळात माणसे ही सर्व समान आहेत, यावर त्यांचा विश्वास नाही. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी समाजात बंधुभाव निर्माण झाला पाहिजे, अशी भूमिका मांडली आहे.

डॉ. आंबेडकरांना स्वातंत्र्य आणि समता याच्यापेक्षाही बंधुभावाचे तत्व जास्त महत्त्वाचे वाटते. माझ्या तत्त्वज्ञानात बंधुतेला फार उच्च स्थान आहे. स्वातंत्र्य नि समता यांच्याविरुध्द संरक्षण फक्त बंधुभावनेतच आहे, असे ते म्हणतात. गतिक्षमता, परस्परसंवाद, सहकार्य व सहजीवन, समकेंद्री समाजरचना ही बंधुभावाची लक्षणे आहेत. बंधुभाव हे लोकशाहीचे दुसरे नाव होय. आपल्या

सभोवतालच्या माणसाबद्दल आदराची भावना म्हणजे बंधुभाव होय. समाज एकरूप असावा असे आंबेडकरांना वाटत होते. पण ही एकरूपता कोणाच्या माघारीतून किंवा कोणाच्या पुढारीपणापासून येऊन चालणार नाही, तर ती नि:स्वार्थ व्यक्ती प्रतिष्ठेच्या आणि समान दर्जाच्या पायावर उभी राहून त्यातून एकरूप समाज निर्माण होईल. सत्तेचे समाजाच्या वेगवेगळ्या घटकात योग्य आणि न्याय वाटप झाले पाहिजे व समाजाच्या विविध घटकात समानता आली पाहिजे, त्याच्या मनात बंधुतेची भावना निर्माण झाली पाहिजे, अशी डॉ. आंबेडकरांची भूमिका होती.

डॉ. आंबेडकरांच्या मते, बंधुता म्हणजे हिंदी राष्ट्रातले सर्व हिंदी लोक हे आपले बांधव आहेत. आपण हिंदी लोक हे आपले बांधव आहेत. आपण हिंदी लोक भाऊ-भाऊ आहोत. ही भावना या तत्वामुळे सामाजिक जीवनाच्या एकजिनसीपणाला बळकटी येते. ही गोष्ट घडून आणणे फार कठीण आहे, म्हणून डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, आपण एक राष्ट्र आहोत हे मान्य करावयास अमेरिकन लोक जसे तयार नव्हते, तसे आपण हिंदी लोक एका राष्ट्राचे घटक आहोत असे मानणे, हे समजणे किती दुर्घट आहे, हे सांगण्याची जरूरी नाही कारण भारतीय समाज हा हजारो जातीनी विभागलेला आहे, त्यामुळे सामाजिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या आपण एक राष्ट्र नाही हे जितक्या लवकर आपणास समजून येईल तितके चांगले आहे. कारण एक राष्ट्र होण्याची जरूरी आपल्याला मान्य होईल आणि हे ध्येय साध्य करण्यासाठी उपाययोजना करण्याचा आपण मन:पूर्वक विचार करू. जर याचा विचार केला नाही तर हिंदुस्थानात हजारो जाती आहेत. या जाती राष्ट्रविरोधी आहेत, इतकेच नव्हेतर त्यायोगे सामाजिक जीवनात विघटन निर्माण होते. आपणाला एक राष्ट्र व्हावयाचे असेल तर आपण या अडचणीवर विजय मिळवायला पाहिजे. जेव्हा एक राष्ट्र असेल तेव्हाच बंधुत्वाच्या भावनेला खराखुरा अर्थ प्राप्त होईल. त्यामुळे डॉ. आंबेडकरानी हिंदी भाषा आपली भाषा म्हणून अंगीकारणे क्रमप्राप्त आहे असे स्पष्ट केले आहे. त्यासाठी समाजामध्ये जात, वर्ण आणि याच्याविना सामाजिक बंधुता प्रत्यक्षात आणणे आवश्यक आहे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे.

डॉ. आंबेडकरांच्या स्वातंत्र्य, समता, बंधुभाव यांच्याविषयी काय म्हटले आहे, त्याची चर्चा आपण केली. पण या तत्त्वाचा आग्रह त्यांनी ज्या गोष्टीसाठी धरला होता, तो संदर्भ महत्त्वाचा आहे. आंबेडकर केवळ तत्त्वे म्हणून ही चर्चा करत नाहीत. तर भारतीय समाजाची उभारणी या तत्त्वत्रयीच्या आधारे करावी असे ते सांगत होते. कारण भारतीय समाज हा विषमतेच्या तत्त्वावर उभारलेला आहे म्हणजे काहीना उच्च स्थान मिळाले आहे व इतरांना ही अवस्था प्राप्त झाली आहे. आर्थिक क्षेत्रातही अशीच विषमता आहे ही विषमता जातीव्यवस्थेवर आधारित असल्यामुळे स्वातंत्र्य, समता, बंधुता निर्माण करण्यासाठी जातीव्यवस्था फार मोठा अडथळा आहे. जातीव्यवस्थेमध्ये व्यक्तीचे शिक्षण व्यवसाय स्वातंत्र्य अमान्य केले जाते. समाज दर्जाचा अभाव हे जातिव्यवस्थेचे मूलतत्त्व आहे. माणसाची व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा न मानणाऱ्या सामाजिक चौकटीत बंधुभावाचा प्रश्नच उद्‌भवत नाही, तेव्हा स्वातंत्र्य, समता, बंधुभावाचा अभाव असलेल्या समाजामध्ये आंबेडकरांनी या तत्वाचा आग्रह धरला आणि ही

तत्त्वे प्रस्थापनेसाठी प्रस्थापित समाजाच्या विरोधात लढा दिला आणि भारतीय राज्यघटनेमध्ये स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयींचा समावेश केला आहे. त्यांनी अनेक चळवळी उभ्या केल्या या सर्व गोष्टी करत असताना त्यांची जात विरोधी चळवळ ही जातीयवादी बनत नाही. एकीकडे जातविरोधी लढा सुरू ठेवत, धर्मांतराची मोट बांधताना जातीच्या दबावाखाली वर्षोनुवर्षे पिचल्या गेलेल्या दलित समाजाला स्वातंत्र्य, समता व बंधुभाव मिळवून देण्याचा प्रयत्न त्याच्यातील नाविन्यपूर्ण गोष्ट ठरते. हिंदू धर्म हा वर्गाच्या विषमतेवर आधारित असल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी असे म्हटले की, जोपर्यंत जातिसंस्था अस्तित्वात राहील तोपर्यंत आपणास हिंदू समाजात समान दर्जा मिळणे शक्य नाही. म्हणून बौध्द धर्म हा स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूल्यावर आधारित असलेल्या लोकशाही राज्यपध्दतीशी सुसंगत आहे, अशी खात्री बाबासाहेबांना वाटल्याने त्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला आणि लाखो लोकांना बौध्द धर्म स्वीकारण्यास संधी दिली. थोडक्यात, फ्रेचं राज्यक्रांतीतून पुढे आलेली सूत्रे स्वातंत्र्य, समता व बंधुता नवीन समाजाचा पाया असला पाहिजे. परंतु फ्रेंच राज्यक्रांतीला समता निर्माणकरता आली नाही, उलट रशियन क्रांतीने समता निर्माण करताना स्वातंत्र्याचा बळी दिला. या तीनही गोष्टी एकाचवेळी हव्या असतील तर त्यानाही बौध्द धर्मक्रांतीच पाहिजे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे.

## २.२.२ डॉ. आंबेडकरांचे न्यायविषयक विचार

जस्टिस या शब्दाचे मूळ जस (Jus) या लॅटिन शब्दात असून त्यांचा शब्दश: अर्थ जोडणे, बसवणे, एकत्र बांधणे असा होतो, आणि लाक्षणिक अर्थ माणसांना समाजात योग्य जागी जोडणाऱ्या वा बसवणाऱ्या सामाईक परंपरा असा होतो. समन्वय घालणे व सम्यक बोध देणे, या न्यायाच्या कार्याबद्दल जगात सर्वज्ञात आहेत. न्यायाची कल्पना कायद्याच्या आधाराखेरीज व कायद्याच्या कक्षेबाहेर केलीच जाऊ शकत नाही. कारण कायद्याच्या बाहेरही न्याय असेल तर ते मनमानी अनपेक्षित निकाल देऊ शकतो. म्हणून न्याय हा कायद्यावरच आधारित असावा. न्याय हा तीन कसोटीवर उतरणे आवश्यक आहे ते पुढीलप्रमाणे :-

१) त्या निर्णयाला कायद्याचा स्पष्ट आधार असावा.

२) जर परिस्थितीनुसार वा विशिष्ट कारणांनी भेदभाव केला असेल तर त्या भेदभावाला कायद्याचे समर्थन असावे.

३) केल्या जाणाऱ्या भेदभावामध्ये तारतम्य असावे.

असे असले तरी प्राचीन काळापासून सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेवर आधारित समाजामध्ये आज सामाजिक न्याय ही संकल्पना उदयास आली आहे. लोकशाही मूल्य समाजात रूजत असताना सामाजिक न्याय. ही संकल्पनेचा विकास झाला आहे. सामाजात ज्या वस्तूची व सेवांची

निर्मिती होते त्यांचे वितरण संपूर्ण समाजातील व्यक्तीना रास्त व योग्य प्रकारे झाले पाहिजे. सर्वांच्या प्राथमिक गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत त्या गरजा भागवण्याच्या प्रत्येकाला हक्क असला पाहिजे, त्याशिवाय ज्या वस्तू व सेवा निर्माण होतील त्याचे समतेच्या, न्यायाच्या व रास्ततेच्या तत्वावर वाटप झाले पाहिजे ही सामाजिक न्याय या संकल्पनेची मुख्य सूत्रे आहेत. सामाजिक न्यायाची संकल्पना आधुनिक काळामध्ये जॉन रॉल्स यानी प्रचलित केली आहे, त्याच्या सिध्दांतामध्ये खालील तत्त्वे सांगितली आहेत.

१) सर्व माणसांना सर्व प्रकारचे अधिकार प्राप्त झाले पाहिजेत. नागरी अधिकाराचे वाटप समाजातल्या सर्व घटकामध्ये समानरित्या झाले पाहिजे.

२) समाजातील विषमतामध्ये हे वाटप अशा प्रकारे करण्यात यावे की, ज्यामुळे जास्तीत जास्त वंचित असणाऱ्या वंचित समाजाचा लाभ होईल.

३) क्र. १ व क्र. २ या तत्त्वामध्ये संघर्ष निर्माण झाला तर क्र.१ स्वातंत्र्याचे तत्त्व हे जास्त प्रभावी राहिल.

अशाप्रकारे सामाजिक न्यायाची कल्पना जॉन रॉल्स यांनी मांडली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गरीब, पीडित, वंचित, अस्पृश्य इ. वर्गातील समाजघटकांचा उध्दार करण्यासाठी लढा दिला. त्यांनी सैध्दांतिक विचाराबरोबर व्यावहारिक विचार मांडलेले आहेत. हे विचार मांडताना वर्ग संघर्षातून विशिष्ट आर्थिक व सामाजिक गटांच्या लाभ व्हावा हा उद्देश नव्हता. तर संपूर्ण मानवाच्या कल्याणाचा विचार केलेला आहे. हे विचार समता साध्य करण्याबरोबर सामाजिक न्यायाला प्राधान्य देणारे होते. डॉ. आंबेडकरांनी केलेल्या प्रबोधन कार्यामुळे भारताच्या घटनेत सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा विचार करण्यातआला.

## १. सामाजिक न्याय :-

सामाजिक न्यायाची संकल्पना ही मुख्यत्वे समाजातील सर्व माणसे समान आहेत, त्यांच्यात धर्म, वंश, जात, रंग, संप्रदाय यावरून भेदभाव केला जाऊ नये अशी आहे. सामाजिक न्यायाच्या या संकल्पनेचे प्रतिबिंब भारतीय राज्यघटनेच्या १५ व्या कलमात पडलेले आहे. या १५ व्या कलमाचा एक भाग असा आहे की, स्वतंत्र भारतातील कोणत्याही नागरिकांत केवळ ते विशिष्ट धर्माचे वंशाचे जातीचे लिंगाचे जन्मस्थान असलेले आहेत, म्हणून किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून त्याच्यात भेदभाव केला जाणार नाही. या कलमातील केवळ आणि यापैकी कोणत्याही कारणावरून हे दोन शब्द असे सूचवितात की, कलम १५ (१) मध्ये ज्या कारणाचा उल्लेख केलेला नसेल अशा कारणामुळे जर भेदभाव केला तर त्यामुळे कलम १५ (१) चे उल्लंघन झाले असे मानता येणार नाही.

डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्यानंतरच्या बऱ्याच मोठ्या कालखंडानंतर सामाजिक न्यायाच्या दृष्टीने बऱ्याच तरतूदी करण्याला प्रेरणा मिळाली आहे. फक्त समता देऊन चालत नाही तर समतेचा उपयोग करण्यासाठी दुर्बल घटकांना सक्षम करण्याची आवश्यकता आहे. यासाठी समान संधी उपलब्ध करून देऊन सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याची आवश्यकता आहे. समाजाला फक्त स्वातंत्र्य देवून चालत नाही, तर दुर्बल, उपेक्षित, पीडित गटातील लोकांना सुरक्षा, सन्मान आपुलकी, विश्वास, आदर मिळाला पाहिजे. समाजाच्या सर्व क्षेत्राच्या व्यवहारात सहभागी करून घेतले पाहिजे. समाजाचा अधिकार म्हणून हे सर्व मिळाले पाहिजे, तर खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय समाजात निर्माण झाला असे म्हणता येईल. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते की, सामाजिक न्यायावर आधारलेल्या समाजाची उभारणी करणे हे राज्यसंस्थेचे कार्य आहे. व्यक्तीला परिपूर्ण जीवन जगता येईल अशा सामाजिक पर्यावरणाची निर्मिती राज्यसंस्थेने केली पाहिजे, त्यासाठी आधी वस्तुस्थितीचे यथार्थ निदान केले जावे असे आंबेडकराना वाटते. आहे ती वस्तुस्थिती आहे तशीच वस्तुस्थितीचे विनाकारण आदर्शावरून करण्याच्या भरीस पडू नये कारण अंतिम परिणामाच्या दृष्टीने ते घातक ठरू शकते. त्यातून; सामाजिकदृष्ट्या पुष्टीच मिळते. सामाजिक संबंध कधीच ताठर असून चालणार नाही. परिस्थिती सापेक्ष बदल त्यात घडवून आणायलाच हवा आणि हा बदल घडवून आणण्याचे कार्य आंबेडकरांच्या मते, सामाजिक न्याय करीत असतो. डॉ. आंबेडकरांची न्याय ही संकल्पना शेवटी स्वातंत्र्य, समता, बंधुता यांच्यामुळेच प्राप्त होईल, अशी भूमिका होती. ते असे ही म्हणतात की, स्वातंत्र्य, समता, बंधुतेचे दुसरे नाव म्हणजे न्याय होय. आंबेडकरांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यास भारतीय घटनेमध्ये तरतूद केली आहे, त्यासाठी ३४०, ३४१ कलम आहे. सामाजिक न्यायाचा विचार करताना जेव्हा संरक्षित भेदभावाचे तत्त्व स्वीकारण्यात येते. त्यावेळी हा संरक्षित भेदभाव समाजातील नेमक्या कोणत्या जनसमूहासाठी करावयाचा यासंबंधी काहीतरी कसोटी लावणे भाग असते. भारतीय समाजामध्ये अशा प्रकारच्या कसोट्या लावण्याचा प्रयत्न केला तरी सर्वमान्य होतील, असे वाटत नाही. म्हणून त्यासंबंधी आयोगाची निर्मिती करून त्याद्वारे हा प्रश्न फिरविण्याचा प्रयत्न केला आहे.

सामाजिक न्यायालयाना तीन बाजूचा विचार करावा लागतो.

## (अ) सामाजिक बाजू :-

समाजामध्ये निसर्गाने व्यक्तीला कमीअधिक गुणवत्ता देऊन केलेला भेद व समाजाने अनैतिक दृष्टीने सामाजात उच्च-नीच अस्पृश्यता हा जो भेद निर्माण केलेला आहे हे दूर करणे हा सामाजिक न्यायाचा महत्त्वाचा उद्देश आहे. सामाजिक न्यायामध्ये वंश, वर्ण, लिंग, जात व पंथ हे भेदभावाचे निकष निरुपयोगी ठरवून अन्यायाचे निराकरण करणे हे सामाजिक न्यायात साध्य केले जाते. दुर्बल घटकांना विशेष संधी व सोयी देऊन 'बचावात्मक भेदभाव' करून सामाजिक न्याय प्रस्थापित करते. वंचित लोकांचा जास्तीत जास्त विकास व्हावा अधिकार मिळावेत हे अभिप्रेत आहे, म्हणून असे म्हणू शकतो

की, निसर्गाने व समाजाने निर्माण केलेल्या विषमताना, मानवी विवेकबुध्दीनी केलेला आव्हान म्हणजेच सामाजिक न्यायाचं स्वरूप होय.

### (ब) राजकीय बाजू :-

सर्वांना राजकीय अधिकार आणि प्रशासन सेवांची संधी देताना कोणत्याही म्हणजेच धर्म, लिंग, जात, वंश, वर्ण या आधाराने विचार करू नये असा अर्थ अभिप्रेत आहे. त्याचबरोबर व्यक्तीला राजकीय अधिकार देत असताना सामूहिक हितावर गदा येणार नाही हे बघणे सामाजिक न्यायाचे उद्देश किंवा कार्य आहे.

### (क) आर्थिक बाजू :-

प्रत्येक व्यक्तीला रोजगार, निरोगी जीवनमान, योग्य अन्न, वस्त्र, निवारा या ज्या मूलभूत गरजा आहे, या हक्क म्हणून मिळायला पाहिजेत कारण या गोष्टी जर माणसाला मिळत नसेल तर व्यक्तीच्या स्वातंत्र्याला कवडीची किंमत राहणार नाही, त्याची प्रतिष्ठा राहणार नाही, ह्यामुळे मूलभूत गरजा पूर्ण करणे राज्यसंस्थेचे कर्तव्य आहे. आर्थिक न्यायामध्ये आर्थिक विषमतेची दरी प्रमाणाबाहेर होऊ नये व आर्थिक अवाजवी केंद्रीकरण होऊ नये आणि सर्व समाजातील तळागाळातील लोकांना त्याचा लाभ व्हावा अशी डॉ. आंबेडकरांची अपेक्षा होती.

अशाप्रकारे सामाजिक न्यायाच्या तीन बाजू आहेत, त्यानुसार सामाजिक न्याय व्यवस्था ही समाजामध्ये स्थापन करताना या सर्व बाजूचा विचार घेणे गरजेचे आहे असे ते म्हणत.

## २. राजकीय न्याय :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी न्यायासंबंधी विचार करताना सामाजिक, आर्थिक त्याचबरोबर राजकीय न्यायासंदर्भात चर्चा केली आहे, कारण समाजातील प्रत्येक घटकाला राजकारणात प्रतिनिधीत्व मिळावे यासाठी अनुसूचित जाती व जमाती यांना लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद राज्यघटनेत केली आहे. त्याचबरोबर समाजातील श्रीमंत, गरीब असा भेदभाव न करता राजकीय न्यायाच्या दृष्टीकोनातून प्रत्येक व्यक्तीला एकच मत देण्याचा अधिकार देण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीयामध्ये नैतिकतेच्या तत्वाला महत्वाचे स्थान दिले आहे. समाजातील कोणत्याही व्यक्तीला राजकीय क्षेत्रात निवडणूकीला उभे राहण्याचा, लढवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. कोणत्याही समाजातील व्यक्तीला धर्म, जात पंथावरून भेदभाव केला जाणार नाही. प्रत्येक व्यक्तीला न्यायाच्या दृष्टीने राजकीय संधी मिळाली तरच त्यांना आपली प्रगती करता येते, त्यामुळे डॉ.आंबेडकरांनी २६ नोव्हेंबर १९४९ च्या भाषणात प्रत्येक व्यक्तीला राजकीय स्वातंत्र्य दिले म्हणून आर्थिक व

सामाजिक स्वातंत्र्य प्रस्थापित करावयाचे आहे असे मत व्यक्त केले होते. एकूण राजकीय न्यायामध्ये व्यक्तीला राजकीय पदावर कार्य करण्याचा, निवडून येण्याचा, अधिकार देताना प्रत्येक घटकाला न्याय मिळाला पाहिजे याचा विचार डॉ. आंबेडकरांनी केला आहे. अशाप्रकारे राजकीय न्याय भारतातील प्रत्येक नागरिकाला मिळाला पाहिजे. राजकीय क्षेत्रात नैतिकतेने कार्य केले पाहिजे त्याशिवाय लोकशाही यशस्वी होणार नाही अशी भूमिका डॉ. आंबेडकरांची होती.

## ३. आर्थिक न्याय :-

भारतीय समाज सामाजिक आणि आर्थिक न्यायावर उभा करण्याची आणि सामान्य जनतेची पिळवणूक होणार नाही, याची हमी देण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी घटनेच्याद्वारे केले आहे. तर खाजगी मालमत्तेच्या अधिकारावर मर्यादाही घातल्या पाहिजेत. कलम ३१ रद्द केले पाहिजे, असा विचार होत असताना आंबेडकर असे म्हणतात की, मला विचारलं तर भारतीय राज्यघटनेचे ३१ वे कलम हे अतिशय दुष्ट स्वरूपाचे असून मला त्याकडे बघावेसे सुध्दा वाटत नाही. बहुमताच्या तत्त्वामुळे आंबेडकरांना त्याचा समावेश करावा लागला होता. परंतु कालांतराने ते नष्ट करण्यात आले आहे.

डॉ. आंबेडकरांनी जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेसारख्या सामाजिक प्रश्नामधून आर्थिक विषमता कशी झाली आहे, याचा सखोल विचार केला, कारण सामाजिक विषमतेतून आर्थिक विषमता निर्माण होते तर आर्थिक विषमता स्वातंत्र्य, समता, बंधुता या घटकांचा बळी घेते. म्हणून आंबेडकरांनी संपत्तीचे न्याय वाटप झाले पाहिजे, त्यासाठी आर्थिक न्याय प्रस्थापित करणे महत्त्वाचे मानले. राज्यसत्तेने काही महत्त्वाच्या व मौलिक उद्योगधंद्याची सूत्रे स्वत:कडे घेतलीच पाहिजे, तसे करण्यातून आर्थिक शोषणाला ती पायबंद घालू शकेल. त्याचबरोबर आर्थिक नियोजनाच्या काटेकोर आखणीतून व प्रभावी अंमलबजावणीतून राज्यसत्ता उत्पादन क्षमता वाढवूशकेल आणि मालमत्तेची न्याय विभागणी करू शकेल, त्यामुळे व्यक्तीचे हक्क खऱ्या अर्थाने सुरक्षित करण्याचा हा मार्ग आहे असे आंबेडकरांना वाटते. आर्थिक न्यायाचा विचार करताना त्यानी राज्य समाजवादाची मांडणी केली आहे. त्यांच्या राज्य समाजवादात व्यक्तीला भांडवलशाहीच्या तसेच भूक, बेकारी, भय, टंचाई इ. सामाजिक प्रश्न सोडविण्याचे सिध्दांत आहेत, त्यामध्ये उद्योगाचे राष्ट्रीयकरण करणे, सामूहिक शेती करणे, वस्तूचे न्याय वितरण करणे प्रत्येकाला जातीनुसार व्यवसाय न करता व्यक्तीच्या गुणानुसार व्यवसाय करण्याची संधी मिळाली पाहिजे अशी व्यवस्था होती. डॉ. आंबेडकराच्या मते, लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियंत्रण राज्याकडून झाले पाहिजे. यासाठी वस्तूचे उत्पादन व वितरण राज्याच्या कार्यक्षेत्रात येण्याची आवश्यकता आहे, त्यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही. समाजातील आर्थिक विषमता आणि गरीबी दूर करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. भारतीय समाजव्यवस्थेत जी आर्थिक सुरक्षितता निर्माण झाली आहे ती दूर करण्यासाठी तसेच सर्वांना विकासाची समान संधी मिळावी. समाजातील सामाजिक विषमता नष्ट व्हावी मजूरांना योग्य वेतन मिळावे व त्याना सुरक्षितता व स्वास्थ्य लाभावे. या दृष्टीनेच त्यानी राज्यसमाजवादाचा आराखडा तयार

केला होता. याचा प्रयत्नही करण्यात आला आणि डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शन तत्त्वात व्यक्तीची प्रतिष्ठा, सामाजिक न्याय, संधीची समानता व बंधुभाव या तत्त्वाचा समावेश केला. अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांनी आर्थिक न्याय व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु न्याय संकल्पना ही समाजात रुजवण्यासाठी समाजामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता प्रस्तावित होणे आवश्यक आहे डॉ. आंबेडकर असे म्हणतात, स्वातंत्र्य, समता व बंधुता याचे दुसरे नाव म्हणजे न्याय होय आणि समता स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यांच्या आधारावर एकजिनसी भारतीय समाज स्थापन करायचा आहे. अंतिमत: समाजातील जाती व्यवस्थेचे निर्मूलन करणे हेच ध्येय डॉ. आंबेडकरांचे आहे. एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या चारही तत्त्वांचा विचार करून बौध्द धर्माचा स्वीकार केला आणि भारतीय समाज व्यवस्थेतील शोषणयुक्त हिंदू धर्माचा त्याग केला.

## २.२.३ डॉ. आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार

भारतात चातुवर्ण्य जातीव्यवस्थाप्रणीत व्यवस्थेने समाजाचे विभाजन झाले आहे. जात, धर्म, वर्ण व लिंगावर आधारित विषमता प्रचंड मोठ्या प्रमाणात आहे. जातीमुळे जन्मत:च विशेष अधिकार मिळणाऱ्या जाती आपल्या कुटुंबातील स्त्रीयांसाठी समाजातील मागास, दुर्बल, अस्पृश्य जातीचे हजारो वर्षापासून शोषण करीत आल्या आहेत, त्याचबरोबर भारतात हिंदू धर्म मनुस्मृती व मनुस्मृतीच्या प्रभावामुळे निर्माण झालेली वैदिक परंपरा महानुभाव पंथ, वारकरी पंथ, भक्तिपंथ या सर्व व्यवस्थांनी स्त्रियांना कमी अधिकार व दुय्यमतेची वागणूक दिली आहे. भारतामध्ये मनूपूर्व काळात स्त्रीयांचा दर्जा हा उच्च होता. मात्र मनुस्मृतीने स्त्रीयांना हिनतेची वागणूक दिली आहे. स्त्रीयांना संपत्ती स्थान व सर्व प्रकारची स्वातंत्र्ये नाकारले गेले. हिंदू स्त्रीयांच्या अधोगतीस हिंदू धर्म व मनुष्य हेच कारणीभूत आहेत हे डॉ. आंबेडकरांनी आपल्या हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती या निबंधातून स्पष्ट केले आहेत. ख्रिस्ती व इस्लाम धर्मानीही स्त्रियांना समानतेची वागणूक दिली नाही. डॉ. आंबेडकरांनी त्याच्या निबंधात मनूनी स्त्रीयांसंबंधी केलेल्या कायद्याची माहिति देऊन पुढे असे म्हटले आहे की, मनू हा भारतातील स्त्रियांचा अंध:पात घडवून आणण्यास सर्वस्वी जबाबदार आहे, मनुने हे कायदे केले त्यामध्ये स्वत:च्या बुध्दिमत्तेचे अगर मौलिकतेचे प्रदर्शन केलेले दिसून येत नाही तर ब्राम्हणी धर्माचा उदय भारतात झाल्यानंतर ब्राह्मणाची स्त्रीयांसंबंधी जी विचारसरणी होती तीच मनूने आपल्या कायद्यात गोवली आहे. त्याचबरोबर शूद्र आणि स्त्रीया यांचा बौध्द धर्म स्वीकारण्याकडे जास्त प्रवाह निर्माण झाला होता, ते थांबवण्यासाठी मनूने आपला कायदा तयार केला आणि स्त्रीयांचे जीवन कायमचे खुरटून टाकले. म्हणून डॉ. आंबेडकरांनी स्त्रीयांच्या उन्नतीसाठी कार्य केले आहे.

डॉ. आंबेडकरांच्या पूर्वी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, आगरकर इत्यादी विचारवंतांनी स्त्रीयांच्या उध्दाराकरिता स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने कार्य केले आहे. फुले यांनी स्त्रीया दलित

कष्टकरी आणि शेतकरी यांच्या अन्यायाविरुध्द केवळ बंड केले नसून त्यानी कल्याणकारी सुधारणाच्या मार्गाने आदर्शवादी सार्वजनिक सत्यधर्माची स्थापना केली. १८४८ साली मुलीची पहिली शाळा पुण्यात सुरू केली. त्यापुर्वी बसवेश्वरानी ही स्त्रीयांच्या समानतेसाठी कार्य केले होते. आपले गुरू महात्मा फुले यांचे कार्य पुढे नेण्याचे काम डॉ. आंबेडकरांनी केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांचे जीवन उद्ध्वस्त करून टाकणाऱ्या अन्यायी मनू स्मृतीचे दहन महाड येथे १९२७ साली केले. कारण मनूस्मृतीने केवळ स्त्रीयांचे जीवन नष्ट केले नाही तर अस्पृश्याचे जीवन ही उद्धवस्त केले आहे. जातीव्यवस्थेचे समर्थन करणारा हा मनुस्मृतीचा कायदा होता त्यामुळे तो जाळला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांचे प्रबोधनही केले आहे. स्त्रीयांच्या स्वातंत्र्याविषयी प्रश्न सोडविण्यासाठी त्याच्या सभा आयोजित करणे त्या सभेचे प्रतिनिधीत्वही करण्याचे कार्य स्त्रीयांनी करावे असे ते सांगत होते. स्त्रीयांसाठी त्यानी वेगवेगळ्या ठिकाणी परिषदा घेतल्या त्या पुढीलप्रमाणे :-

१) २० मार्च १९२६ रोजी चवदार तळे सत्याग्रह (महाड)

२) ८ व ९ ऑगस्ट १९२० रोजी अखिल भारतीय दलित काँग्रेस नागपूर

३) २८ मार्च १९३४ रोजी अस्पृश्य महिला परिषद (मलकापूर, जि.बुलढाणा)

४) ३० व ३१ मे १९३४ इलाखा महार परिषद, मुंबई

५) ३ एप्रिल, १९३४ अस्पृश्य परिषद, बोरगाव, जि. वर्धा

६) १६ जून १९३६ देवदासी मुख्या जोगतिनी, अराधिनी पोतराज परिषद (परळ)

७) १९४४ साली महिला परिषद, कानपूर

९) १९४५ महिला परिषद, मुंबई

अशा परिषदा आयोजित करून महिलांच्या स्वातंत्र्य हक्कासाठी त्याच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. मलकापूर येथे अस्पृश्य महिला परिषदेत अस्पृश्य मुलामुलींना शिक्षणाच्या सोयी सरकारनी करू द्याव्यात. तसेच त्याना जादा सवलती द्याव्या असा ठराव ही मंजूर करण्यात आला. एकूणच स्त्रीयांच्या मनातील गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी स्वत:ची जाणीव करून देण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले आहे.

डॉ.आंबेडकरांनी महिलांच्या स्वातंत्र्यासाठी ज्या काही सभा, परिषदा घेतलेल्या होत्या आणि त्यावेळी जो स्त्रीयांशी संवाद साधला आहे, त्यातून त्यानी स्त्रीयांची कार्यशक्ती ओळखली, शिवाय त्या कोणतीही जबाबदारी पेलण्यास समर्थ आहेत अशी भूमिका मांडली आहे, त्यामुळे स्त्रीयांच्या स्वातंत्र्याविषयी डॉ. आंबेडकरांनी मांडलेला विचार पुढील मुद्यांच्या आधारे मांडता येईल.

## १. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री शिक्षणाचे महत्त्व जाणले होते. स्त्री शिक्षणाची सुरुवात महात्मा फुले यांनी केली आहे, त्याच शिक्षित स्त्रीयांच्या हाती कायद्याचे ज्ञानही द्यायला पाहिजे असे आंबेडकरांना वाटत होते. म्हणून हिंदूकोड बीलद्वारे त्यानी स्त्री उन्नतीची बीजे रोवली. त्याचबरोबर समाजामध्ये स्त्री-पुरुष समता प्रस्थापित करण्यासाठी स्त्री शिक्षणाचा मार्ग सांगितला आहे. स्त्रियांना समाजात वा कुटुंबात उत्तम वागणूक व समान दर्जा मिळाला पाहिजे. स्त्री शिक्षणाने कुटूंब पुढे जाते. घरातील स्त्री अडाणी असली तर कुटूंबाची उन्नती होणार नाही, म्हणून स्त्रीयांनी शिक्षण घेतले पाहिजे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे.

## २. कुटूंब नियोजनास संमती :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांचा विकासाचा स्त्री शक्तीचा विचार करताना कुटूंब नियोजनासंदर्भात ही विचार केलेला आहे. कुटूंबाचे घटक असणाऱ्या स्त्री-पुरुषाची दोघांचीही कुटूंब नियोजनाची जबाबदारी आहे, कारण अमर्याद बाळंतपणे स्त्रियांवर लादली जातात, त्यामुळे तिचे आरोग्य ढासळते, मृत्यू होतो. जास्त संख्या वाढली तर सगळ्यांची आबाळ होते, त्यामुळे लोकसंख्या वाढीवर ही नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने कुटूंब नियोजन हे महत्त्वाचे आहे. कारण लोकसंख्या हे गरीबाचे प्रमुख कारण आहे, त्यामुळे कुटूंब नियोजन करावे व सरकारने त्यास कार्याला प्रोत्साहन द्यावे असे बाबासाहेबांनी सांगितले आहे.

## ३. भारतीय स्त्रीयांना दिलेला उपदेश :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांनी कसे असावे, कसे दिसावे यासंदर्भात ही विचार केला आहे, त्याच्यामते, स्त्रीयांनी उत्तम कपडे दागिने यासाठी दृढ न राहता स्वच्छ टापटिप रहावे, गुणवत्तेवर चारित्र्यावर भर द्यावा. मुलामुलींवर चांगले संस्कार करावेत असा बाबासाहेबांनी भारतीय स्त्रीयांना उपदेश दिलाआहे. स्त्रीयांनी भाराभर दागिन्याऐवजी एखादाच चांगला दागिना घालावा, त्याचबरोबर स्त्री ही एक व्यक्ती आहे आणि व्यक्तीस्वातंत्र्य तिला असायलाच हवे, लग्नानंतर पत्नी ही पुरुषाची समान अधिकारी असलेली गृहिणी असते. ती नवऱ्याची गुलाम असता कामा नये, असा उपदेश त्यानी समस्त स्त्रीयांना दिला आहे.

## ४. स्त्री कामगारासाठी सवलती :-

डॉ. आंबेडकरांनी मजूर मंत्री म्हणून कार्यरत असताना सूतगिरण्या, कारखाने, विविध उद्योग समूह या ठिकाणी विविध स्त्रीया काम करीत होत्या. या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने वेतन मिळावे, स्त्रियांना

बाळंतपणाची रजा मिळावी, महिलेच्या मुलासाठी कामाच्या ठिकाणी पाळणाघरे असावीत, वयात आलेल्या सर्वच स्त्रीयांना पुरुषाबरोबर मताचा अधिकार असावा इत्यादी स्त्री कामगारांना सवलती मिळाव्यात म्हणून सरकारला निवेदन दिले व सरकारकडून ते मान्य करून घेतले. अशाप्रकारे स्त्री कामगारांना सवलती देण्याचे कार्य आंबेडकरांनी केले आहे.

## ५. हिंदू कोड बील आणि स्त्री जीवन :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री गुलामीच्या अंताचा विचार करून हिंदू कोड बील संसदेमध्ये मांडताना असे म्हटले की, तुम्हाला हिंदू आचार, हिंदू संस्कृती आणि हिंदू समाज कायम टिकवायचा असेल तर जेथे दुरुस्ती अथवा सुधारणा करणे अगत्याचे असेल तेथे तशी दुरुस्ती अगर सुधारणा करण्यास विरोध करू नका. हिंदू आचार धर्मात जे भाग अगदी पडायला झालेत, त्याची दुरुस्ती करण्यापलीकडे या बिलात दुसरे काहीही नाही' तरीही हिंदू कोड बील मंजूर झाले नाही, त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला परंतु हिंदू कोड बीलात आंबेडकरांनी स्त्रीयांच्या महत्त्वाच्या तत्त्वाचा विचार मांडला होता, त्यास विरोध झाला ती तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

१) जुन्या चालू हिंदू कायद्याप्रमाणे विवाह व दत्तक हा ज्या-त्या जातीत झाला पाहिजे. दुसऱ्या जातीतील व्यक्तीशी झाला तर तो हिंदू कायद्याप्रमाणे रद्द समजण्यात येईल यात आंबेडकरांनी दुरुस्ती करून कोणत्याही जातीतील व्यक्तीशी विवाह करता येतो व दत्तक होऊ शकतो.

२) पुरातन हिंदू कायद्याप्रमाणे हिंदूना हव्या तितक्या स्त्रीयांशी विवाह करता येतो. डॉ.आंबेडकरांनी त्यात दुरुस्ती करून एका हिंदू व्यक्तीला एकच पत्नी करता येते.

३) हिंदू कायद्याप्रमाणे लग्न केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव घटस्फोट घेता येत नाही. आंबेडकरांनी त्यात सुधारणा करून घटस्फोट घेण्याचा स्त्रीयांना अधिकार दिला.

४) हिंदू कायद्यानुसार वडिलोपार्जित संपत्तीत स्त्रीयांना वाटा मिळत नव्हता, त्यात आंबेडकरांनी सुधारणा करून वडिलोपार्जित संपत्तीवर स्त्रीयांचा हक्क दिला पाहिजे असे म्हटले.

५) प्रचलित हिंदू कायद्यानुसार स्त्रियांना संपत्तीत संपूर्ण मालकी गाजविता येत नाही. आंबेडकरांनी त्यात सुधारणा करून बापाच्या मिळकतीवर मुलाप्रमाणे मुलींनाही योग्य तो वाटा मिळत जाईल म्हणजे मुलगा असा भेद कायदा करणार नाही, स्त्रीला समान वाटा मिळेल.

अशा प्रकारे हिंदू कोड बीलाच्या माध्यमातून स्त्रीयांना अधिकार देण्याचे काम आंबेडकरांनी केले. खुद्द आंबेडकरांनी या हिंदू कोड बीलात कोणत्याही प्रकारचे क्रांतिकारक आणि जहाल गोष्ट नाही असे

स्पष्ट केले होते, तरी ही त्याना खुनाच्या धमक्या येत होत्या. हिंदू कोड बिलासारख्या साध्या-सोप्या सुधारणा करण्याची मानसिकता हिंदू आणि ब्राम्हण याच्यामध्ये नसल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर करण्याचा मार्ग स्वीकारला. परंतु हिंदू कोड बील पंडित नेहरूंनी टप्प्याटप्प्याने भारतीय कायद्यामध्ये समाविष्ट केले आहे, त्यात हिंदू पुरुषाला एकच लग्न करता येते. स्त्रीयांना संपत्तीत वाटा मिळतो, त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले हिंदू कोड बील आजच्या स्त्री जीवनामध्ये उपयुक्त आहे. अशाप्रकारे पुरुषप्रधान भारतीय समाजामध्ये स्त्रीयांना जे अधिकार नाकारले होते, ते सर्व हक्क आणि अधिकार डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाने स्त्रियांना दिले आहे, एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीयांच्या उन्नतीसाठी मोठे योगदान आहे.

## २.३ सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यामध्ये जो काही संघर्ष लढा दिला तो समाजातील जाती विषमता वर्णव्यवस्था नष्ट करण्यासाठी आणि समाजात समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता प्रस्थापित करण्यासाठी होता. त्यामुळे डॉ. बाबासाहेबांनी केवळ स्वातंत्र्य, समता आवश्यक असणाऱ्या भारतीय समाजव्यवस्थेमध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्था हा हिंदू धर्म प्रतीकरूप होते, त्यामुळे अस्पृश्यांना आपल्या धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय गुलामगिरीतून मुक्त करण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले आहे. त्याचबरोबर स्त्रीयांनासुध्दा गुलामगिरीतून मुक्त करण्याचे काम ही केले आहे. एकूणच समाजातील अस्पृश्य, दलित, दुर्बल स्त्रीया यांच्या जीवनातील शोषण निवारण करणे आणि त्याना स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या तत्त्वाच्या आधारावर जीवन जगण्याचे स्वातंत्र्य देण्याचे कार्य आंबेडकरांनी केले आहे. फ्रेंच राज्यक्रांतीनी ही तत्त्वे समाजास दिली असे म्हटले असले तरी प्रत्यक्षात आंबेडकरांनी बौध्द धर्माचा अभ्यास केल्यानंतर ही तत्त्वे बौध्द धर्मातील आहेत अशी खात्री पटली, त्यामुळे त्यांनी धर्मांतराची घोषणाकरून लाखो लोकांना बौध्द धम्माची दीक्षा दिली, कारण आंबेडकराची सर्व चळवळी या अस्पृश्यता निवारण आणि समता, न्याय, स्वातंत्र्य आणि बंधुभाव प्रस्थापित करण्यासाठी उभ्या राहिल्या, कारण देशातील खोलवर रुजलेल्या जुन्या रूढी, प्रथा, परंपरा याचे समूळ उच्चाटन करून त्यानी बुध्दिवादी समाज निर्माण करणे आणि समाजामध्ये स्वातंत्र्य, समतेच्या आधारावर एकसंध समाज निर्माण करून भारतीय समाजातील दलित अस्पृश्य मागास आणि स्त्रीयांचे जीवन सुखदायी बनवणे हा एकमेव उद्देश होता. स्त्रीयांना आपल्या जीवनामध्ये जगण्यासाठी आंबेडकरांनी हिंदू कोड बीलच्या माध्यमातून विवाहासंबंधी घटस्फोटासंबंधी आईवडिलांच्या इस्टेटीतील हिस्सेसंबंधी हक्क मिळवून देण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले आहे. एकूणच भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरानी भारतीय समाजात न्याय, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता प्रस्थापित करण्याचे काम केले आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द

- **स्वातंत्र्य :** व्यक्तिला सर्वांगीण विकासासाठी दिलेली मोकळीकता.
- **समता :** प्रत्येकाला विकासाच्या संधी आणि समानता देणे.
- **बंधुभाव :** सर्वांशी बंधुभगिनी नात्याने वर्तन करणे.
- **न्याय :** सर्वांना समान वाटप करणे त्यात संपत्ती, सत्ता, अधिकार यांचा समावेश होतो.

## २.५ सरावासाठी स्वाध्याय

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वातंत्र्याविषयीचे विचार स्पष्ट करा.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समतेची संकल्पना स्पष्ट करा.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बंधुतेची भावना सांगा.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे न्याय संकल्पना सांगून सामाजिक न्यायाची चर्चा करा.

५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीविषयक विचार सांगा.

## २.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **आंबेडकर, बाबासाहेब** (२००९) : *''हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनीती''*, सुगावा प्रकाशन, पुणे

२. **आंबेडकर, बाबासाहेब** (२०१०-११) :*''जातीचे निर्मूलन''*, रोडगे प्रकाशन, नागपूर

३. **बाबर, अशोक** (२०१६) :*''आंबेडकरवाद''*, कोटी ॲण्ड बाबर पब्लिशर्स, सोलापूर

४. **समाज प्रबोधन पत्रिका** : *ऑक्टोबर-डिसेंबर, २०१६*

५. **राव, राघवेन्द्र** (२०१७) : *''बाबासाहेब आंबेडकर''*, साहित्य अकादमी, नवी दिल्ली

६. **कसबे, रावसाहेब** (२०१४) : *''डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना''*, पुणे

७. **भोळे, भास्कर** : *''राजकीय सिध्दांत आणि विश्लेषण''*, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर


❑ ❑ ❑

घटक–३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वैचारिक दृष्टिकोन

## (Ideological Perspectives of Dr. B. R. Ambedkar)

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद
- ३.२.२ डॉ. आंबेडकरांच्या संघराज्य आणि भाषावार प्रांतरचनेविषयीचे विचार
- ३.२.३ राज्य आणि राज्यसमाजवादासंबंधीचे विचार
- ३.२.४ डॉ. आंबेडकरांचे मार्क्सवादावरील विचार

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं:अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ३.० उद्दिष्ट्ये

आधुनिक भारताच्या जडणघडणीत अनेक राजकीय नेत्यांनी व समाजसुधारकांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान हे ऐतिहासिक आणि दूरगामी परिणामकारक ठरले आहे. आधुनिक भारताच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवनामध्ये परिवर्तन करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी जे चिंतन केले आहे त्या चिंतनातून निर्माण झालेले विचार, पुस्तके, मासिके लिहून लोकांसमोर आणले आहे आणि अनेक आंदोलने उभी करून समाज बदलविण्याचा

प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांचे विचार भारताच्या जडणघडणीत कसे उपयुक्त आहेत त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या वैचारिक दृष्टिकोनाचा अभ्यास केला जाणार असून त्यामध्ये प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवाद, संघराज्य आणि भाषावार प्रांतरचना, राज्य आणि राज्यसमाजवाद आणि मार्क्सवादावरील टीका या चार मुद्द्यांचे सविस्तर विवेचन केले आहे. हे विचार भारताच्या संदर्भात आजही उपयुक्त आहे म्हणून हे अभ्यासणे गरजेचे आहे.

## ३.१ प्रास्ताविक

राष्ट्रवाद ही संकल्पना युरोपमध्ये १९व्या शतकामध्ये उदयास आली. परंतु इंग्रज भारतात येण्यापूर्वी आधुनिक राष्ट्रीयतेची भावना भारतामध्ये निर्माण झालेली नव्हती, कारण भारत हा विविध राज्यात विभागलेला होता. इंग्रजांचे राज्य भारतात स्थापन झाल्यानंतर येथे अनेक ठिकाणी शाळा व महाविद्यालये सुरू करण्यात आली. त्यातूनच भारतीय प्रबोधन चळवळीची सुरुवात झाली. त्यामुळे नव्या इंग्रजी शिक्षित लोकांनी समाजातील वाईट रूढी, प्रथा, परंपरा मोडीत काढण्यास सुरुवात केली. त्यासाठी अनेकांनी संस्था, संघटना स्थापन करून समाजामध्ये कार्य करीत राहिले. त्यामुळे भारताला सामाजिक सुधारणा करण्याची मोठी परंपरा लाभली आहे. प्रामुख्याने राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, न्या. रानडे, गोपाळकृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, गांधी, आंबेडकर इत्यादी विचारवंतांचा समावेश होतो.

यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाला गतिमान बनवण्यासाठी जो दृष्टिकोन मांडला, त्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. कारण भारतातील सामाजिक परिस्थिती, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक गोष्टीवर डॉ. आंबेडकरानी मूलभूत आणि मूलगामी विचार मांडले आहेत. आधुनिक काळात राष्ट्रवाद ही संकल्पना उदयास आली, याबाबत डॉ. आंबेडकरानी आपले विचार मांडले आहेत. तर स्वातंत्र्यानंतर भारतासमोर संघराज्य व्यवस्था स्वीकारल्यानंतर राज्य कशा पध्दतीने निर्माण करावे हा प्रश्न होता, तो सोडविण्यासाठी डॉ. आंबेडकरानी मांडलेला भाषावार प्रांतरचनासंबंधीचा विचार उपुयक्त ठरला आहे. भारताच्या अर्थकारणात राज्यसमाजवादासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी मांडलेले विचार अधिक प्रभावीपणे उपयोगी ठरले आहेत. याच काळात कार्ल मार्क्सच्या विचारातून १९१७ साली रशियामध्ये साम्यवादी क्रांती झाली आणि मार्क्सच्या विचाराने अर्धे जग व्यापून गेले. डॉ.आंबेडकरांनी बुध्द आणि मार्क्स हे पुस्तक लिहून मार्क्सवादाचा भारताच्या अनुषंगाने विचार केला हे मार्क्सवादावरील विचार आजही किती योग्य आहे याची जाणीव होते. एकूणच डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या वैचारिक दृष्टिकोनाचा अभ्यास हा आजच्या परिस्थितीमध्ये निर्माण झालेल्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी उपयुक्त व मूलगामी विचार आहेत. त्यामुळे डॉ. आंबेडकरांचे विचार अभ्यासणे आजच्या काळाची गरज आहे.

## ३.२ विषय विवेचन

राष्ट्रवाद म्हणजे एकतेची भावना असते. एकाच भूप्रदेशात राहणाऱ्या लोकांमध्ये कालांतराने सामूहिक जीवनाचे व आकांक्षाचे ऐक्य निर्माण होते, तसेच त्यांना इतरांहून आपण निराळे आहोत याची जाणीव होऊ लागते. अंतर्गत ऐक्याची भावना व इतरांपेक्षा वेगळेपणाची जाणीव या राष्ट्रवादाच्या दोन महत्त्वाच्या प्रेरणा आहेत, या प्रेरणेतून राष्ट्रवाद पसरत असतो. एकोणिसाव्या शतकापासून राष्ट्रवाद या संकल्पनेचा प्रभाव जगभर जाणवू लागला आहे, तसा तो भारतात ही आला. भारतातील राष्ट्रवाद अनेक समाज सुधारकांनी मांडला आहे. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांनी ही राष्ट्रवादाबद्दल मांडणी केली आहे.

संघराज्य व्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर भारतामध्ये राज्याची निर्मिती कोणत्या आधारावर करावी, यावर चर्चा सुरू झाली होती. कारण जगामध्ये अमेरिका, कॅनडा, रशिया, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशामध्ये संघराज्य व्यवस्था स्वीकारली होती, त्याचबरोबर भारतामध्ये १९३५ च्या कायद्याद्वारे संघराज्य व्यवस्था स्वीकारली होती. त्यामुळे राज्याची निर्मिती हा मोठा संघर्षाचा विषय ठरला त्यावर उपाय म्हणून भाषेच्या आधारावर राज्याची निर्मिती करण्यात आली. यासंबंधी डॉ. आंबेडकरांनी केलेली चिकित्सा महत्त्वाची आहे. तिसरा मुद्दा हा राज्य व राज्यसमाजवादाचा असून प्रामुख्याने हा समाजवाद समता व न्यायावर आधारित नव्या समाजव्यवस्थेचा पुरस्कार करतो. समाजवाद ही संकल्पना मार्क्स कामगार क्रांतीवर अस्तित्वात येणाऱ्या समाजाची पहिली अवस्था अशा अर्थाने वापरतो. परंतु भारतामध्ये लोकशाही समाजवाद ही संकल्पना उदयास आली आणि अनेक विचारवंतांनी समाजवादाची मांडणी केलेली दिसून येते. त्यात डॉ. आंबेडकरांनी राज्यसमाजवादाचे विचार महत्त्वाचे आहेत. शेवटी डॉ. आंबेडकरांची मार्क्सवादावरील टीका या मुद्याचे विवेचन केले आहे. कारण रशियन क्रांतीनंतर जगामध्ये मार्क्सवादाचा विचार मोठ्या प्रमाणात अनेक देशांनी स्वीकारला होता, त्यामुळे भांडवलशाहीला पर्यायी व्यवस्था म्हणून साम्यवादी व्यवस्था उदयास आली होती, त्यामुळे मार्क्सच्या विचारांची भारताच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी चिकित्सा केली आणि मार्क्सवादाला भारतात असलेल्या बुद्धाचे विचार पर्यायी असल्याची मांडणी डॉ. आंबेडकरांनी केली आहे.

### ३.२.१ डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद

भारतीय राष्ट्रवादाचा उदय भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीतून झाला, पण त्यावर वसाहतवादी राजकर्त्यांच्या विविध धोरणाचा, सामाजिक सुधारणा चळवळीचा इ. घटकांचा प्रभाव पडलेला आहे. भारतीय राष्ट्रवादाच्या उभारणीला राजाराम मोहन रॉय यांच्यापासून सुरुवात झाली, त्यांच्यात अनेक वेगवेगळ्या विचारवंतांनी भर घातली आहे.

राजाराम मोहन रॉय यांनी ब्राम्हो समाजाच्या माध्यमातून धर्मसुधारणा चळवळ सुरू केली आणि हिंदू समाजातील अनिष्ठ रुढी, परंपरांना विरोध केला. त्यांनी मानवतावाद व विश्वबंधुत्वाचा पुरस्कार

केला. देशवासीयांमध्ये जागृती, राष्ट्रीय जाणीव, भावी जीवनाची प्रगती, प्रवृत्तीना विरोध, आधुनिकतेचा स्वीकार अशा प्रबोधनाच्या वैशिष्ट्यांचा राजा राममोहन रॉय यांनी स्वीकार केला, त्याच्या आधारावरच भारतीय राष्ट्रीयत्वाची कल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. म. ज्योतिबा फुले यांच्या मते, देशातील शुद्रादिशूद्र आणि आदिवासी यांना विचारात घेतले पाहिजे, परंतु ते घेतले जात नाही. केवळ मूठभर उच्चजातींनी मांडलेली राष्ट्रवादाची कल्पना खरीखुरी एकात्मता साधू शकणार नाही. त्यामुळे फुलेनी प्रस्थापित राष्ट्रवादाला विरोध दर्शविला. न्या. रानडे यांनी धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक राष्ट्रवादाची मांडणी केली. त्यांच्या मते, अनेक चुकीच्या रूढी आणि परंपरा यांनी ग्रस्त झालेल्या आणि धर्म, जाती, पंथ यांच्यामध्ये अडकलेल्या भारतीय समाजामध्ये मूलगामी बदल झाला पाहिजे. धर्मसुधारणेच्या आणि समाजसुधारणेच्या नव्या चळवळी निर्माण झाल्या पाहिजेत आणि त्यामुळे एका राष्ट्राचे घटक आहोत अशी भावना भारतीयांच्या मनामध्ये निर्माण होईल. न्या. रानडे यांनी अशाप्रकारे आधुनिक भारतीय राष्ट्रीयत्वाची कल्पना उदारमतवादाच्या तत्वावर आधारित मांडल्याचे दिसते. तर लोकमान्य टिळकांनी राष्ट्रवादाची मांडणी करत असताना त्याचे सांस्कृतिक संबंधही महत्त्वाचे मानले आहे. दुसऱ्या बाजूला जहाल साम्राज्यवादाला विरोध केला. चिपळूणकर, लोकमान्य टिळक आणि गोपाळ गणेश आगरकर यांच्या राष्ट्रवादी विचारांचा मुख्य आधार साम्राज्यवादाला विरोध हा होता. अरविदांनी राष्ट्रवादाला आध्यात्मिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. तर स्वा. सावरकरांनी हिंदू राष्ट्रवादाची मांडणी केली आहे.

महात्मा गांधीनी राष्ट्रवादाची मांडणी करताना धर्मसहिष्णुता सर्वधर्मसमभाव आणि धर्मनिरपेक्ष राज्यसंस्था या गोष्टींचा पुरस्कार केला आणि व्यापक सांस्कृतिक स्वातंत्र्याचा आग्रह धरला. भारतीय राष्ट्रवादाची मांडणी पं. नेहरूंनी केली आहे. नेहरूंच्या मते, राष्ट्रवाद ही संकुचित संकल्पना आहे, आणि पाश्चिमात्य देशात राष्ट्रवादाचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याचबरोबर देशातील बहुसंख्य लोक हे स्वत:ला राष्ट्र समजात व अल्पसंख्यांकाना त्यातून वगळण्याचा प्रयत्न करतात त्यामुळे नेहरू असे म्हणतात की, भारतीय राष्ट्रवादाचा असा विकास केला पाहिजे, ज्यात सर्वधर्म, पंथ, भाषा, वंश यांना स्थान असेल म्हणून नेहरूनी राष्ट्रवादाच्या विचारामध्ये बहुसंख्याकांची भूमिका आणि अल्पसंख्यांकाच्या हक्काची समन्वयाची भूमिका मांडली आहे. नेहरूंच्या या राष्ट्रवादास मौलाना यांनी पाठिंबा दिला आहे. या राष्ट्रवादाच्या विरोधात प्रथम सय्यद अहमद यांनी आपली मते मांडली आहेत. त्यांच्या मते, भारतात जातीय वैमनस्य आणि असमानता असताना संस्था स्थापन करणे चुकीचे आहे.कारण त्यामुळे मागास जाती व मुस्लीमांसारखे मागास समाज सत्तेपासून दूर राहतील, त्यामुळे काँग्रेसच्या एकात्मवादी राष्ट्रवादास त्यांचा विरोध होता.

डॉ. आंबेडकरांनी थॉटस् ऑन पाकिस्तान, स्टेटस् ॲन्ड मायनॉरीटीज, ॲनिहिलेशन ऑफ कास्ट, रानडे, गांधी आणि जीना इत्यादी ग्रंथामध्ये राष्ट्रवादासंबंधीचे विचार मांडले आहेत. त्याची राष्ट्रवादाची कल्पना ही फुलेच्या मांडणीशी जुळणारी अशी आहे. भारतीय राष्ट्रवादापुढे खऱ्या अर्थाने १९४० साली

मुस्लीम लीगने केलेल्या स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीमुळे आव्हान निर्माण झाले होते. त्याकाळातील अनेक नेत्यांनी व विचारवंतांनी या प्रश्नासंबंधी विवेचन केले आहे, परंतु डॉ. आंबेडकरांनी 'पाकिस्तानची फाळणी' या पुस्तकाद्वारे भारत हे राष्ट्र आहे. हे हिंदू राष्ट्रवादाचे मत कसे चुकीचे आहे हे सिध्द केले आहे. कारण भारतामध्ये गांधी, नेहरू, टिळक यांनी मांडलेला राष्ट्रवाद डॉ. आंबेडकराना मान्य नव्हता. डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा पददलित व गरीबाच्या कल्याणासाठी काम करण्याच्या भावनेतून उदयास आला होता. समान संधी व मानवी हक्क हे अनेक शतकापासून नाकारलेल्या समाजाला दारिद्र्यातून मुक्त झाल्याशिवाय हे वर्ग राष्ट्रजीवनाशी समरस होणार नाहीत असे आंबेडकरांना वाटत होते, त्यामुळे आंबेडकरानी गांधी नेहरूच्या राष्ट्रवादापेक्षा वेगळा राष्ट्रवाद मांडल्याचे आढळून येते.

डॉ. आंबेडकराच्या राष्ट्रवादी विचारांवर फ्रेंच विचारवंत अर्नेस्ट रेनन याचा प्रभाव पडला असला तरी आंबेडकरांनी त्यात फेरबदल करून त्याचा विस्तार केला आहे. रेननच्या मते, भाषा, वंश, भूगोल नैसर्गिकरित्या आणि धार्मिक श्रध्दा व रीतीरिवाजामधील फरक सर्वाच्या वर व्यक्तीची इच्छा नावाची एक गोष्ट असते. म्हणून रेनिन म्हणतो की, मनुष्य हा त्याच्या भाषेचा अथवा वंशाचा नसतो तर तो स्वत:चाच असतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ती एक मुक्त आणि नैतिक व्यक्ती असते. डॉ.आंबेडकर रेननच्या वंश, भाषा, देश या गोष्टी राष्ट्र तयार करण्यासाठी पुरेशा नाहीत. या गोष्टीवर सहमत आहेत. आंबेडकरानी 'राष्ट्रीयत्व ही एक सामाजिक भावना आहे' ही एकाकीपणाची सामूहिक भावना आहे व ज्याच्या मनात ही भावना निर्माण होते, त्याच्यात बंधुत्वाची भावना निर्माण होते. ती भावना कोणत्या एका गटावर अवलंबून नसते. ज्याला राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रीय भावना म्हटले जाते त्याला बंधुत्वाची आवश्यकता असते असे स्पष्ट केले आहे.

डॉ. आंबेडकरानी रेननच्या विचारातील राष्ट्रनिर्मितीमध्ये वैभवाचा आणि दु:खाचा वारसा हा एकत्रित राहण्याची इच्छा इतकाच महत्त्वाचा आहे. इतकेच नव्हे तर सामायिक रीतीरिवाज, वंश आणि भाषा या सर्वांपेक्षा तो महत्त्वाचा आहे. ते पुढे म्हणतात, एकत्रितपणे दु:ख स्वीकारणे हे एकत्रितपणे आनंद उपभोगण्यापेक्षा जास्त प्रबळ बंधन निर्माण करते. राष्ट्रीय स्मृतीच्या बाबतीत शोक हा विजयापेक्षा महत्त्वाचा ठरतो. कारण तो कर्तव्य लादतो तो समान प्रयत्नाची मागणी करतो. त्यासाठी डॉ. आंबेडकरांनी राष्ट्र म्हणून एकत्रित राहण्याची इच्छा अस्तित्वात येण्यासाठी एकमेकातील द्वेष संघर्ष मिटवले पाहिजे अशी भूमिका स्पष्ट केली आहे.

## ❒ डॉ. आंबेडकराची राष्ट्रवादावरील टीका :-

भारतीय राष्ट्रवादामध्ये सामायिक राष्ट्रवाद, हिंदुत्ववाद व द्विराष्ट्रवाद हे तीन प्रवाह आहेत. राजाराममोहन रॉय, रानडे यांनी जो राष्ट्रवाद मांडला. तो धर्मनिरपेक्ष असा सामायिक राष्ट्रवादाचा सिध्दांत मांडला. तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघानी हिंदूराष्ट्रवादाची मांडणी केली. तर जीना आणि सावरकरांनी

द्विराष्ट्रवादाची मांडणी केली आहे. कारण पाकिस्तानच्या फाळणीचा प्रश्न हिंदू धर्मवाद्यांनी व मुस्लिम धर्मवाद्यांनी चिघळविला होता. स्वा. सावरकर यांनी हिंदू महासभेच्या भाषणातून हिंदूराष्ट्रवादाची मांडणी केली. देशाचे नांव हिंदूस्थान राहील. इंडिया किंवा भारत असणार नाही. संस्कृत ही पवित्र भाषा हिंदी (संस्कृतपण) राज्यभाषा राहील. देवनागरी ही लिपी असेल. अहिंदू अल्पसंख्यांकानी 'एक व्यक्ती, एक मत' हे तत्त्व स्वीकारून त्याप्रमाणे वागावे लागेल, त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना हक्क मिळतील आणि राष्ट्रीयत्वाची व्याख्या, पुण्यभू, पितृभू ज्याची भारत राष्ट्र आहे ते राष्ट्रीय समजले जावे असे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भूमिका मांडली आहे आणि विचारपूर्वक मुस्लीम, ख्रिश्चन पारशी यांना वगळले आहे.

डॉ. आंबेडकरानी भारतीय राष्ट्रवादावर टीकाकरताना म्हटले आहे की, सावरकर आणि जीना हे एकमेकांच्या विरोधी असून देखील दोघांची राष्ट्र आणि राष्ट्रीयत्वाची विचारसरणी एकच आहे, म्हणजेच सावरकराचा द्विराष्ट्रवाद आणि जिनाचा द्विराष्ट्रवाद एकच आहे. म्हणून ते पुढे म्हणतात की, सावरकरांच्या दृष्टीकोनातून तर्कदुष्ट आणि विचित्र असून, भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे म्हणजे आंबेडकर हे जिना आणि सावरकराच्या राष्ट्र-कल्पनेच्या विरुध्द होते. त्यांनी धर्मावर आधारित राष्ट्रवाद नाकारला आहे. आंबेडकराच्या मते, हिंदुराष्ट्र निर्माण झाले तर त्याच्यासारखी भयानक दुसरी कोणतीही गोष्ट असणार नाही. कारण हिंदू धर्माएवढी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यांच्याविरोधी दुसरी कोणतीही गोष्ट नाही. ती लोकशाही विसंगत आहे, म्हणून ते हिंदूराष्ट्र कोणत्याही परिस्थितीत होऊ देऊ नये, अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे. आंबेडकरांच्या मते, हिंदू लोकांनी स्वत:लाच हा प्रश्न विचारावा की, जर अरब राष्ट्रवाद तुर्की साम्राज्य उचलून टाकू शकतो. स्लोव्हाक राष्ट्रवाद झेकोस्लोव्हालियाला धुळीस मिळवू शकतो तर भारत देशाचा ऱ्हास मुस्लीम राष्ट्रवादापासून कसा रोखता येईल? असे प्रश्न विचारून हिंदू राष्ट्रवादावर डॉ. आंबेडकरांनी टीका केल्याचे दिसून येते.

आंबेडकर हिंदूराष्ट्रवाद व मुस्लीम राष्ट्रवाद टाळण्यासाठी असे म्हणतात की, १९२० ते १९३७ या कालखंडात मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा बहुसंख्य प्रांतात राबविल्या गेल्या, त्यावेळी मुसलमान, ब्राह्मणेतर जाती आणि मागासलेल्या जाती एकत्रित आल्या होत्या. हाच मार्ग हिंदुराष्ट्राचे अरिस्ट टाळण्यासाठी पुन्हा स्वीकारायला पाहिजे, आणि जीना ही एकच अशी व्यक्ती होय, जिला जमातवादी पक्ष स्थापन करणे शक्य होते. त्यांच्यात संघटनसामर्थ्य आहे आणि राष्ट्रवादी म्हणून त्याचा लौकीक होता, परंतु त्या भावनिक राजकारणामुळे ते करू शकले नाहीत, म्हणून डॉ. आंबेडकर अशा निष्कर्षापर्यंत आले की, हिंदू व मुस्लीम हे एक राष्ट्र आहेत. एकत्रित राहण्याची इच्छा हिंदू व मुस्लीम दोहोंमध्ये दिसून येत नाही, त्यामुळे भारताची फाळणी झाली तर किमान समाजसुधारणांना अग्रक्रम मिळेल व सामान्य लोकांचा जीवनामध्ये सुधारणा घडून येईल असा आशावाद डॉ. आंबेडकरांनी व्यक्त केला आहे.

## ❐ डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचे आधारभूत घटक :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रवादाच्या विचारांचे काही आधार स्पष्टपणे दिसून येतात. ते पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १. जाती निर्मूलन :-

राष्ट्रवादाला पहिला अडथळा म्हणजे जातीयता हा आहे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते, म्हणून डॉ. आंबेडकरांनी ॲनिहिलेशन ऑफ कास्ट या पुस्तकाद्वारे जाती निर्मूलनाचे विवेचन केले आहे, कारण सामाजिक प्रगती व राजकीय स्थिरता निर्माण करण्यामध्ये जातिव्यवस्था अडथळा निर्माण करते. डॉ. आंबेडकरांनी प्रांतवाद, भाषावाद, जातिवाद, जातिविषयक भावना यांच्याविरुध्द लढण्यावर भर दिला होता. त्यांच्यामते, जातियवाद राष्ट्रवादविरोधी असतो. सार्वजनिक जीवनाची दृष्टी जातियवादाने मारली आहे. जाती प्रथा नष्ट केल्याशिवाय राष्ट्र निर्माण होऊ शकत नाही किंवा नैतिकता निर्माण होऊ शकत नाही. म्हणून जातिव्यवस्था नष्ट झाले पाहिजे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे. त्यांच्या मते, राष्ट्रीयत्व म्हणजे जातीय भावनेचा अभाव पण ज्याची पाळेमुळे खोल गेली असतात, अशी जातीय भावना सर्वत्र आढळते. राष्ट्रीय एकात्मतेला मोठा धोका म्हणजे या जातीय भावनेपासूनच असल्याचे त्यांना वाटत होते. जात, वर्ण आणि संप्रदाय यांच्याविना सामाजिक बंधुता प्रत्यक्षात आणणे आणि समाजात सुसंवाद निर्माण करणे म्हणजेच राष्ट्रवाद याविषयी त्यांना कधीच शंका नव्हती.

### २. जनतेचे स्वातंत्र्य :-

डॉ. आंबेडकरांनी असे म्हटले की, देशाचे स्वातंत्र्य व जनतेचे स्वातंत्र्य या दोन संकल्पना वेगळ्या असून अनेक स्वतंत्र देशाचे जनता खऱ्या अर्थाने स्वतंत्र होतच नाही. अंतर्गत गुलामगिरी लादलेली असते. हे अमेरिकेच्या नीग्रोचे उदाहरण देऊन आंबेडकरांनी सिध्द केले आहे. तर भारतीय जनतेच्या हातात राजकीय सत्ता आल्याशिवाय आणि सामाजिक दृष्टीने दलितांच्या हातात सत्ता आल्याशिवाय सामाजिक भेद नष्ट होणार नाही. राष्ट्रातील सर्व वर्गांना आणि जनतेला स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. त्याशिवाय राष्ट्र म्हणून भारत उभे राहू शकत नाही. म्हणून डॉ. आंबेडकरांचा संघर्ष हा फक्त गुलामगिरीतून व्यक्तीला मुक्त करण्यासाठी नसून ते प्रत्येक व्यक्तीला किंवा जनतेला गरजा, भय, छळ आणि शोषण या गोष्टींपासून स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी होता. कारण ते प्रत्येक क्षणी भारत देशाच्या विकासाचा विचार करीत होते. म्हणून असे म्हणतात, न्यायाच्या आधारावर सामाजिक व आर्थिक नियमांना समाजसापेक्ष बदलण्याची ताकद ज्या शासनव्यवस्थेत आहे, तीच शासन व्यवस्था जनतेला स्वातंत्र्य देवू शकते. म्हणून राष्ट्रवाद निर्माण होण्यासाठी जनतेचे स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे.

### ३. सांस्कृतिक राष्ट्रवाद :-

डॉ. आंबेडकरांना फक्त राजकीय, सामाजिक स्वातंत्र्य किंवा ऐक्य अभिप्रेत नव्हते तर आत्मिक

व सांस्कृतिक स्वरूपाचे ऐक्य हवे होते. मनामध्ये निर्माण होणारे सामाजिक ऐक्य हवे होते, कारण भारताच्या सांस्कृतिक एकतेवर त्यांचा विश्वास होता. त्यामुळे डॉ. आंबेडकरांना राष्ट्रवादाच्या निर्मितीसाठी सांस्कृतिक राष्ट्रवादामध्ये लोकसमुदाय परस्परसंबंध भावनेने एकत्र असले पाहिजे असे वाटत होते. कारण राष्ट्राच्या सांस्कृतिक घटकावर आणि त्याच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल डॉ. आंबेडकरांचा नितांत आदर व ठाम विश्वास होता. भारतात अनेक संस्कृती अस्तित्वात असल्यामुळे त्या सर्वांना एकत्रित सामील करून घेणे हे भारतीय राष्ट्रवादाचे महत्त्वाची वैशिष्ट्य ठरेल. त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला आहे.

### ४. सशक्त केंद्र सरकार :–

भारतीय समाज हे फक्त अनेक जातीमध्ये विभागलेले नसून तो प्रादेशिकता, भाषा, संस्कृती इत्यादीमध्ये विभागलेला आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकता टिकविण्यासाठी सर्व राज्य सरकाराना एकत्रित घेण्यासाठी केंद्राकडे जादा अधिकार द्यावे आणि त्याच्या कायद्याद्वारे राज्यसरकारे चालावीत असे आंबेडकरांना वाटत होते. त्यासाठी प्रादेशिक एक व प्रशासकीय कार्यकारिणी केंद्र सरकार हे प्रबळ असले पाहिजे अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनीघेतली आहे. त्याद्वारे देशाची एकता अखंडता टिकून राहिल यावर आंबेडकरांचा विश्वास आहे.

### ५. एक समान भाषा :–

भारत हे बहुभाषिक राष्ट्र आहे त्यामुळे राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवण्यासाठी अनेक अडचण निर्माण होते, याची जाणीव आंबेडकरांना होती. तरीपण भारताच्या सांस्कृतिक ऐक्यावर त्याचा विश्वास होता. भाषिक विविधता राष्ट्रवादाच्या विकासातील अडथळा दूर करण्यासाठी एक समान भाषा असले तर ते राष्ट्रनिर्मितीस पोषक ठरते, म्हणून हिंदी भाषेला एक समान भाषा म्हणून स्वीकारावे असे मत आंबेडकरांनी मांडले आहे. कारण भाषा हे संस्कृतीचे वाहक असते. जर भारतानी एक समान भाषा स्विकारली तर त्यातून एक समान संस्कृती निर्माण होईल. त्यामुळे देशातील सांस्कृतिक, भाषिक व वांशिक संघर्ष कमी होईल, अशी भूमिका आंबेडकरांची होती. म्हणून डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचा भाषा हा एक मुख्य आधार ठरू शकतो.

### ६. अल्पसंख्यांकाना संरक्षण :–

आंबेडकरांनी राष्ट्रीयत्वाची कल्पना मांडताना अल्पसंख्यांक आणि बहुसंख्यांक या भाषेत त्याचे विचार व्यक्त केले आहेत. बहुसंख्यांकाचा अल्पसंख्याकावर बहुसंख्यांकाचे इच्छेप्रमाणे राज्य करण्याचा दैवी अधिकार या शब्दात त्यांनी भारतीय राष्ट्रवादाचे तत्त्व विशद केले होते. त्यांच्यामते, भारतीय राष्ट्रवादात अल्पसंख्यांकाना संरक्षण दिले पाहिजे, तसेच सत्तेत अल्पसंख्यांकाना सत्तेत भागीदार करून घेतले पाहिजे, तेव्हा राष्ट्रवाद खऱ्या अर्थाने निर्माण होण्यासाठी अल्पसंख्यांकाना अधिकार देणे आवश्यक

आहे, अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडले आहे. कारण आंबेडकरांना असे वाटत होते की, एक भाषिक राज्यात एका विशिष्ट जातीगटाचे बहुमत निर्माण होईल आणि हे जातीय बहुमत इतर अल्पसंख्य जातीतील लोकांपासून त्यांचे हक्क हिरावून घेईल, त्यामुळे अल्पसंख्यांकाना संरक्षण देणे गरजेचे आहे. जेणेकरून त्यांना हक्काने जगता येईल. त्यामुळे आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचे अल्पसंख्यांकाना संरक्षण हा एक आधार आहे हे स्पष्ट दिसून येते.

अशाप्रकारे आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचे आधार आहेत. यावरून असे दिसून येते की, आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा अत्यंत धर्मनिरपेक्ष, पुरोगामी व बुध्दीप्रामाण्यवादी होता. पूर्वग्रहदूषित अमानुष आक्रमण आणि असहिष्णू असा राष्ट्रवाद त्यांना नको होता. राष्ट्रवादाने धर्म व प्रादेशिक देशभक्तीच्या सरहद्दीवर थांबू नये असे ते म्हणतात. तसेच सर्वंकष शोषणमुक्तीचाही संदर्भ होता. डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा विवेकशील मानवतावादी, ईहवादी स्वभावाचा होता, त्यामुळे समकालीन काळातील वैचारिक, सांस्कृतिक अराजकाच्या काळात त्यांचे राष्ट्रवादी चिंतन सर्वांसाठीच मार्गदर्शक प्रेरणादायी ठरले आहे.

## ३.२.२ डॉ. आंबेडकरांचे संघराज्य आणि भाषावार प्रांतरचनेविषयीचे विचार

संघराज्य म्हणजे अधिकार वाटपाची अवस्था असून त्यात सर्वसाधारणपणे केंद्रशासन व राज्यशासन निर्माण केले जाते. संघराज्य निर्मितीचे मुख्य दोन प्रकार दिसून येतात ते म्हणजे केंद्राकर्षी व केंद्रोत्सारी होत, परंतु केंद्राकर्षीमध्ये वेगवेगळे स्वतंत्र प्रदेश एकत्र येऊन संघशासन निर्माण करतात, तर केंद्रोत्सारीमध्ये एका प्रदेशाचे विविध कारणामुळे घटक शासनाने निर्माण करतात. संघराज्य म्हणजे Federalism हा शब्द Foundus या लॅटीन शब्दांपासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ करार असा होतो. देशाचा मोठा आकार व देशातील प्रादेशिकतेच्या आधारावर संघराज्य शासन पध्दतीची तरतूद केली जाते. आंबेडकरांनी भारताच्या राज्य घटनेची निर्मिती करताना संघराज्य या शब्दाचा उल्लेख न करता भारत हे राज्यांचा संघ असा उल्लेख केला आहे. त्यामुळे डॉ. आंबेडकरांचे भारतीय संघराज्याच्या निर्मितीमधील योगदान महत्त्वाचे आहे, कारण भारतामध्ये संघराज्य आणि संसदीय लोकशाही असल्याशिवाय गत्यंतर नाही यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

डॉ. आंबेडकर संघराज्य पध्दतीच्या कुठल्याही एका तत्वप्रणालीसाठी बांधिल राहत नाहीत. कारण भारतामध्ये संघराज्य व्यवस्था असली तरी आंबेडकरानी राज्याचा संघ असा उल्लेख केला, कारण भारतीय संघराज्य हे अमेरिकन संघराज्याप्रमाणे कराराद्वारे निर्माण झाले नाही किंवा भारतीय घटकराज्यांना बाहेर पडून जाण्याचा अधिकार नाही, कारण भारताची निर्मिती राज्यांनी केली नसून राज्याची निर्मिती भारताने केली आहे.

२६ जानेवारी १९३९ रोजी डॉ. आंबेडकरानी संघराज्यविरुध्द स्वातंत्र्य या विषयावर व्याख्यान दिले होते, त्यामध्ये भारतीय संघराज्य १९३५ च्या कायद्यानुसार स्थापन करण्यात आले असून

संघराज्याची अंमलबजावणी कशी करावी, त्याचे स्वरूप काय याबाबतचे विवेचन केले आहे. या अगोदर १९१९ च्या कायद्यात द्विदल पद्धतीच्या शिफारशी दिसतात. त्याचबरोबर संघराज्याला माझा विरोध नाही असे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे. तर १९४७ साली संघराज्य आणि अल्पसंख्यांक या पुस्तकामध्ये त्यांनी संघराज्यात अल्पसंख्याचा तरतुदीबाबत चर्चा केली आहे कारण आंबेडकराच्या संघराज्य हा संघराज्याच्या एकात्मतेवर आणि अल्पसंख्यांकाच्या संरक्षणावर आधारित आहे. कारण १९३५ च्या कायद्याप्रमाणे होणारे नियोजित संघराज्य हे कायद्याचे संघराज्य होणारे नव्हते, कारण संस्थानिकाच्या प्रतिनिधींना त्यातून फुटून निघण्याचा अधिकार होता, त्यामुळे भारतीय संघराज्य हे विकसित होत असताना एकात्मतेचा मुद्दा महत्त्वाचा होता, कारण भारताच्या विविधतेमध्ये एकता निर्माण करणे गरजेचे होते. त्याचबरोबर संघराज्य निर्माण करताना बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक जातीधर्माचा विचार केला पाहिजे, कारण बहुसंख्यांक जाती अल्पसंख्याकावर वर्चस्व निर्माण करतात, म्हणून अल्पसंख्यांकाना संरक्षण देण्यासाठी काही संरक्षणात्मक तरतूदी करण्याची सूचना डॉ. आंबेडकरानी केली होती, त्याचबरोबर संघराज्य प्रस्थापित करताना घटकराज्याची निर्मिती करण्यासाठी भाषा हाच आधार घेतला पाहिजे, अशी भूमिका स्पष्ट करून राज्याची पुनर्रचना करण्यासंदर्भात भाषावार प्रांत रचनेचा सविस्तर विचार मांडण्यात आला आहे. डॉ. आंबेडकरानी दार आयोगाला एक निवेदन सादर केले होते, त्यानंतर फाजल अली समितीला एक निवेदन सादर केले होते. त्याचबरोबर वृत्तपत्रामध्ये लेखन करून भाषावार प्रांत रचनेसंदर्भात विवेचन केले होते.

डॉ. आंबेडकरांचा संघराज्य विचार हा ऐक्य आणि सामाजिक न्याय या दोन घटकावर आधारलेला आहे याचा युनियन ही संकल्पना देशाच्या एकात्मतेसाठी वापरला आहे तर समाजातील विषमता नष्ट करून देशामध्ये स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, कायद्याचे राज्य आणि अल्पसंख्यांकाचे संरक्षण या मूल्याच्या आधारावर सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हे आंबेडकरांचे ध्येय होते. म्हणून डॉ.आंबेडकरांनी मांडलेल्या भारतीय संघराज्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

### १. प्रबळ केंद्रास प्राधान्य :-

डॉ. आंबेडकरांनी भारतीय संघराज्यामध्ये प्रथम केंद्राला प्राधान्य दिले आहे. कारण भारतामधील त्या वांशिक व भाषिक अस्मितेतून संघर्ष निर्माण झाले आहेत. ते दूर करण्यासाठी राज्य समाजवादाचा विकास करण्यासाठी, अल्पसंख्यांकाच्या संरक्षणासाठी आणि प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी प्रबळ केंद्र सरकार असले पाहिजे अशी आंबेडकरांची भूमिका होती.

### २. व्यक्ती स्वातंत्र्यास प्राधान्य :-

शासनाचे कार्यक्षेत्र ठरवताना डॉ. आंबेडकरांनी व्यक्तीचे हक्क व राज्याची सत्ता यांच्यात समतोल राखण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व नागरिकांच्या व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांना फक्त राजकीय

स्वातंत्र्य अभिप्रेत नव्हते तर त्यामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, बौद्धिक स्वातंत्र्याची राज्याने व्यक्तीला हमी द्यायला पाहिजे असे आंबेडकरांना वाटत होते, त्यामुळे त्यांनी व्यक्ती स्वातंत्र्यास प्राधान्य दिले आहे.

### ३. सत्ता व अधिकारांचे वाटप :-

डॉ. आंबेडकरानी संघराज्य व घटकराज्य याच्यातील सत्तेचे वाटप संघराज्याच्या कायद्याने न करता घटनेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. सत्य घटना हे सत्तावाटपाचे काम करते त्यामुळे घटकराज्ये त्याच्या अधिकारातील विषयासंदर्भात कायदा करण्यास व अंमलबजावणी करण्यास कोणत्याही प्रकारे केंद्र सरकारवर अवलंबून नाहीत. याबाबतीत केंद्र व राज्य समान पातळीवर आहेत असे आंबेडकरांचे सत्ता वाटपाबद्दलचे मत होते. त्याचबरोबर अधिकाराच्या विषयाची वाटप करण्यात आली असून जास्त अधिकार केंद्राला देण्यास आंबेडकरांनी समर्थन केले आहे.

### ४. अल्पसंख्यांकाचे संरक्षण :-

डॉ. आंबेडकरांनी बहुमताच्या हुकूमशाहीतून अल्पसंख्याकाचे संरक्षण करण्यासाठी नियंत्रण आणि समतोलाची योजना मांडली आहे. त्यासाठी ते सत्ता विभाजनाच्या तत्त्वावर भर देतात आणि अल्पसंख्यांकाच्या संरक्षणासाठी छोटी-छोटी राज्ये निर्माण करावीत, विधीमंडळात पुरेशा प्रतिनिधीत्वाची तरतूद करून ठेवावी इत्यादी उपाय डॉ. आंबेडकरानी सुचविले आहेत. त्यामुळे अल्पसंख्याकाचा विकास होईल.

अशाप्रकारे वरील मुद्यांद्वारे डॉ. आंबेडकरांच्या संघराज्याचे प्रारूप स्पष्ट करता येईल.

डॉ. आंबेडकरांच्या संघराज्याचा विचार केला तर असे दिसून येईल की, हे संघराज्य दलितमुक्ती, व्यक्ती स्वातंत्र्य, अल्पसंख्यांकाना संरक्षण इत्यादी घटकांचा समावेश केलेला आहे. त्याचबरोबर राज्यघटनेला मध्यवर्ती मानून केंद्र व राज्य याच्यातील वाद मिटविणे, अधिकाराचे वाटप करणे इत्यादी गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. एकूणच डॉ. आंबेडकरांचा संघराज्य हा भारताची एकसंधता टिकविणे त्याचबरोबर समाजामध्ये न्याय प्रस्थापित करणे या आधारावरच निर्माण झालेला आहे हे दिसून येतो. त्यासाठी भारतातील राज्याची निर्मिती ही भाषेच्या आधारावर निर्माण व्हावी म्हणून भाषावार प्रांतरचनेसंबंधीही चर्चा केली आहे.

### ❒ भाषावार प्रांतरचना :-

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय संघराज्याची बांधणी कशी करावी हा एक मोठा प्रश्न होता. भाषावार प्रांतरचना करावी हे काँग्रेसचे स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील धोरण काहीसे मागे पडले, परंतु भाषिक समूहानी भाषावार प्रांतरचना करण्यासाठी तीव्र आंदोलन सुरू केले, त्यामुळे भारत सरकारने दार

आयोग व जे.व्ही.पी. या दोन समिती स्थापन करून हे प्रश्न मिटवण्याचा प्रयत्न केला, परंतु ते प्रश्न मिटले नाहीत, कारण या दोन्ही समितीने भाषावार प्रांतरचनेच्या विरोधी मते मांडली, त्यामुळे आंध्र प्रदेशात आंदोलनाला हिंसक वळण लागले, शेवटी सरकारने आंध्र प्रदेशाला पहिले भाषिक राज्य म्हणून घोषित केले आणि फाजली अली कमीशन १९५३ साली स्थापन केले आणि त्याच्या शिफारशीनुसार महत्त्वाचा असा राज्यपुर्नरचनेचा कायदा १९५६ साली संमत केला त्यानुसार भारतीय संघराज्यामध्ये घटक राज्याची निर्मिती झाली. भारतीय संघराज्याचा साकल्याने विचार करणाऱ्या डॉ. आंबेडकरानी भाषावार राज्यमीमांसा, महाराष्ट्र हे भाषिक राज्य इत्यादी पुस्तकाद्वारे भाषावार प्रांतरचनेसंबंधी विवेकपूर्ण व चिकित्सक विचार मांडले आहे. डॉ. आंबेडकरांनी राज्याची निर्मिती करताना एक राज्य, एक भाषा ह्या तत्त्वाचा स्वीकार करावा असे स्पष्ट केले आहे. कारण समभाषिकाबद्दल आपुलकी तर अन्य भाषिकाबद्दल दुरावा असे सहानुभूतीच्या भावनेचे दुधारी स्वरूप असते, त्यामुळे एकभाषिक राज्याची आवश्यकता आहे त्याचबरोबर डॉ. आंबेडकरानी प्रादेशिक भाषा या संपर्क भाषा होऊ नयेत, तर त्यासाठी पर्याय म्हणून एक राष्ट्रभाषा हिंदी असावी असे सुचविले आहे, हे ज्याना मान्य नाही तो भारतीय नाही. भाषावार प्रांतरचना करताना डॉ. आंबेडकरानी राज्य निर्मिती करण्यासाठी तीन तत्त्वाचा आधार पाहिजे असे मांडले आहे.

१) तो प्रांत स्वत:चा गुजराण करणारा स्वयंपूर्ण असला पाहिजे.

२) राज्यातील निर्माण होणाऱ्या संभाव्य प्रश्नांची पूर्वजाणीव असणे गरजेचे आहे.

३) एकच भाषा बोलणाऱ्या लोकांचा एका प्रांतात समावेश केल्यानंतर त्याच्यात एकसंधपणा निर्माण होणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे डॉ. आंबेडकरानी भाषावार प्रांतरचना करताना वरील तिन्ही मुद्यांचा विचार करावा असे सुचविले आहे.

डॉ. आंबेडकरानी भाषावार प्रांतरचनेचे खालील मुद्यांचे विवेचन केले आहे.

### १. केंद्र राज्य संबंध :–

डॉ. आंबेडकराच्या मते, भारतातील राज्यपध्दती द्विदल आहे. केंद्र सरकार व प्रांतिक सरकार यामध्ये देशाचा राज्यकारभार विभागलेला आहे. राज्याचे संबंध केंद्रसरकारशी अविभाज्यपणे जोडलेले आहेत. तेव्हा भाषावार प्रांत निर्मितीस मान्यता देण्यापूर्वी नव्या राज्याच्या निर्मितीचा परिणाम केंद्र सरकारच्या कार्यावर घडून येणार आहे, याचा विचार केला गेला पाहिजे.

### २. राज्याची स्वयंपूर्णता :–

डॉ. आंबेडकराच्या मते, राज्य स्वयंपूर्ण असले पाहिजे, राज्याची निर्मिती भाषिक आधारावर झाल्यानंतर तेथील जनतेच्या गरजा पूर्ण करण्याकरिता त्याना मिळणारा महसूल पुरेसा असेल याचा विचार करावा.

## ३. बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक :-

आंबेडकराच्या मते, भारतीय समाजात जातीय विषमता असल्यामुळे बहुसंख्यांक व अल्पसंख्यांक असा जातीयवाद निर्माण होऊन यात अल्पसंख्यांक जाती भरडल्या जातील, तसे घडले नाही तर निदान जुलूम आणि दडपशाही वाढेल, त्यामुळे अल्पसंख्यांकाच्या संरक्षणासाठी कोणतेही राज्य मोठे असता कामा नये आणि त्यातील संघर्ष टिकविण्यासाठी बहुसदस्य मतदार संघाची निर्मिती करावी असे म्हटले आहे.

## ४. उत्तर-दक्षिण संघर्ष आणि तुलना :-

भारतामध्ये उत्तर भारत प्रामुख्याने हिंदी भाषिकांचा आहे, तर सगळ्या अहिंदी भाषा दक्षिणेत बोलल्या जातात, त्यामुळे त्यात संघर्ष निर्माण झाले आहेत, हे संघर्ष निवारण्यासाठी राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषेला मान्यता देण्यात आल्यामुळे हा संघर्ष जास्त तीव्र बनला. डॉ. आंबेडकरानी यांची तुलना करताना उत्तर ही प्रतिगामी आहे तर दक्षिण पुरोगामी आहे. उत्तर पुराणवादी आणि दक्षिण बुध्दीप्रामाण्यवादी आहे अशी तुलना केली आहे.

## ५. दुसऱ्या राजधानीची मागणी :-

डॉ. आंबेडकरानी हैदराबादला दुसरी राजधानी असावी अशी भूमिका मांडली आहे, कारण दक्षिण व उत्तर याच्यात संघर्ष मिटविण्यासाठी हे उपाय सुचविले आहे. दुसरी गोष्ट दिल्ली ही राजधानी राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने अस्थिर आहे, त्यामुळे डॉ. आंबेडकरानी हैदराबादला दुसरी राजधानी म्हणून मान्यता द्यावी असे सूचविले होते.

## ६. मुंबई शहर व संयुक्त महाराष्ट्र :-

भाषेच्या आधारे प्रांताची निर्मिती करताना मुंबई शहरासंदर्भात जो गदारोळ झाला, तेव्हा डॉ. आंबेडकरानी मुंबई शहर महाराष्ट्रापासून वेगळे करता येणार नाही, कारण मुंबईला वीज व पाणी यासाठी महाराष्ट्रावर अवलंबून राहावे लागते असे स्पष्ट केले. सुरुवातीला आंबेडकरानी संयुक्त महाराष्ट्राला विरोध दर्शविला असून नंतर मात्र ते संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबा देताना दिसतात.

अशाप्रकारे डॉ. आंबेडकरानी भाषावार प्रांतरचनेमध्ये आपली भूमिका स्पष्ट केली आहे, त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी भाषावार प्रांतरचनेबाबत विचार मांडताना भाषिक राज्य निर्मितीमुळे राज्यामध्ये जातीचे वर्चस्व निर्माण होईल, अशी भितीही व्यक्त केली होती, त्याबाबत प्रत्येक राज्यामध्ये एक वर्चस्वशाली जात निर्माण झाली आहे. ती कमी करण्यासाठी मोठ्या राज्याची विभागणी दोन किंवा तीन राज्यात करावी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकराना वाटत होते. भाषावार प्रांतरचना केल्यामुळे

भारतीय संघराज्य व्यवस्था व घटकराज्ये एकसंध राहतीलच असे नाही, हे डॉ. आंबेडकराचे मत योग्यच आहे असे वाटते, कारण एकाच भाषिक राज्यामध्ये आर्थिक मागासलेपणाच्या आधारावर वेगळ्या राज्याची मागणी होताना दिसते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी बेळगांव, कारवार व निपाणी ही मराठी भाषिकांचा प्रदेश महाराष्ट्राला मिळाला पाहिजे अशी भूमिका घेतली होती.

## ३.२.३ राज्य आणि राज्यसमाजवादासंबंधीचे विचार

डॉ. आंबेडकरांच्या मते, राज्य ही कल्पना संरचनात्मकरित्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मानवतावादी आदर्शाप्रत नेणारी होती. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा विकास फ्रेंच राज्यक्रांती व युरोपातील प्रबोधनातून झाला आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, राज्याला अधिमान्यता ही स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्याच्या आधारावर मिळते याचा अर्थ राज्य आस्तित्वात येताना स्वातंत्र्य, समता व बंधुता या तिन्ही मूल्याचा संरचनात्मकरित्या समावेश केला जाईल. डॉ. आंबेडकरांच्या मते, उदार लोकशाही राज्य ही या तीनही मूल्यांना योग्यप्रकारे हाताळू शकणारी राजकीय प्रणाली आहे. लोकशाही यशस्वीतेसाठी धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक परिस्थिती ही महत्त्वाची असते. त्यामुळे आंबेडकर असे म्हणतात की, समाज हा मूलभूत संरचनेवर आधारलेली राज्य ही दुसरी संरचना आहे. त्यामुळे कोणतेही राज्य समाजापासून स्वतंत्र असे चालविले जाऊ शकत नाही. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारात संसदीय लोकशाहीचा समन्वय राज्य समाजवादाशी घालण्यात आला आहे. या दोन्ही संकल्पना वरवर पाहता विसंगत वाटत असल्यातरी त्याचा योग्य मेळ घातला गेला तर ते परस्परपूरक वाटतात हे डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही समाजवादाच्या मुळाशी असलेला विचार आहे म्हणून डॉ. आंबेडकरानी आपल्या स्टेटस् ॲण्ड मायनॉरीटीज या पुस्तकात समाजावादाचा पुरस्कार केला आहे, कारण त्याना भारतीय समाजातील जाती व्यवस्था नष्ट करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि व्यक्तीची प्रतिष्ठा या तत्त्वावर आधारलेल्या समाजाची निर्मिती करणे हे डॉ. आंबडेकराचे जीवनध्येय होते. समाजवादी व्यवस्था स्वीकारून सर्व प्रकारचे शोषण आणि गुलामगिरी राज्यघटनेच्या कायद्याद्वारे नष्ट करून सामूहिक हिताची मानवी व्यवस्था रुजविणे हेच त्याचे अंतिम ध्येय होते. यासाठी त्यानी राज्य समाजवादाचा पुरस्कार केला.

१९१७ साली रशियन क्रांती होऊन साम्यवाद प्रस्थापित झाला, त्यामुळे भारतातील अनेक विचारवंताचे आणि राजकीय नेत्यांचे लक्ष समाजवादी विचारांकडे आकर्षित झाले. परंतु डॉ. आंबेडकरानी भांडवलशाही व मार्क्सवाद या दोन्हीला विरोध केला आणि भारतातील सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन लोकशाहीबरोबर समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार केला. कारण त्यांनी स्वत: दारिद्र्य अनुभवले होते, त्यामुळे दारिद्र्य हटविण्यासाठी आधुनिक, औद्योगिक व यंत्रप्रधान सभ्यतेला राज्य समाजवादी विशेषच आवश्यकता आहे असे आंबेडकराचे मत होते. कारण या सभ्येतेचे काही दोष आहेत, त्याचे सामाजिक आणि आर्थिक घटकांवर वाईट परिणाम होतो. हा परिणाम यंत्राचा

आणि आधुनिकतेचा लाभ होण्यास अडथळा निर्माण करतो, म्हणून यंत्राला किंवा आधुनिकतेला विरोध न करता समाजरचना बदलून टाकण्याचा प्रयत्न करणे योग्य आहे, असे डॉ. आंबेडकरानी विचार केला आणि भारतीय समाजात आर्थिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी राज्यसमाजवादाचा पुरस्कार केला.

डॉ. आंबेडकरानी १९३६ साली स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला आणि त्याच्या जाहीरनाम्यात शेती विकासासाठी बँक स्थापन करणे, व्यवसाय शिक्षणाचा कार्यक्रम सरकारने हाती घ्यावा. देशातील प्रमुख उद्योगधंद्याची मालकी व व्यवस्था सरकारने आपल्या हाती घ्यावी. कामगारांना वेतन ठरवून द्यावे. कामगार वर्गाच्या हितासाठी कामाचे तास, वेतन, पगारवाढ, बडतर्फी यावर सरकारचे नियमन असावे इ. गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. त्याचबरोबर १९४७ साली घटनापरिषदेला एक राज्य समाजवादाबाबतच आराखडा सादर केला होता, त्यात महत्त्वाचे उद्योगधंदे शासनाकडे असावेत, विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करून सर्व प्रौढ नागरिकांचा सक्तीने विमा उतरवावा. शेती व्यवसायावर राज्याची मालकी असावी. कोणी जमीनदार किंवा भूमीहीन नसावा. शेतजमीनेचे सामुदायिक तत्त्वानुसार शेतकऱ्यांसाठी दिली जावी इत्यादी अनेक गोष्टींचा समावेश करण्यात आला होता, यावरून आंबेडकर राज्य समाजवादाचे किती आग्रही होते हे दिसून येते.

## ❒ राज्यसमाजवादाची वैशिष्ट्ये :-

### १. महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण :-

राज्याने काही महत्त्वाचे व मौलिक उद्योगधंदे आपल्या ताब्यात घेतले पाहिजेत, त्यामुळे आर्थिक शोषणाला आळा घालता येईल, त्याचबरोबर आर्थिक नियोजनाद्वारे व प्रभावी अंमलबजावणीतून राज्याच्या उत्पन्नात वाढ होईल आणि मालमत्तेची न्याय विभागणी करू शकेल, त्याद्वारे व्यक्तीचे स्वातंत्र्य खऱ्या अर्थाने सुरक्षित करण्याचा मार्ग आहे, असे आंबेडकराना वाटत होते, म्हणून उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरणावर भर द्यावा.

### २. सामूहिक शेतीचा पुरस्कार :-

भारत हा शेतीप्रधान देश आहे, परंतु तो शेतीबाबत मागासलेला आहे. शेती करण्याची भारतातील पध्दती पारंपरिक असल्यामुळे उत्पादन क्षमता घटलेली आहे. जमीनदार वर्गाकडून शेतकऱ्याची व मजुरांची पिळवणूक व शोषण होत आहे, त्यासाठी शेतीचे राष्ट्रीयकरण करून शेतीची मालकी राज्याने स्वीकारावी. सरकारच्या शेतजमिनी सामुदायिक सहकारी पध्दतीने मशागतीसाठी वापराव्यात यातून मालक कुठे असा फरक राहणार नाही. उत्पादनात वाढ होईल हे उत्पादन सर्व शेतकऱ्यांना समान व न्याय पध्दतीने वाटप करण्यात येईल. शेतकऱ्यांचे दारिद्र्य निर्मूलन करणे शक्य होईल. ग्रामीण भागात शेतजमिनीच्या मालकीतून निर्माण झालेली आर्थिक विषमता दूर होईल.

### ३. सामाजिक समता :-

आंबेडकराच्या दृष्टीने समता हे सर्वश्रेष्ठ लोकशाही मूल्य असून त्याला वगळून समाजवादासंबंधी विचारच होऊ शकत नाही. कारण परिश्रम आणि श्रमनिष्पत्ती याची समान विभागणी करू शकणारा समाज हे समाजवादाचे अंतिम ध्येय आहे. समाजवाद हे समाजाला समपातळीवर आणणारी प्रक्रिया आहे. माणसामाणसामध्ये भेद करता येत नाही, हे आंबेडकराचे मत आहे. कारण असा भेदभाव एकजिनसी समाज निर्माण होऊ देत नाही. एवढेच नव्हे तर मानवतेच्या प्रतिष्ठेला तो मारक ठरतो. म्हणून भारतातील सामाजिक भेदभाव दूर करणे अत्यावश्यक वाटते, त्यामुळेच आंबेडकरांच्या मते, भारतासाठी समाजवादाचा संदर्भ आर्थिकपेक्षा सामाजिकदृष्ट्या जास्त आहे.

### ४. वस्तूचे न्याय वितरण :-

वस्तूच्या उत्पादनावर वितरणावर आणि मूल्यावर राज्याचे नियंत्रण असावे. ही भूमिका डॉ. आंबेडकरानी मांडली. वितरणाचे कार्य करताना उत्पादित झालेल्या वास्तूचे न्याय वितरण होणे गरजेचे आहे. देशातील नागरिकांना लागणाऱ्या सर्व वस्तू योग्य किंमतीनुसार पुरेशा प्रमाणात मिळतात किंवा नाही हे सरकारने पहावे. त्यात काही दोष आढळल्यास त्याच्या दुरुस्तीसाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा, अशी भूमिका डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे.

### ५. गुणानुसार व्यवसायाची संधी :-

भारतीय समाजातील व्यक्तीचा व्यवसाय त्याच्या गुणाऐवजी जन्मानुसार किंवा वर्णानुसार ठरतो. काही व्यवसायामध्ये प्रवेश करण्यास विशिष्ट वर्गातील व्यक्तींना बंदी आहे. राज्यसमाजवाद ही व्यवसायबंदी नष्ट करतील आणि गुणवत्तापूर्वक पात्र आणि इच्छा असलेल्या प्रत्येक व्यक्तीला कोणताही व्यवसाय करण्यासाठी संधी द्यावी व उद्योग व्यवसायाचे नियंत्रण राज्याकडे असावे आणि त्यानी ते व्यक्तीना द्यावे.

### ६. आर्थिक क्षेत्रातील परिवर्तन :-

भारतीय समाजाच्या आर्थिक परिवर्तनासाठी डॉ. आंबेडकरांनी राज्यसमाजवादाचा पुरस्कार केला. त्यांच्या मते, लोकांच्या आर्थिक जीवनाचे नियंत्रण राज्याकडून झाले पाहिजे, यासाठी वस्तूचे उत्पादन व वितरण राज्याच्या कार्यक्षेत्रात येण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही. समाजातील आर्थिक विषमता आणि गरिबी दूर करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. अशारितीने डॉ. आंबेडकरानी राज्यसमाजवादामध्ये शासनाची भूमिका महत्त्वाची मानली आहे. शासन ही संस्थाच आर्थिक व सामाजिक परिवर्तन करू शकते, यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

### ७. ग्रामीण विकासाला प्राधान्य :-

ग्रामीण सुधारणा घडवून आणणे व त्याद्वारे कोट्यवधी खेडूताना राष्ट्रीय प्रवाहात आणणे, शहरी ग्रामीण विकासात समतोल साधणे. जातिमुक्त समाज सर्व पातळ्यांवर निर्माण करते अशी भूमिका ही डॉ. आंबेडकरांनी मांडली आहे.

वरीलप्रमाणे डॉ. आंबेडकराची राज्य समाजवादाची वैशिष्ट्ये आहेत. यातून भारतीय सामाजिक व आर्थिक स्थितीचा विचार करून या देशाला राज्य समाजवाद कसा व्यवहार्य आहे याचे विवेचन आंबेडकरानी केल्याचे दिसून येते. डॉ. आंबेडकराना अपेक्षित असलेला राज्यसमाजवाद संविधानिक आणि सनदशीर मार्गावर विश्वास ठेवतो, त्यामध्ये स्वातंत्र्य व समता ही लोकशाही मूल्ये जतन केली पाहिजे आणि देशातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील बदल केले पाहिजे, यासाठी राज्यसमाजवाद हाच उत्तम पर्याय आहे. या भूमिकेवर बाबासाहेब आंबेडकर कायम असल्याचेही लक्षात येते. त्याप्रमाणे बाबासाहेब आंबेडकर राज्य समाजवादाचा पर्याय देऊन त्याद्वारे समाजामध्ये आर्थिक व सामाजिक क्षेत्रामध्ये परिवर्तन होवू शकेल, म्हणून राज्यसमाजवाद हाच पर्याय योग्य असल्याचे ते बजावून सांगतात.

राज्य समाजवादाचा मुद्दा स्पष्ट करताना डॉ. आंबेडकरांनी आणखी एका मुद्याची चर्चा करतात, ते म्हणजे अल्पसंख्यांक व मागासवर्गाची सुरक्षितता होय. त्यांच्या मते, खालील गोष्टीची भारतीय संघराज्याच्या घटनेत तरतूद असावी.

१) कायदेमंडळाची मुदत संपण्यापूर्वी केंद्र किंवा राज्याची बिगर संसदीय स्वरूपाच्या कार्यकारिणीत कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येऊ नये.

२) कार्यकारिणीचे सदस्य हे जर कायदेमंडळाचे सदस्य नसतील तर त्यांना कायदेमंडळात बसण्याचा, बोलण्याचा, मतदान करण्याचा व प्रश्नांना उत्तरे देण्याचा अधिकार असावा.

३) एकमेव हस्तांतरीय मताने संपूर्ण सभागृहाने पंतप्रधानाची निवड करावी.

४) कायदेमंडळातील वेगवेगळ्या अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधीची निवड कायदेमंडळातील प्रत्येक अल्पसंख्यांक जमातीच्या सदस्यांनी एकमेव हस्तांतरीय मतांची निवड करावी.

५) कार्यकारिणीतील बहुसंख्यांक समाजातील प्रतिनिधीची निवड संपूर्ण सभागृहाने एकमेव हस्तांतरीय मताने निवड करावी.

६) एका अधिकाऱ्याची नियुक्ती करावी त्यास अल्पसंख्यांक व्यवहार खात्याचे पर्यवेक्षक समजण्यात यावे.

७) पर्यवेक्षणात महालेखापाल यांच्या समकक्ष दर्जा असावा व त्याची हकालपट्टी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांच्याप्रमाणे व्हावी.

८) सार्वजनिक ठिकाणी अल्पसंख्यांकांना मिळणाऱ्या वागणूकीबाबत त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत वार्षिक अहवाल तयार करणे हे या पर्यवेक्षणाचे कर्तव्य आहे.

९) हा अहवाल कायदेमंडळात सादर केला पाहिजे आणि या अहवालावर चर्चा करण्यासाठी वेळ उपलब्ध करून देणे हे केंद व राज्य शासनावर बंधनकारक आहे.

१०) सामाजकि बहिष्कार टाकणे, सामाजिक बहिष्कारास चिथावणी देणे किंवा सामाजिक बहिष्काराची धमकी देणे हे अपराध म्हणून करावे.

११) केंद्रीय व प्रांतिक कायदेमंडळात मागासवर्गीय जातीला किमान प्रतिनिधित्व असले पाहिजे आणि ते त्यांच्या लोकसंख्येच्या समप्रमाणात प्रतिनिधी असले पाहिजेत.

१२) केंद्रीय व प्रांतिक कार्यकारणीवर मागासवर्गीय जातीना किमान प्रतिनिधीत्व असले पाहिजे आणि ते त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार प्रतिनिधीत्व असले पाहिजे.

१३) केंद्र सरकार, राज्य सरकार व नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थाच्या नोकऱ्यांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात मागासवर्गीयांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत.

१४) मागासवर्गीय जातीच्या उच्चशिक्षित माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक जबाबदारी केंद्र व राज्य सरकारने स्वीकारावी व त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करावी.

१५) मागासवर्गीय जातीचे स्वतंत्र खेड्यात पुनर्वसन करण्याच्या उदात्त हेतूने पडीक जमीन ताब्यात घेण्यासाठी नवीन घटनेतील तरतुदीनुसार पुनर्वसन आयोगाची स्थापना करण्यात यावी.

वरील सर्व तरतुदीची शिफारस करून डॉ. आंबेडकरांनी अल्पसंख्यांक व मागासलेल्या सुरक्षिततेला प्राधान्य दिले. नंतर घटना तयार करताना आंबेडकरांनी काही गोष्टींना मान्यता दिली तर काहीना मान्यता दिली नाही, कारण भारतीय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वांकडे दृष्टीक्षेप टाकल्यास घटनाकारांनी कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या समाजवादासाठी राज्यव्यवस्थेत बंधनकारक मानलेले नाही. बदलत्या परिस्थितीत समाजवादाचा योग्य बाजूने विचार करून त्यांची अंमलबजावणी करता यावी. या स्वरूपाची लवचिकता ठेवलेली आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, भारतीय घटनेतील मार्गदर्शक तत्वाचे ते बलस्थान आहे. या तत्त्वांना समाजवाद आणि आर्थिक लोकशाहीचे दीपस्तंभ मानलेले आहे. लोकशाही समाजवादासाठी पुरस्कार केलेला होता हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

## ३.२.४ डॉ. आंबेडकरांचे मार्क्सवादावरील विचार

मार्क्सच्या तत्वज्ञानाचे स्थान युरोपच्या वैचारिक इतिहासात महत्त्वाचे आहे. औद्योगिक क्रांतीनंतर जगामध्ये भांडवलदाराचे मक्तेदारी निर्माण होऊन समाजामध्ये श्रीमंत व गरिबीची या दोन वर्गातील

आर्थिक दरी अधिकाधिक रुंदावत गेल्या तेथून कामगाराचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते. कामगारामध्ये अस्वस्थता जाणवत होती. त्याच काळात मार्क्सने साम्यवादी तत्त्वज्ञान सांगून कामगाराची हुकूमशाही प्रस्थापित करण्यासंबंधाचे विचार मांडले. मार्क्सने तत्त्वज्ञानाच्या आधारावर रशियामध्ये क्रांती झाली आणि साम्यवादी व्यवस्था अस्तित्वात आली. त्यानंतर पूर्व युरोपामध्ये मार्क्सचे साम्यवादी तत्वज्ञानाचे वारे मोठ्या प्रमाणात वाहू लागले आणि मार्क्सवादाचे तत्त्वज्ञान हे नव्या युगातील एक महत्त्वाचे तत्त्वज्ञान म्हणून उदयास आले. पूर्व युरोपातील अनेक राष्ट्रांनी साम्यवादाचा स्वीकार केला, हा साम्यवादाचा विचार जगभर पसरत असताना भारतामध्येही आला. भारतीय अनेक लोकांनी साम्यवादासंबंधी आणि मार्क्सच्या अनुषंगाने लिखाण केले. कारण मार्क्सवाद हे एक नवे तत्त्वज्ञान होते, परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी भांडवलशाही व्यवस्था व मार्क्सचे साम्यवादी व्यवस्था याबाबत चिकित्सक अभ्यास केला आणि त्यावर विचार मांडले आहे.

डॉ. आंबेडकरानी आयुष्याच्या अखेरीला बुध्द आणि मार्क्स नावाचा निबंध लिहून मार्क्सवादाचे स्वत:चे विचार निसंदिग्धपणे स्पष्ट केले. आंबेडकरानी बुध्दाच्या आणि मार्क्सच्या तत्वप्रणालीची सर्व प्रथम मांडणी केली आहे, त्यात मार्क्सवादाबद्दल ते म्हणतात की, समाजवाद हा अटळ आहे. हा मार्क्सवादी दावा पूर्णपणे फोल ठरला आहे. साम्यवाद रशियात प्रत्यक्षात आणण्यासाठी (पाऊल टाकण्याची शक्यता निर्माण होण्यापूर्वी) पुष्कळच हिंसा व रक्तपात घडवून आणावा, ह्याकरिता जाणीवपूर्वक योजना आखावी लागली. इतिहास घडण्यास कारण म्हणून आता कोणतेही (इतिहासाचे) आर्थिक स्पष्टीकरण स्वीकारत नाही. कामगारांना वाढत्या प्रमाणात भिकेस लावले गेले आहे हे कोणीही मान्य करीत नाही. डॉ. आंबेडकरांनी बुध्दाच्या व मार्क्सच्या तत्वज्ञानाचे सार काही सुत्रांमधून थोडक्यात सांगितले आहे. त्यातील बुध्दाच्या तत्त्वज्ञानातील महत्त्वाचे मुद्दे असे.

१) स्वतंत्र समाजासाठी धर्म आवश्यक आहे.

२) धर्माचे कार्य जगाची पुनर्रचना करणे व त्याला सुखी करणे हे आहे. जगाचा आदि, अंति स्पष्ट करणे हे नाही.

३) हितसंबंधामधील संघर्ष हे जगातील दु:खाचे कारण आहे.

४) संपत्तीच्या खाजगी मालकी हक्कामुळे सत्ता एका वर्गाच्या हाती व दु:ख दुसऱ्या वर्गाच्या कपाळी असे होते.

५) दु:खाचे कारण नाहीसे करून दु:ख नाहीसे करणे चांगल्या समाजासाठी आवश्यक आहे.

६) सर्व माणसे समान आहेत.

७) सत्य आणि न्याय यांच्यासाठी लढले जाणारे युद्ध समर्थनीय असते.

उपरोक्त मुद्यांपैकी काही मुद्दे मार्क्सवादाच्या भाषेत आहेत, हे सांगायची गरज नाही.

बुध्दाच्या उपदेशाचे सार सांगून झाल्यानंतर मार्क्सच्या तत्वज्ञानाचे सारही ते सांगतात, त्यातील महत्त्वाचे मुद्दे असे.

१) तत्वज्ञानाचे कार्य विश्वाच्या आदि-अंताचे स्पष्टीकरण करणे हे नसून जगाची पुनर्रचना करणे हे आहे.

२) मालक आणि श्रमिक या दोन वर्गामध्ये समाजाची विभागणी झालेली आहे.

३) दोन वर्गामध्ये सतत संघर्ष चाललेला असतो.

४) श्रमिकांच्या श्रमातून उत्पन्न झालेले अतिरिक्त मूल्य हडप करून मालक श्रमिकाचे शोषण करीत असतात.

५) उत्पादन संपत्तीचे राष्ट्रीयीकरण करून म्हणजेच खाजगी संपत्तीचा हक्क नष्ट करून हे शोषण थांबवता येईल.

६) समाजवाद अपरिहार्य आहे.

परंतु आंबेडकराना आज कार्ल मार्क्सचे खालील तत्त्वज्ञान उपयोगाचे आहे असे वाटते.

१) तत्त्वज्ञानाचे कार्य जगाची पुनर्रचना करणे आहे, विश्वाच्या उगमस्थानाचे स्पष्टीकरण करण्यात वेळ नष्ट करणे आहे.

२) वर्गावर्गामध्ये हितसंबंधाचा कलह आहे.

३) संपत्तीच्या खाजगी मालकीमुळे एका वर्गाला सत्ता मिळते तर दुसऱ्या वर्गाला त्यांची पिळवणूक झाल्यामुळे दु:ख मिळते.

४) समाजाच्या भल्यासाठी खाजगी संपत्ती नष्ट करून हे दु:ख दूर करणे आवश्यक आहे.

डॉ. आंबेडकरानी बुध्द आणि मार्क्सची तुलना करताना मार्क्सच्या तत्त्वज्ञानातील काही साम्य भेदाचा विचार केल्याचे दिसून येते. ही साम्यभेद पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

## १. दु:ख निवारणाची गरज :-

जगात दु:ख आहे ते दु:ख नष्ट करण्यासाठी खाजगी मालमत्तेचा हक्क नष्ट केला पाहिजे आणि त्यासाठी राजकीय सत्ता कामगारवर्गाच्या हातात असली पाहिजे, ही मार्क्सवादाची तीन आधारमूल्ये आहेत. त्याप्रमाणे बुध्दानी ही दु:खाची संकल्पना ही अडीच हजार वर्षांपूर्वी मांडली आहे. परंतु मार्क्स व बुध्दाची भाषा तेवढी भिन्न आहे, कारण मार्क्स दु:खासाठी पिळवणूक हा शब्द वापरतो,

त्यामुळे बुद्ध मार्क्सपासून वेगळा नाही, त्यासंदर्भात आंबेडकरानी असे म्हणतात की, बुध्द आणि कार्ल मार्क्स यांच्या विचाराचा मूलाधार एकच आहे ते म्हणजे दु:ख निवारण आहे. परंतु आंबेडकरांनी साम्यवाद अस्तित्वात आणण्यासाठी कम्युनिस्ट कोणत्या साधनाचा उपयोग करतात याकडे लक्ष केंद्रित केलेले आहे. कारण डॉ. आंबेडकरांना बुध्द आणि मार्क्स यांच्यात साधर्म्य आढळत होते, परंतु व्यवहारात या दोघात मात्र त्यांना मतभिन्नता दिसत होती याचा अर्थ बुध्द आणि मार्क्स हे दोघेही साम्यवादी होते. तर तो प्रस्थापित करण्याचे मार्ग मात्र भिन्न आहेत म्हणून डॉ. आंबेडकरांनी साधनाची भिन्नता स्पष्ट केली आहे.

## २. साधनांची भिन्नता :-

कम्युनिस्ट नेते साम्यवादाच्या निर्मितीसाठी हिंसेचा मार्ग अवलंबतात आणि विरोधकांना मारतात. याच ठिकाणी बुध्द व कार्ल मार्क्स यांच्यात मूलभूत भेद आहे. कारण बुध्दाने मानसिक परिवर्तन नैतिक शिकवण व प्रेम या साधनाच्या साहाय्याने बुध्द विरोधकांना जिंकता येते असे सांगितले आहे, त्यामुळे आंबेडकरानी मार्क्सवादाचे जे हिंसेचे साधन आहे, त्याच्याविरुध्द होते. बुध्द धर्म महत्त्वाचा आहे असे सांगतो. मार्क्सवाद्याच्या धर्मद्वेषाला त्याची कधीही मान्यता नव्हती. एक कायमची हुकूमशाही म्हणून राज्याविषयी असलेला मार्क्सवादी सिध्दांत डॉ. आंबेडकरांना पटला नव्हता म्हणून शेवटी असे म्हणतात की, साम्यवाद केवळ समता ही एकच गोष्ट देऊ शकतो. सहभाव व स्वातंत्र्य या गोष्टी देवू शकत नाही. कारण साम्यवाद्यांनी स्वीकारलेली साधने ही लवकर अंमलात येणारी आहेत, ती म्हणजे हिंसा आणि कामगाराची हुकूमशाही त्याचबरोबर साम्यवादाकडे कामगारांची हुकूमशाही संपविण्यासाठी उत्तर नाही हे नमूद करतात. तसेच कामगाराची का असेना पण हुकूमशाहीत केवळ पालन करणे एवढेच कर्तव्य असते, पण तिच्यावर टीका करण्याचा हक्क साम्यवाद देत नाही, तर त्याचे हुकूमशाही साध्य करण्यासाठी हिंसा लोकांच्या कत्तली हे मार्ग अनुसरतात. ज्या मार्गांनी ती नाहीच साध्य झाली तर त्यावर काही उपाय नाही. मात्र बौध्द धर्माच्या मार्गाने ती जरी पुन:पुन्हा अयशस्वी ठरली तरी त्यावर पुन:पुन्हा प्रयत्न करत राहणे हा उपाय असू शकतो. परंतु साम्यवादाने धर्म मानायला तयार नाहीत, त्यांच्या मते, धर्म ही लोकासाठी अफूची गोळी आहे, परंतु आंबेडकरानी जीवनाच्या तथ्याशी माणूसकीसाठी धर्माची आवश्यकता आहे असे मानले.

## ३. धर्म एक प्रभावी शक्ती :-

बळाचा वापर करून साम्यवादी व्यवस्था प्रस्थापित करण्याचे विचार मार्क्सवादाला अभिप्रेत आहे. त्यामुळे मार्क्स धर्माला नाकारतो, कारण ख्रिश्चन धर्माने दारिद्र्याचे उदात्तीकरण केले आणि गरीबांना स्वर्गाच्या कल्पनेत गुंगविले म्हणून कम्युनिस्टांचा ख्रिश्चन धर्मावर राग होता. परंतु बुध्दाच्या धम्मात तर हे काहीच नाही, उलट हा बुध्द धम्म साम्यवादाला उपयोगी पडणारा आहे. त्यामुळे बौध्द धर्म हा

मार्क्सवादाचा शत्रू नसून मित्र आहे व मार्क्सवाद्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार करावा असा सल्ला डॉ. आंबेडकर मार्क्सवाद्यांना देतात. कारण बौध्द धर्म हा लोकशाही पुरस्कृत करणारा धर्म आहे.

स्वत: गौतम बुध्द शाक्य संघाच्या गणराज्यातील असल्याने त्याला लोकशाही परंपराबद्दल आदर होता. इतकेच नव्हे तर त्याने बौध्द संघाची रचना गणराज्याच्या धर्तीवर लोकशाही पध्दतीने केलेली होती. बौध्द धर्म हा स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या मूल्यांवर आधारित असलेल्या लोकशाही राज्यपध्दतीशी सुसंगत आहे अशी बाबासाहेबांची खात्री पटल्याने त्यानी बौध्द धर्माचा पुरस्कार केला हे स्वाभाविक आहे. कारण साम्यवाद हिंसेचा पुरस्कार करतो. बौध्द धर्म अहिंसेचा पुरस्कार करतो. या सर्व गोष्टींचा विचार करून डॉ. आंबेडकरांनी हे साम्यवादाला बौध्द धर्म एक पर्यायी व्यवस्था म्हणून स्वीकारावा असा सल्ला आंबेडकरांनी दिला आहे.

अशाप्रकारे आंबेडकरानी मार्क्सवादाच्या साध्य एकच असले तरी साधन जे वापरले आहेत, त्यावर आक्षेप घेतला आहे तो म्हणजे त्यानी स्वीकारलेल्या हिंसेची कल्पना आणि कामगार वर्गाची हुकूमशाही हे आहेत. डॉ. आंबेडकरानी दु:ख निवारण्यासाठी बौध्द धर्माचे पर्याय सांगून बौध्द धर्मातील पंचशील तत्त्वे व आष्टांग मार्ग यासर्व गोष्टीचा विचार करून जगातील दु:ख निवारण करता येतो, असे पर्याय देतात. बुध्द की मार्क्स असा विचार केला तर या दोघांना सामावून घेणारा आंबेडकरवाद आहे असे घ्यावे लागेल, कारण आंबेडकरानी मार्क्सवाद्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार करून जगाला एक नवीन व्यवस्था द्यावी असे ते म्हणू लागले.

## ३.३ सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक दृष्टीकोनाची चर्चा करताना भारतीय राष्ट्रवादाच्या संदर्भात त्यांनी केलेली मांडणी महत्त्वाची आहे, कारण भारतीय राष्ट्रवादाची जी जडणघडण झाली ती प्रामुख्याने उच्चवर्गीय, उच्च जातीय लोकांना समाविष्ट करण्याच्या उद्देशाने निर्माण झालेली आहे, त्यामुळे डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद हा गोरगरीब दलित लोकांना समाविष्ट करणारा आहे. जेणेकरून दलित व गरीब लोकांना समान संधी व मानवी हक्क मिळावे या विचाराने प्रेरित झालेला राष्ट्रवाद डॉ. आंबेडकरांनी मांडला आहे. त्याचबरोबर भारतीय संघराज्याच्या विकासामध्ये डॉ. आंबेडकरांनी भाषावार प्रांतरचनेची जी काही भूमिका मांडली आहे ते अतिशय योग्य आणि महत्त्वाची आहे, कारण डॉ. आंबेडकरांनी मोठ्या राज्याची विभागणी करून छोटे राज्य निर्माण करावे हा विचार २००० साली भारतीय सरकारने स्वीकारून त्यानुसार झारखंड, छत्तीसगड आणि उतरांचलची निर्मिती केली तर २०१४ साली तेलंगणा राज्याची निर्मिती झाली, त्यामुळे भारतीय संघराज्य निर्माण होण्यासाठी भाषावार प्रांतरचना हे महत्त्वाचे आधार बनले, त्याचबरोबर राज्यसमाजवादाची मांडणी डॉ. आंबेडकरांनी केली तेही आजच्या संदर्भात महत्त्वाचे आहे, कारण आजच्या शेती उत्पादनाचा विचार केला तर समूह शेती करण्याची गरज आहे. सरकारने

उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण करून लोकांना आर्थिक पाठबळ देणे गरजेचे आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी मार्क्सवादासंदर्भात चर्चा केली आहे किंवा त्यासंदर्भात चिकित्सा केली ती महत्त्वपूर्ण गोष्ट आहे, कारण मार्क्सवाद हा जगामध्ये १९९१ साली कोसळला आणि सोव्हिएत युनियनचे विघटन होऊन साम्यवादाचे वर्चस्व कमी झाले. सर्व देशांमधून साम्यवादावर टीका होण्यास सुरुवात झाली. या सर्व घटनांचा विचार केला असता मार्क्सवादाची लोकप्रियता कमी झाली आहे असे म्हणावे लागेल. म्हणून डॉ. आंबेडकरांनी मार्क्सवादाला बौध्द धम्माचा दिलेला पर्याय योग्य आहे असे वाटते, कारण हिंसेवर जास्त वेळ सत्ता टिकत नाही तर अहिंसेवर टिकते हा विचार आजही महत्त्वपूर्ण आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **राष्ट्रवाद :** राष्ट्रीयत्वाची भावना.
- **भाषावार प्रांतरचना :** भाषेवर आधारित राज्याची निर्मिती करणे.
- **संघराज्य :** एक शासनप्रणाली (केंद्र व राज्य सरकार)

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादावरील विचार स्पष्ट करा.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संघराज्य व भाषावार प्रांतरचनेविषयीचे विचार स्पष्ट करा.

३. डॉ. आंबेडकरांची राज्य समाजवादाबद्दलची भूमिका स्पष्ट करा.

४. डॉ. आंबेडकरांनी केलेली मार्क्सवादाची चिकित्सा स्पष्ट करा.

## ३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **कुबेर वा.ना.** (१९७२) : *''डॉ. आंबेडकर : विचारमंथन''*, केसरी प्रकाशन, पुणे.

२. **बाबर अशोक** (२०१६) : *''आंबेडकरवाद''*, प्रकाशक-कोटी ॲण्ड बाबर पब्लिशर्स एलएलपी, सोलापूर.

३. **आंबेडकर भिमराव रामजी** (२०१२) : *''बुध्द आणि कार्ल मार्क्स''*, प्रबुध्द भारत प्रकाशन, नागपूर.

४. **रघुवंशी राजेश** (१९९८) : *''डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निवडक लेख''*, राजेश प्रकाशन, पुणे.

५. **गायकवाड सुर्यकांत** (२०१६) : *''डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाषावार प्रांतरचना''*, प्राजक्त प्रकाशन, पुणे.

६. **कसबे रावसाहेब** (२०१७) : *''आंबेडकर आणि मार्क्स''*, सुगावा प्रकाशन, पुणे.

७. **राव राघवेंद्र** (२०१७) : *''बाबासाहेब आंबेडकर''*, साहित्य अकादमी, दिल्ली.

८. **समाजप्रबोधन पत्रिका विशेषांक** : ऑक्टोबर-डिसेंबर, २०१६.

❒ ❒ ❒

घटक-४

# डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा लोकशाहीविषयक दृष्टिकोन

## (Dr. B. R. Ambedkar's Views on Democracy and Development)

**(अ) उदारमतवादी, सामाजिक आणि आर्थिक लोकशाही (Liberal, Social & Economic Democracy)**

**(ब) लोकशाहीच्या यशस्वीतेतील अटी (Conditions for Successful Democracy)**

**(क) डॉ.आंबेडकरांचा विकासविषयक दृष्टिकोन (Ambedkar's View on Development)**

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ लोकशाही संकल्पना

४.२.१.१ लोकशाही म्हणजे काय?

४.२.१.२ लोकशाहीची वैशिष्ट्ये

४.२.२ डॉ.बी.आर.आंबेडकर यांचा लोकशाहीविषयक दृष्टिकोन

४.२.२.१ उदारमतवादी लोकशाही

(१) उदारमतवादी लोकशाही व्यवस्थांचा उदय

(२) उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेची वैशिष्ट्ये

(३) पाश्चिमात्त्य उदारमतवादी लोकशाही

(४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उदारमतवादी लोकशाहीविषयक विचार

४.२.२.२ सामाजिक लोकशाही

४.२.२.३ आर्थिक लोकशाही

४.२.२.४ लोकशाहीच्या यशस्वीतेतील अटी

४.२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विकासविषयक दृष्टिकोन

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासात आपणांस खालील उद्दिष्ट्ये साध्य होतील.

१. डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा लोकशाहीविषयक दृष्टिकोन समजून घेता येईल.

२. डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा उदारमतवादी लोकशाही, सामाजिक लोकशाही, आर्थिक लोकशाही विषयक विचार समजून घेता येतील.

३. डॉ. बी. आर. आंबेडकर यांना अभिप्रेत असणाऱ्या लोकशाहीच्या यशस्वीतेचे घटक अभ्यासता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण लोकशाहीची माहिती घेणार असून डॉ. आंबेडकर यांनी मांडलेला लोकशाहीविषयक दृष्टिकोन अभ्यासणार आहोत. सन १९२० च्या दशकानंतर डॉ. आंबेडकर यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रामध्ये योगदान देण्यास सुरुवात केली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये डॉ. आंबेडकर यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. म्हणून डॉ. आंबेडकर यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हटले जाते. भारतीय राज्यघटना ही लोकशाहीची आधारभूत शिला आहे. डॉ. आंबेडकर यांनी भारतीय समाजव्यवस्थेत लोकशाही प्रणाली स्वीकारून लोकशाही व्यवस्था रुजविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका घेतली. यातूनच डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे महत्त्व

अधोरेखित होते. लोकशाही व्यवस्था भारतीय राज्यघटनेत स्वीकारल्याने राजकीय व्यवस्थेला नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले. स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या मूल्यांतून लोकशाही व्यवस्था बळकट करताना सामाजिक व राजकीय व्यवस्थेला नवा अध्याय प्राप्त करून दिला.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ लोकशाही संकल्पना

### ४.२.१.१ (अ) लोकशाही म्हणजे काय?

लोकशाहीच्या विविध विचारवंतांनी सर्वमान्य केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे :-

**१. अब्राहम लिंकन :** ''लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी चालविलेले राज्य होय.'' ("Democracy is the Government of the people, by the people & for the people.")

**२. प्रो. हेरॉल्ड लास्की :** ''लोकशाही हे केवळ शासनाचे स्वरूप नाही, तर ते समाजाचे, राज्याचे तसेच आर्थिक व नैतिक व्यवस्थेचे एक स्वरूप आहे.'' ("Democracy is not a mere form of Government rather it is a form of society, state and Economic and moral order.")

**३. महात्मा गांधी :** ''लोकशाही हा एक जीवनमार्ग आहे.'' ("Democracy is a way of Life.")

**४. पंडित जवाहरलाल नेहरू :** ''लोकशाही म्हणजे केवळ मतदानाच्या हक्कांसंबंधीची राजकीय समता नव्हे तर राजकीय समतेबरोबर आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित करणे होय.'' ("Democracy does not merely mean a political equality for right to vote, it is to establish economic and social equality along with political equality.")

दि. २२ डिसेंबर, १९५२ रोजी 'पुणे डिस्ट्रिक्ट लॉ लायब्ररी तर्फे' आयोजित केलेल्या भाषणात डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी लोकशाहीची व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

**५. डॉ. आंबेडकर :** ''रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रकारास आणि पध्दतीस लोकशाही म्हणतात.''

### ४.२.१.२ (ब) लोकशाहीची वैशिष्ट्ये (Characteristics of Democracy)

लोकशाहीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) व्यक्ती स्वातंत्र्यामध्ये अभिव्यक्ती, व्यवसाय, धर्म, आचारपध्दती, संस्कृती यांचा समावेश असल्याने व्यक्तिविकासासाठी राज्याने व्यक्ती स्वातंत्र्याला प्रोत्साहन दिले पाहिजे.

२) लोकशाही व्यवस्थेमध्ये कायदा सर्वांना समान असल्याने जात, धर्म, वंश, भाषा, लिंग किंवा जन्मस्थान यावरून लोकशाहीत भेदभाव केला जात नाही.

३) आपल्या राष्ट्रातील लोकांप्रमाणे इतर राष्ट्रातील नागरिकांबाबत बंधुभावाची भावना जोपासणे आवश्यक आहे. मानवता हे सर्वोच्च मूल्य मानून इतरांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करणे व आपला प्रत्यक्ष विकास साधताना इतरांच्या विकासाला अडसर न बनणे आवश्यक आहे.

४) लोकशाहीमध्ये कायद्यापेक्षा कोणीही श्रेष्ठ असू शकत नाही. कोणीही व्यक्ती कितीही श्रेष्ठ असली तरी तिला कायद्यात सवलत मिळत नाही. समान परिस्थितीत कायदा सर्वांना समान असेल. म्हणून लोकशाहीत कायद्याचे राज्य (Rule of the Law) हे अत्यंत महत्त्वाचे तत्त्व आहे.

५) लोकशाहीत जनतेच्या हाती सर्व सत्ता असते. लोकशाहीत पक्षप्रणालीआधारे निवडणूका लढविल्या जातात. या निवडणुकीत जो राजकीय पक्ष येतो, त्याने बहुमत प्राप्त केलेले असते. बहुमत प्राप्त न करणारा विरोधी पक्ष म्हणून सत्ताधारी पक्षावर अंकुश ठेवण्याचे कार्य करतो. त्यामुळे लोकशाहीत जनतेचे सार्वभौमत्त्व महत्त्वाचे असते.

६) जनतेचे प्रश्न प्रभावीपणे सोडविण्यासाठी लोकशाहीत विकेंद्रीकरण तत्त्व आवश्यक ठरते. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे अधिकाधिक लोकांना राज्यकारभारात सहभागी होता येते.

७) लोकशाहीत जनतेने निवडून दिलेले शासन राज्यकारभार करताना जनतेला जबाबदार असते. भारतात संसदीय लोकशाही मंत्रिमंडळ संसदेला जबाबदार असते.

८) लोकशाहीत शासन कायद्यानुसार चालते. सनदशीर व शांततेचा मार्ग हे लोकशाहीचे अंगभूत वैशिष्ट्य असते.

## ४.२.२ डॉ.बी.आर.आंबेडकर यांचा लोकशाहीविषयक दृष्टिकोन

डॉ. आंबेडकर यांचा लोकशाहीवर नितांत विश्वास होता. लाकशाही हा सामाजिक परिवर्तनाचा विचार आहे. राजकीय लोकशाहीला लोकशाही टिकू शकते, म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लोकशाही व्यवस्थेची आवश्यकता प्रतिपादित केली. डॉ. आंबेडकर म्हणतात, 'लोकशाहीच्या केवळ दिखाऊ साच्याला काहीच महत्त्व नसून सामाजिक लोकशाहीविना लोकशाहीची कल्पना करणे हास्यास्पद आहे. लोकशाही हा केवळ शासनाचा प्रकार नसून ती समाज जीवनाची एक पद्धती आहे. ही गोष्ट राजकारणवाद्यांना कधीच उमगली नाही.

डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही विचारात घटनावाद, घटनात्मक साधने व मार्ग यांचा अवलंब यांना अतिशय महत्त्व आहे. डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचाराचा लोकशाही हा मूलस्रोत आहे. लोकशाही समाजरचनेची साध्ये व मूल्ये लोकशाही शासनाच्या साधनातूनच कार्यान्वित व पूर्ण होतात. म्हणून लोकशाही हा शासनाचा असा एक प्रकार व पध्दती आहे की, ज्या माध्यमातून लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात हिंसेशिवाय क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणता येते. डॉ. आंबेडकर लोकशाहीची अशी व्याख्या करतात की, ''लोकानी, जर ती चालविणाऱ्या लोकांना, लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी सहाय्यभूत होत असेल आणि लोक हा बदल रक्तपाताचा आश्रय न घेता स्वीकारण्यास तयार असतील तर त्या ठिकाणी लोकशाही आहे,'' असे मी मानतो. लोकशाही ही खरी कसोटी आहे.

## ४.२.२.१ उदारमतवादी लोकशाही

डॉ. आंबेडकर यांचे विद्यीपीठीय शिक्षण व वास्तव्य अमेरिका व इंग्लंडमध्ये झाल्यामुळे उदारमतवादी बौध्दिक परंपरेचा संस्कार त्यांच्या व्यक्तित्वावर व विचारांवर झालेला दिसून येतो. डॉ. आंबेडकरांच्या समग्र लेखन आणि भाषणात उदारमतवादी पायाभूत तत्वांचा व मूल्यांचा आवर्जून उल्लेख झालेला दिसतो. उदारमतवादी स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये त्यांनी सर्वंकष समाज क्रांतीची व नवसमाज निर्मितीची मूलप्रेरणा मानली.

बर्क, जे.एस.मिल, जेफरसन, बुकर टी. वॉशिंग्टन, बुध्द, कबीर आणि म.फुले अशांच्या आणि फ्रेंच अमेरिकन राज्यक्रांतीच्या वैचारिक प्रेरणांनी त्यांचा जीवनविषयक उदारमतवादी दृष्टिकोन दृढ होत गेला. जीवनविषयक आदर्श तत्त्वप्रणाली म्हणूनही डॉ. आंबेडकरानी उदारमतवादाचा स्वीकार व समर्थन केले.

### १. उदारमतवादी लोकशाही व्यवस्थांचा उदय :–

१४व्या शतकाच्या उत्तरार्धात व १५व्या शतकात पश्चिम युरोपमध्ये बौध्दिक क्रांती झाली. ही क्रांती रोमन साम्राज्यातून फुटून बाहेर पडलेल्या काही राज्यात आली. त्यातूनच तेथे विवेकवाद, मानवतावाद, व्यक्ति स्वातंत्र्य या संकल्पनांचा उदय झाला. मध्ययुगीन कालखंडात राजा व चर्च यामध्ये संघर्ष झाला होता. रोमन राज्य हे सांस्कृतिक, बौध्दिक, सामाजिकदृष्ट्या विकसित आले होते. त्यातूनच १५व्या शतकात वैचारिक क्रांतीला सुरुवात झाली. राजा व धर्म यांचे महत्त्व कमी झाले. व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान दिले गेले. यातून १६व्या शतकामध्ये उदारमतवादी व्यवस्थांचा उदय झाला.

उदारमतवादाचा उदय व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या दडपशाही शक्तींना विरोध करणाऱ्या

प्रवृत्तीतून झाला. १६व्या व १७व्या शतकात धर्मसंस्था सरंजामशाही अवस्था आणि राज्यक्रांती एकाधिकारशाही या सर्वांमुळे व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच झाला होता. त्यामुळे प्रथम पूर्व युरोपमध्ये पूर्ण जीवनाच्या चळचळींना सुरुवात झाली. उदारमतवाद, विवेकवाद व मानवतावाद या तीन बौध्दिक विचारप्रणालीतून उदारमतवादी व्यवस्थांचा उदय झाला. त्या चर्च व राजा यांच्या संघर्षातून निर्माण झाल्या. त्यावेळी युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीला सुरुवात झाली होती. चर्च व राजा यामध्ये राजा श्रेष्ठ ठरला. परंतु १२१५ मध्ये ब्रिटनमध्ये लोकांनी राजाविरुध्द उठाव केला व राज्य कारभारात लोकांचा सहभाग असावा असा आग्रह धरला. नंतरच्या काळात हर्बट स्पेन्सर, स्टुअर्ट मील या विचारवंतांनी व्यक्ती स्वातंत्र्याबद्दल लिखाण केले. यातूनच ब्रिटनमध्ये उदारमतवादाचा उदय झाला.

## २. उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेची वैशिष्ट्ये :-

१) उदारमतवादी लोकशाही व्यवस्था ह्या घटनात्मक आहेत. या व्यवस्था कोणत्याही एका व्यक्तीच्या मर्जीनुसार चालत नाही. तर संपूर्ण राजकीय व्यवस्था घटनेनुसार चालते.

२) प्रत्येक उदारमतवादी लोकशाही राज्याच्या घटनांमध्ये व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व देण्यात आले आहे. विविध हक्क व स्वातंत्र्य व्यक्तीला दिले व त्याला न्यायालयीन संरक्षण दिले गेले.

३) उदारमतवादी व्यवस्था ह्या प्रातिनिधीक लोकशाहीचा पुरस्कार करतात. कारण या व्यवस्था उदारमतवादी विचारप्रणालीवर आधारित आहेत.

४) उदारमतवादी लोकशाही व्यवस्था या सत्ता विभाजनाच्या तत्त्वावर आधारित आहेत. कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ, न्यायमंडळ ह्या तीन शाखा वेगवेगळ्या आहेत.

५) प्रत्येक उदारमतवादी व्यवस्थेत न्यायालयाला नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करणे व राज्यघटनेचे संरक्षण करणे या दोन जबाबदाऱ्या सोपविल्या जातात. संपूर्ण राज्यकारभार, व्यवहार घटनेनुसार चालतो की नाही हे पाहणे. घटनेशी विसंगत कायदे रद्द ठरविणे ही न्यायालयीन सक्रीयता, पुनर्विलोकनाची प्रक्रिया ही उदारमतवादी व्यवस्थेमध्ये आढळते.

६) अनेक सत्तावादाचा पुरस्कार या व्यवस्थेमध्ये केला जातो.

७) उदारमतवादी व्यवस्था मुख्य/स्वतंत्र प्रचार माध्यमांवर आधारित नसते.

## ३. पाश्चिमात्त्य उदारमतवादी लोकशाही :-

औद्योगिक क्रांती झाल्यानंतर पश्चिमेकडील राष्ट्रात नवा आधुनिक औद्योगिक-भांडवली समाज निर्माण झाला. त्याचा सैध्दांतिक पाया हा उदारमतवादी सिध्दांत असा हाता व पुढे तो विकसित होत

गेला. पाश्चिमात्त्य उदारमतवादी लोकशाही विचारसरणीची उभारणी ही नैसर्गिक व निरपवाद व्यक्ती हक्क, राज्य संस्थेचा कमीत कमी हस्तक्षेप व किमान शासन, बाजाराधिष्ठित मुक्त अर्थव्यवस्था आणि बहुसंख्यांकाच्या पाठिंब्यावर कार्यरत असणारी प्रातिनिधीक अप्रत्यक्ष लोकशाही राज्यपध्दती अशा गृहीतकांवर झालेली होती. या विचारसरणीतील विचार डॉ. आंबेडकरांना जसेच्या तसे मान्य नव्हते.

## ४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उदारमतवादी लोकशाहीविषयक विचार :-

डॉ. आंबेडकर हे पूर्णत: उदारमतवादी नसले तरी त्यांच्यावर पाश्चिमात्त्य उदारमतवादाचा वैचारिक प्रभाव होता. भारतीय समाजाच्या संदर्भात त्यांनी उदारमतवादी लोकशाहीच्या विचाराला व्यापक परिवर्तनशिलतेचे व समाजाभिमुखतेचे प्रवाही परिमाण दिले.

संसदीय लोकशाही, घटनात्मक मार्ग व नीतिमत्ता, स्वंतत्र न्यायव्यवस्था आदी विचार व संख्यात्मक संकल्पनांचा त्यांनी पुढाकार केला. परंतु उदारमतवादाचे आर्थिक विचार त्यांना मान्य नव्हते. म्हणून त्यांनी राज्यसमाजवादाचा पुरस्कार केला. समाजवादातील आर्थिक समतेची व न्यायाची प्रेरणा आणि नियोजनाची आवश्यकता त्यांनी स्वीकारली होती. तरीपण राजकीय लोकशाहीच्या माध्यमातून ही प्रेरणा कार्यशील केली पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

पाश्चिमात्त्य उदारमतवाद समाज आणि राज्य या दोन्ही संस्था व व्यवस्था एकमेकांपासून अलग, स्वतंत्र व स्वायत्त आहेत. पण डॉ. आंबेडकरांचा समाजवादी विचार 'समाज' ही समग्र व्यवस्था आहे आणि राज्य व्यवस्था ही तिचा एक विशेष स्वरूपाचा भाग आहे असे मानतो. राज्य हे व्यापक समाजाचे एक अविभाज्य अंग आहे. समाजव्यवस्थाने राजकीय क्रांती गतिमान व आशयपूर्ण होते. असा विचार त्यांनी मांडला. सामाजिक क्रांतीशिवाय राज्यक्रांती अर्थहीन आहे असे त्यांचे मत होते.

आंबेडकराच्या मते, ''भारतीय समाजात जातिव्यवस्थेचे निर्मूलनासारख्या पायाभूत सामाजिक सुधारणांना अग्रक्रम दिल्याखेरीज राजकीय वा आर्थिक सुधारणा प्रभावी व अर्थपूर्ण ठरणार नाहीत.''

पाश्चिमात्त्य उदारमतवादाने मुक्त व्यक्ती-स्वातंत्र्याचे खूपच समर्थन केले; परंतु डॉ. आंबेडकरांच्या मते, मुक्तव्यक्तीवाद हा एक मोठा आभास आहे. ते अंतिमत: उदारमतवादाच्या राजकीय प्रणालीचे पुरस्कर्ते राहिले. डॉ. आंबेडकरांनी भारतातील सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात उदारमतवादी विचाराला त्याच्या सामर्थ्याचे व मर्यादांचे भान ठेवून नवा आशय व दिशा दिली, त्यांच्या राजकीय विचारांची मध्यवर्ती प्रेरणा उदारमतवादाचीच होती. स्वातंत्र्य-समता-बंधुता या उदारमतवादाच्या पायाभूत मूल्यविचारांचा विकास डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारातच नव्हे, तर एकूण विचार विश्वासातच दिसून येतो. व्यक्तीचे हक्क वा स्वातंत्र्य, हे व्यक्तिविकासाचे व व्यक्तिप्रतिभेचे महत्त्वाचे साधन आहे. हे त्यांना पूर्णत: मान्य होते. परंतु या हक्कांना व स्वातंत्र्याला घटनात्मक संरक्षण देण्यानेच व्यक्तिला विकासाचा व प्रतिष्ठेचा अनुभव येईल असे नाही. व्यक्ती ज्या सामाजिक वातावरणात व व्यवस्थेच्या चौकटीतच राहते.

त्यातील सामाजिक शक्तीकडून, संस्थांकडून, अन्याय, शोषण वा दडपणूक होऊ शकते आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्य, हक्क, विकास व प्रतिष्ठा यांना बाधा येऊ शकते. स्वातंत्र्य, समता, बंधुता या दिशेने होणारे सामाजिक परिवर्तन हेच व्यक्ती-स्वातंत्र्य, विकास व प्रतिष्ठा यांना संरक्षण देते. परिवर्तनाच्या या सामाजिक प्रेरणांना डॉ. आंबेडकरांनी आपल्या विचारात प्राधान्य दिले. यामुळेच हे परिवर्तन पुरोगामी, विवेकनिष्ठ व सुव्यवस्थित प्राधान्य दिले. यामुळेच हे परिवर्तन पुरोगामी, विवेकनिष्ठ व सुव्यवस्थितरित्या उत्क्रांत होत असते. डॉ. आंबेडकरांची उदारमतवादाची अशी धारणा होती. एकूण समाजाच्या आमूलाग्र, परिवर्तन प्रक्रियेच्या संदर्भात त्यांना उदारमतवादाच्या मूल्यप्रेरणांनी विचारप्रेरित व कार्य प्रेरित केले हे निश्चित.

डॉ. आंबेडकरांच्या उदारमतवादी विचारांची चिकित्सा करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, त्यांना उदारमतवादातील अनिर्बंध व्यक्तीवाद मान्य नाही. उदारमतवादातील राजकीय विचार व समाजवादातील आर्थिक समतेचा, सामाजिक न्यायाचा विचार यांचा समन्वय घडवून आणला पाहिजे. लोकशाहीच्या मार्गाने समाजवाद प्रत्यक्षात आणता येईल, ही लोकशाही समाजवादाची संकल्पना त्यंना मान्य होती.

## ४.२.२.२ सामाजिक लोकशाही

भारतीय समाजव्यवस्था अनेक जाती, रुढी, परंपरा, भेद, धर्म, वंश यांनी निर्माण झालेली आहे. भारतीय समाज एकनिष्ठ असा समाज नव्हता. अशा विविधतेत समाज, धर्म, परंपरा यांना एकत्रित आणण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी राजकीय शासन प्रणालीमध्ये लोकशाहीचे हित जोपासणाच्या अनुषंगाने लोकशाहीमूल्यांची प्रस्थापना प्रतिपादित केली.

सामाजिक लोकशाहीमध्ये एकमेकांविषयी सहानुभूती निर्माण होऊन यातून सामाजिक लोकशाही संबंध प्रस्थापित होत असतात. संपूर्ण समाजरचनेचे, जातीचे, लोकशाहीकरण होईल. सामाजिक लोकशाहीचा भाग म्हणून डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाची भूमिका मांडली. सामाजिक लोकशाही शिवाय संसदीय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. तथापि, सामाजिक लोकशाही केवळ राज्याचे किंवा राज्यातर्फे निर्माण होऊ शकत नाही. केवळ घटनेमध्ये काही तरतूदी केल्याने निर्माण होऊ शकत नाही. डॉ. आंबेडकरांच्या मते, सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रांत समाज आहे. समाजातील लोकशाही समूहाने आपापसात आदराची भावना निर्माण करून, सहानुभूती निर्माण करून सामाजिक लोकशाही निर्माण करावयाची आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, सामाजिक लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर सामाजिक न्यायाची जोड असणे आवश्यक आहे. सामाजिक न्यायाशिवाय सामाजिक लोकशाही परिपूर्ण होऊ शकत नाही.

डॉ. आंबेडकर यांनी संविधान सभेत केलेल्या भाषणात म्हटल्याप्रमाणे, आपण आपल्या राजकीय

लोकशाहीला सामाजिक लोकशाहीचे रूपही दिले पाहिजे. राजकीय लोकशाही तिला आधारभूत अशी सामाजिक लोकशाही नसल्यास टिकू शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तिचा अर्थ आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता यांनी जीवनाचे सिध्दांत म्हणून मान्य करणारी जीवनप्रणाली, स्वातंत्र्यता, समता व बंधुभाव सिध्दांत म्हणजे एकाच त्रयीची भिन्न-भिन्नतत्त्वे मानता येणार नाहीत. या अर्थात ती अशा तऱ्हेने संघटित झालेली आहेत की, त्यापैकी कोणत्याही एकास दुसऱ्यापासून वेगळे केल्यास लोकशाहीचा विशिष्ट हेतूच पराभूत होतो. स्वातंत्र्य हे समतेपासून वेगळे करता येणार नाही. समता स्वातंत्र्यापासून वेगळी करता येत नाही. स्वातंत्र्य आणि समता यांचा बंधूभावापासून विच्छेद संभवत नाही. समतेशिवाय स्वातंत्र्य हे मूठभरांच्या वर्चस्वास जन्म देईल. स्वातंत्र्याशिवाय समता ही व्यक्तीगत उपक्रमशिलतेस मारक ठरेल. बंधुभावावाचून स्वातंत्र्य आणि समतेचा उगमच संभवत नाही. त्यांच्या अंमलबजावणीसाठी मला पोलिस द्या. भारतीय समाजात दोन गोष्टींचा सर्वस्वी अभाव आहे हे सत्य मान्य करूनच आपण सुरुवात केली पाहिजे. एक म्हणजे समता, सामाजिक दृष्टीने भारतातील आपला समाज हा श्रेणीयुक्त विषमतेच्या सिध्दांतावर आधारलेला आहे. एखाद्या उतरंडीसारखा आहे तर बहुसंख्यांक घोर दारिद्र्यात राहतात. २६ जानेवारी १९५० रोजी आपण एका विसंगतीच्या जीवनात प्रवेश करीत आहोत. राजकारणात आपल्याजवळ समता असेल तर आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमत: राजकारण आपण एकमनुष्य, एकमत आणि एकमत, एक किंमत या सिध्दांतास मान्यता देत राहू. पण आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात आपल्या सामाजिक, आर्थिक रचनेमुळे, एक माणूस, एक मूल्य या तत्वास आपण नाकारत राहे. आपल्या सामाजिक, आर्थिक जीवनात आपण समता कोठवर नाकारत राहणार? दीर्घकाळ आपण ती नाकारत राहिलो तर आपल्या राजकीय लोकशाहीचे नष्टचर्य ओढवेल. शक्य होईल त्या क्षणी, आपण ही विसंगती दूर केली पाहिजे. अन्यथा, ह्या प्रतिनिधी सभेने अत्यंत मेहनतीने घडविलेला राजकीय लोकशाहीचा इमला, विषमतेने ग्रस्त आणि त्रस्त असलेले लोक उध्दवस्त करून टाकतील.

लोकशाहीचे अस्तित्व टिकविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी पुढील तीन मार्ग सांगितलेले आहेत.

१) लोकशाहीचे अस्तित्व आपणाला टिकवायचे असेल तर, आपले सामाजिक आणि आर्थिक उद्देश साध्य करण्यासाठी आपण फक्त सनदशीर मार्गाचाच अवलंब केला पाहिजे, याचा अर्थ असा की, सविनय कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह हे मार्ग आपण वर्ज्य केले पाहिजेत. सामाजिक व आर्थिक उद्देश साध्य करून घेण्यासाठी जेव्हा सनदशीर मार्गाचा अवलंब करणे, यथायोग्य वाटत होते, परंतु सनदशीर मार्गांनी आपले उद्देश साध्य करणे शक्य असताना असनदशीर मार्गाचा जर कोणी अवलंब केला तर ते त्याचे कृत्य यथार्थ वाटणार नाही. हे असनदशीर मार्ग म्हणजे बेबंदशाहीची उगमस्थाने आहेत. हे मार्ग आपण जेवढ्या लवकर वर्ज्य करू तेवढे आपणाला अधिक हितावह होणार आहे.

२) हिंदुस्थानच्या राजकारणात भक्ती किंवा व्यक्तीपूजा ही भावना जितकी थैमाने घालते. तितकी ती जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणात घालीत नसते. एखाद्याने धार्मिक बाबतीत भक्ती दाखविली तर ती त्याची जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमची मुक्तता करू शकेल. परंतु एखाद्याने राजकारणात भक्ती दाखविली तर ती त्या राजकीय विचारप्रणालीला अधोगतीस नेईल व त्या राजकीय पंथात सर्वाधिकारपणाची सत्ता प्रस्थापित करील.

३) आपण राजकीय लोकशाही प्रस्थापित करून स्वस्थ बसता कामा नये. तर आपण राजकीय लोकशाहीतून सामाजिक लोकशाही निर्माण करण्यासाठी झटले पाहिजे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार असेल तरच राजकीय लोकशाहीचे अस्तित्व चिरंजीवी होऊ शकेल; एरव्ही नाही.

२५ नोव्हेंबर १९४९, घटना समितीसमोर भाषण देताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, 'मानवी अधिकार कायद्याने नव्हे तर समाजाच्या सामाजिक आणि नैतिक अधिष्ठानामुळे संरक्षित होतात. समाजातील लोकशाही ही राजकीय लोकशाहीचा पाया असायला हवा. सामाजिक लोकशाही म्हणजे जातीजातींत-धर्माधर्मातही समता, पण मोठ्या जाती राजकीय शक्तीशाली बनल्या, तर मूठभर पण श्रीमंत व धर्माचे ठेकेदार मानलेल्या जातीही शक्तीशाली बनत गेल्या. हे सामाजिक लोकशाहीचे लक्षण नव्हे.'

डॉ. आंबेडकरांच्या मते, 'संसदीय लोकशाहीच व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशिलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करू शकते. सहकार्य, शिस्त, सचोटी, उद्यम, धारिष्ट्य, समर्पितभाव इ. गुणांचा परिपोष करून व्यक्तीच्या विकासाचा मार्ग खुला करते. भारतात संसदीय लोकशाहीला पर्याय नसून भारतातील परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे काहींसे अडथळे निर्माण होतील. परंतु दीर्घकालीन विकासासाठी हीच पध्दती अधिक उपयुक्त आहे. परंतु ही राजकीय संसदीय लोकशाही हळूहळू सामाजिक व आर्थिक लोकशाहीकडे वळविणे आवश्यक आहे' असे डॉ. आंबेडकरांना वाटते.

### ४.२.२.३ आर्थिक लोकशाही

जे लोक सरकार बनविणार आहे त्यांच्यापुढे भारतीय संविधान एक आदर्श ठेवू इच्छिते. हा आदर्श आर्थिक लोकशाही हाच आहे. संविधान निर्मितीच्या सभेपुढे भाषण करताना डॉ. आंबेडकर म्हणतात.

राजकीय लोकशाही प्रत्यक्षात उतरविण्यासाठी तिला आर्थिक लोकशाहीची जोड असलीच पाहिजे. यासाठी डॉ. आंबेडकर आग्रही होते, यासाठी त्यांनी आर्थिक क्षेत्रात शासन संस्थेच्या हस्तक्षेपाचे समर्थन केले. शासनसंस्थेच्या हस्तक्षेपावाचून स्वातंत्र्य हे खाजगी मालकांच्या हुकूमशाहीचे दुसरे नाव होय.

आर्थिक लोकशाहीचे स्वप्न साकार करण्यासाठी आर्थिक क्षेत्रात आणि विशेषत: उद्योग व शेती क्षेत्रात शासन संस्थेच्या हस्तक्षेपाचा त्यांनी पुरस्कार केला.

केवळ राजकीय वा संसदीय लोकशाहीच्या स्वीकाराने लोकशाही समाज अस्तित्त्वात येत नाही. उलट त्यामुळे समाजातील अंतर्विरोध वाढत जातील, याची डॉ. आंबेकरांना पक्की जाणीव होती. हे अंतर्विरोध नाहीसे करण्यासाठी त्यांनी सामाजिक-आर्थिक लोकशाहीचा पुरस्कार केला. समाजात व्यक्तीला वा समूहाला आर्थिक सामर्थ्य व समता नसेल तर त्यांच्या स्वतंत्र व्यक्तीमत्त्वाला व अस्तित्वाला अर्थ राहत नाही. ते शोषणाचे, अन्यायांचे व गुलामीचे बळी ठरतात. म्हणून समाजाने सर्वांना किमान आर्थिक सामर्थ्याची हमी दिली पाहिजे, तरच स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यत्रयींवर लोकशाही समाजाची निर्मिती होऊ शकेल.

डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लोकशाहीवादी नियोजनाची आवश्यकता असते आणि नियोजनातूनच आर्थिक विकास साधला जाऊ शकतो असे प्रतिपादन केले.

डॉ. आंबेडकर मूलत: उदारमतवादी होते, तरी भारतीय समाजात जन्मापासूनच ते आणि अस्पृश्य समाज दैण्याचे, दारिद्र्याचे जे शोषित जीवन जगले, त्या दारुण अनुभूतीने ते पाश्चिमात्त्य देशातील समाजवादी विचारांकडे वळले. मार्क्स-लेनिनप्रणित समाजवादी क्रांतीचे संपूर्ण तत्त्वज्ञान डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. तरीपण त्यांनी समाजवादी आर्थिक कार्यक्रमाचा स्वीकार केला. राज्य समाजवादाची संकल्पना संसदीय लोकशाहीच्या मार्गाने प्रत्यक्षात आणता येईल व त्यायोगे समाजात आर्थिक सामर्थ्याचा, समतेचा व न्यायाचा अनुभव घेता येईल, अशी त्यांची धारणा होती. सर्व प्रकारच्या शोषणातून व्यक्ती वा समूह यांची मुक्तता लोकशाही समाजवादाने करता येईल असे त्यांना वाटत होते. संसदीय लोकशाही राज्य पध्दतीतून व मिश्र अर्थव्यवस्थेतून समाजधारणेच्या विविध मूल्यात विकास श्रम समन्वय घालता येईल व समाज रचनेत अपेक्षित बदल घडवता येईल असे त्यांचे मत होते.

सरंजामी व भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या परिवर्तनाचा मार्ग म्हणून डॉ. आंबेडकरांनी राज्य-समाजवादाचा पुरस्कार केला. हा आर्थिक कार्यक्रम संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून प्रत्यक्षात आणता येईल असे त्यांचे मत होते. बदलत्या संसदेकडून बाधा येऊ नये. या समाजवादी आर्थिक कार्यक्रमाला घटनात्मक पाया देऊन, सातत्य व शाश्वती देणे गरजेचे आहे. नाही तर यासाठी हुकूमशाहीखेरीज दुसरा पर्याय नाही. हुकूमशाही सातत्य देऊ शकेल. पण स्वातंत्र्य व लोकशाही हक्क हिरावले जातील. तेव्हा या आर्थिक कार्यक्रमाला घटनात्मक हमी देऊन राज्यघटनेतच त्याचा अंतर्भाव करणे आवश्यक आहे. राज्यघटनेने राज्यपध्दतीच्या स्वरूपाबरोबरच आर्थिक संघटनेचेही स्वरूप स्पष्ट केले पाहिजे, तसे झाले नाही तर अर्थपध्दतीतून निर्माण होणाऱ्या विरोधीशक्ती राजकीय स्वरूपातही विघटीत करतील. आर्थिक संघटनेचे स्वरूप राज्यघटनेत शब्दांकित करणे या विचाराची भर डॉ. आंबेडकरांनी घटनात्मक लोकशाहीप्रणालीत टाकली हे यावरून स्पष्ट होते.

स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय राज्यघटनेत डॉ. आंबेडकरांचा राज्य समाजवादी आर्थिक कार्यक्रम प्रस्थापित हितसंबंधी शक्तींच्या विरोधामुळे जरी समाविष्ट झाला नाही; तरी दुर्बल, दलित व शोषित जनतेच्या राजकीय व आर्थिक उन्नतीसाठी मूलभूत हक्क व त्यांना पूरक असणारी राज्यधारणेची मार्गदर्शक तत्त्वे; तसेच अनुसूचित जाती, जमाती व अन्य मागास वर्ग यांना विशेष संधी व सवलती या तरतुदींमधून अंगभूत आर्थिक लोकशाहीच्या उद्दिष्टांचे प्रतिबिंब पडले आहे. हा डॉ. आंबेडकरांच्या विचारांचाच प्रभाव आहे.

## ४.२.२.४ लोकशाहीच्या यशस्वीतेतील अटी

१) डॉ. आंबेडकरांनी 'State and Minorites' या आपल्या ग्रंथात त्यांनी राजकीय लोकशाही ही मुख्यत: चार मूलभूत प्रमेयावर आधारित असल्याचे म्हटले आहे.

(अ) व्यक्ती हे एक स्वयंभू मूल्य आहे.

(ब) व्यक्तीला काही मूलभूत व हिरावून घेता येणार नाहीत असे अधिकार असतात आणि अशा अधिकारांची व्यक्तीला हमी राज्यघटनेने दिली पाहिजे.

(क) कोणत्याही प्रकारचा फायदा व लाभ यासाठी व्यक्तीला आपला घटनात्मक अधिकार गमवावा लागता कामा नये.

(ड) दुसऱ्यावर हुकूमत गाजवता येईल अशा प्रकारची कोणतीही शासन संस्थेची सत्ता व अधिकार खाजगी व्यक्तीला असता कामा नये.

२) २८ ऑक्टोंबर, १९५१ रोजी पंजाबमधील डी. व्ही. महाविद्यालय, जालंदर येथे विद्यार्थी संसदेसमोर डॉ. आंबेडकरांचे 'संसदीय लोकशाही' या विषयावर व्याख्यान झाले. त्याप्रसंगी ते म्हणाले, 'आजच्या घडीला संसदीय सरकार व्यवस्थेत तीन मुख्य गोष्टी अंतर्भूत आहेत.

(अ) पहिली अनुवंशिकतेचा नियम नाकारणे कोणीही व्यक्ती परंपरेने राज्यकर्ता म्हणून दावा करणार नाही. सत्तेवर येणाऱ्यास लोकांनी निवडून दिले पाहिजे.

(ब) दुसरी लोकांच्या सार्वजनिक जीवनाला लागू होणारा कोणताही उपाय लोकांनी निवडलेल्या लोकांच्या सल्ल्यावरच आधारित असला पाहिजे. कोणीही एक व्यक्ती अधिकार ग्राह्य धरून स्वत:ला सर्व काही माहित आहे, आपण कायदे करून सरकार चालवू शकतो असा दावा करू शकत नाही.

(क) तिसरी गोष्ट, सत्ता प्रमुखाला सल्ला देण्याची इच्छा असलेल्या लोकांनी निर्धारित काळात स्वत:वरील लोकांचा विश्वास नव्याने संपादन केला पाहिजे. संसदीय सरकार

व्यवस्था म्हणजे चर्चेद्वारे सरकार पाहून कितीतरी अधिक आहे. तिथे दोन आधारस्तंभ आहेत. एक विरोधी पक्ष आणि दोन मुक्त आणि नि:पक्ष निवडणूका.'

३) लोकशाही यशस्वीरितीने चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पुढील गोष्टी डॉ. आंबेडकर यांनी सांगितल्या आहेत.

**(अ) समाजात अचानक विषमता असता कामा नये :** लोकशाहीच्या यशस्वी कामकाजाची पहिली शर्त म्हणजे समाजात विषमता असता काम नये, पिळलेला वर्ग असता कामा नये. हडपलेल्या वर्ग असता कामा नये. या विभाजनात रक्तरंजीत क्रांतीची शक्यता असते. हा लोकशाहीतील प्रमुख अडथळा आहे.

**(ब) विरोधी पक्षाचे अस्तित्त्व :** विरोधी पक्षाचे अस्तित्व सरकार कुठे चुकते आहे हे दाखविण्यासाठी विरोधी पक्ष असला पाहिजे.

**(क) प्रशासनात समानतेची वागणूक :** कायदा आणि प्रशासनाच्या संदर्भात सर्वांना सारखी समानता, प्रशासनात समानतेची वागणूक ही बाब फार महत्त्वाची आहे.

**(ड)** संवैधानिक नैसर्गिक तत्वांचे प्रत्येकाने घटनात्मक नीतीदृष्ट्या पालन केले पाहिजे.

**(इ)** लोकशाहीच्या नावावर बहुमतवाटपाची अल्पमत वाटल्यानंतर मूलभूत करता कामा नये.

**(फ) लोकनिष्ठा :** लोकशाहीला लोकनिष्ठेची फार आवश्यकता आहे. लोकनिष्ठा म्हणजे सर्व प्रकारच्या विरोधात आंदोलनासाठी उभी राहणारी कर्तव्यनिष्ठा होय. याचा अर्थ की, प्रत्येकाने मग तो त्या विशिष्ट अन्यायाखाली भरडल्या नाही जाणाऱ्या माणसाच्या मुक्तीसाठी मदत करण्याची तयारी केली पाहिजे.

## ४.२.३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विकासविषयक दृष्टिकोन

### ४.२.३.१ प्रस्तावना

विकास हा राष्ट्रीय विकासाचा महत्त्वाचा भाग आहे. तो हा लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनामध्ये झालेल्या धोरणात्मक बदलावर अवलंबून असतो. कोणत्याही देशाचा विकास हा सर्वांगीण मूल्यात्मक पध्दतीच्या धोरणावर अधिष्ठित असतो. त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक मूल्यांचा विशेष प्रभाव पडत असतो. याचाच राष्ट्रीय विकासाच्या अनुषंगाने आढावा घेतल्यास भारतीय संविधानात्मक समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय हाच विकासाचा पाया ठरू शकतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, औद्योगिक धोरणे भारताला आजच्या संदर्भात विकासाकडे घेवून जाणारी आहेत. डॉ. आंबेडकर यांनी भारताच्या विकासाची धोरणे मांडली आहेत. असे नव्हे तर जगाला मार्गदर्शन ठरतील अशा रितीने मांडलेली आहेत. त्यांनी लिहिलेले ग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे आणि त्यांनी दिलेली विविध ठिकाणची भाषणे, लेख आणि 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' आणि 'प्रबुद्ध भारत'मध्ये लिहिलेले अग्रलेख, स्फूटलेख यातून नवीन समाज रचना निर्माण करण्याचे आदर्श देशासमोर मांडलेले आहेत. त्यांनी भारताच्या विकासाचे संदर्भात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, औद्योगिक, शैक्षणिक, संवैधानिक व आर्थिक या अनुषंगाने केलेले स्पष्टपणे दिसून येते. डॉ. आंबेडकरांनी एकांगी भूमिका न मांडता सार्वजनिक क्षेत्राला सर्वांगीण स्पर्श करून संकल्पना मांडलेल्या आहेत.

डॉ. आंबेडकर हे तत्वज्ञ, अर्थशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञ असल्याने त्यांचे ध्येय विकासाच्या उन्नतीचे आणि मानवी जीवनाच्या समृध्दीचे होते, त्यांनी मानवी आणि सामाजिक मूल्ये अशा उच्च मूल्यांचा नेहमी आदर केला आहे. डॉ. आंबेडकरांची धोरणे ही विकासाच्या पूरक अशीच होती. मानवाचा विकास जोपर्यंत होत नाही तोपर्यंत शाश्वत विकास होत नाही यावर त्यांचा आत्मविश्वास होता. माणसांमाणसामधील सर्वांगीण भेदच शाश्वत विकासातील मुख्य अडथळा आहेत, जोपर्यंत माणूस मागासलेपण सोडून समृध्द जीवनाकडे येत नाही तोपर्यंत सामाजिक विकास होणार नाही. म्हणून सामाजिक विकासाशिवाय शाश्वत विकास नाही, हे डॉ. आंबेडकरांनी जाणले होते, म्हणून त्यांनी मानवी कृतीला सामाजिक उद्दिष्टांना प्रोत्साहन देवून व्यक्ती आणि त्यांच्यातील स्वला विचारपण देवून ज्ञानी बनविले, त्यातूनच मानवाचा दृष्टिकोन शाश्वत विकासाकडे वळविला.

## ४.२.३.२ (अ) सामाजिक विकास :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार माणसांच्या सर्वांगीण विकासाचा जाहिरनामा होता. मानवांच्या मूलभूत विकासाचा कालखंड पाहताना इ.स. पूर्व ३५०० वर्षांपासून सुरू झालेल्या जगातील प्राचीन सुधारणांचा किंवा संस्कृतीचा आढावा घेतल्यानंतर असे दिसून येते की, या सर्वांमधून निसर्गावर मात करत मानवाने स्वत:च्या बुध्दीचा आढावा घेतल्यानंतर असे दिसून येते की, या सर्वांमधून निसर्गावर मात करत मानवाने स्वत:च्या बुध्दीचा व त्यातून तयार होणाऱ्या सामाजिक संबंधाच्या विकासाचा उर्ध्वगामी आराखडा तयार केल्याचे दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक विकासाचा विचार करताना हिंदू समाजव्यवस्था, वर्णवाद, व्यक्ती व समाज यातील परस्पर संबंध, धर्म व समाज यांची संस्थात्मक मान्यता व असंगती, हिंदू समाजरचनेचा आशय, अस्पृश्यांचा इतिहास, त्यांचा वर्तमानकाळ आणि भवितव्यता या संबंधीची बुध्दीवादी समीक्षा प्रत्ययाला येते. हिंदू समाजाच्या ऱ्हासाला जातीभेद हे महत्वाचे कारण आहे असे ते म्हणत.

## १. जातीसंस्थेचे निर्मूलन :-

भारतीय समाजव्यवस्था ही प्रामुख्याने विषमतेवर आधारित आहे. जाती आणि अर्थव्यवस्था ही पूर्णपणे असामान्यतेच्या तत्वावर उभी आहे. जाती आणि वर्ण व्यवस्थेतील श्रेष्ठ जाती आणि वर्णाचे विशेष अधिकार आणि कनिष्ठ जाती व वर्णाच्या लोकांना दिलेली विषम वागणूक लक्षात घेऊन डॉ. आंबेडकरांनी या व्यवस्थेला शह देण्यासाठी समानतेच्या तत्वांचा पुरस्कार केला आहे.

डॉ. आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठात शिकत असताना जातीसंस्थेचे अध्ययन करून ९ मे १९१६ रोजी Caste in India, It's mechanism, genesis and Development या विषयावरील शोध निबंध मानववंश शास्त्र परिषदेत सादर केला होता. तसेच १९३६ साली जातीसंस्थेचे निर्मूलन (Anninilation of caste) यासारखा ग्रंथ लिहिला. जातीप्रथा हा हिंदू समाजाचा सर्वात मोठा शत्रू आहे. त्यासाठी जातीप्रथेचे निर्मूलन केले पाहिजे. जातीप्रथेमुळे समाजाचा सामाजिक, भौतिक, नैतिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक दृष्टीने ऱ्हास झाला आहे, असे डॉ. आंबेडकरांचे स्पष्ट मत होते, त्यांच्या मते व्यक्तीजीवन, समाजजीवन व राष्ट्रजीवन या सर्वांवर जातीसंस्थेचा घातक परिणाम झाला आहे. म्हणून जातीभेदाच्या प्रथेला ते व्यक्तिगत तसेच सामाजिक समस्या म्हणतात.

डॉ. आंबेडकरांच्या मते, जातीप्रथेमुळे समाजाची कर्तव्यशक्ती नष्ट झाली. तिने समाजाच्या कार्यशक्तीला दुर्बल व पंगू केले. जातीप्रथा केवळ सर्वच दृष्टीने अयोग्य व अन्यायकारक प्रथा आहे असे नाही तर, त्याचबरोबर ती हिंदूसमाजव्यवस्थेसही घातक आहे. जात हे सर्व सुधारणा दडपण्याचे व नष्ट करण्याचे एक फार मोठे अस्त्र आहे. त्यामुळे हा उपाय जातीप्रथा नष्ट करण्याच्या दृष्टीने उपुयक्त व परिणामकारक ठरत नाही. ही प्रथा नष्ट करण्यासाठी मानसिक घडण बदलली पाहिजे आणि त्यासाठी आंतरजातीय विवाह हाच प्रभावी उपाय आहे.

डॉ. आंबेडकर म्हणतात, जातीभेद ही एक भावना आहे, ती मनाची एक अवस्था आहे. या भावनेचा नारा करणे म्हणजे भावनात्मक किंवा मानसिक गरज बदलणे होय. हा भावनिक बदल घडविण्यासाठी सर्वप्रथम धर्मशास्त्रावरील हिंदूची श्रध्दा नष्ट केली पाहिजे. जातीभेद पाळण्यास शिकविणारी हिंदूधर्मशास्त्रे त्यांची खरी शत्रू आहेत. रोटी बंदी, बेटी बंदी, स्पर्श बंदी या सर्व बंदीच्या बेड्या एका बेटी बंदीच्यामुळे उद्‌भवल्या आहेत. ती नष्ट केली की, बाकीच्या आपोआप नष्ट होतात. बेटी बंदी तोडणे हाच अस्पृश्यता निवारण्याचा खरा मार्ग आहे. म्हणून जर अस्पृश्यता नष्ट करावयाची असेल तर तिचे मूळ बेटी बंदीत आहे. हे आपण ओळखले पाहिजे असे डॉ. आंबेडकर स्पष्टपणे सांगतात. म्हणून समाजाने शाश्वत विकासाकडे जाण्यासाठी डॉ. आंबेडकर म्हणतात, समाजाने जाती अंताकडे वेद व शास्त्रे ह्यांचे अधिपत्य उद्‌ध्वस्त करायला पाहिजे.

## २. सामाजिक न्याय :-

डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाची कल्पना ही प्रामुख्याने समाजातील सर्व माणसे समान आहेत. त्यांच्यात धर्म, वंश, जात, रंग आणि संप्रदाय यावरून भेदभाव केला जाऊ नये अशी आहे. सामाजिक, शैक्षणिक दृष्टीने मागासलेल्या लोकांना अधिक संरक्षण, अधिक सुखसोयी आणि खास अधिकार दिल्याशिवाय सामाजिक न्याय मिळू शकत नाही. डॉ. आंबेडकर यांची सामाजिक न्यायाची कल्पना ही भारतीय समाजाच्या प्रत्येक सदस्याचे व्यापक हित साधने आणि मानव-मानव, समूह-समूह, समूदाय-समूदायातील सकारात्मक आणि रचनात्मक अशा संबंधावर आधारित आहे. सामाजिक न्यायाप्रमाणे आर्थिक आणि राजकीय न्याय डॉ. आंबेडकरांना अपेक्षित होता. आदर्श समाजाची निर्मिती करण्याकरिता सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाची तरतूद त्यांनी भारतीय राज्यघटनेत अंतर्भूत केली.

माणसांची प्रतिष्ठा त्याच्या जातीपेक्षा त्याच्या गुणाच्या आधारावर मांडली गेली, तरच निकोप समाजाची वाढ होईल असा डॉ. आंबेडकरांचा सिध्दांत आहे.

## ४.२.३.३ (ब) राजकीय विकास :-

मूकनायक मधील पहिल्या अंकातील अग्रलेखामध्ये डॉ. आंबेडकरांनी दलित आणि ब्राम्हणेतर समाजासंबंधी सामाजिक व राजकीय मते व्यक्त केली. ती आजच्या परिस्थितीत सत्याचा पाठपुरावा करणारी आणि वस्तुस्थितीचे चित्र समाजासमोर आणणारी वाटतात. डॉ. आंबेडकर म्हणतात, 'सत्ता व ज्ञान नसल्यामुळे ब्राम्हणेतर व मागासलेले यांची उन्नती खुंटली आहे हे निर्विवाद आहे.

जोपर्यंत येथील बहुसंख्य समाज अज्ञान, दारिद्र्य आणि गुलामगिरीच्या जोखडात अडकलेला आहे, तोवर या देशात स्वराज्य येणे शक्य नाही. त्यासाठी अस्पृश्यांना राजकीय सत्तेत ही सहभाग मिळावा अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती.

डॉ. आंबेडकरांच्या मते, 'स्वातंत्र्य हे दोन प्रकारचे असले पाहिजे म्हणजेच नागरी स्वातंत्र्य आणि दुसरे म्हणजे राजकीय स्वातंत्र्य. नागरी स्वातंत्र्य म्हणजे कायद्यातील तरतुदीखेरीज एखाद्यास अटक न करण्याचे स्वातंत्र्य, नागरी स्वातंत्र्यातील दुसरा भाग म्हणजे भाषण स्वातंत्र्य आणि भाषण स्वातंत्र्य आणि तिसरे म्हणजे कृती स्वातंत्र्य होय.' स्वातंत्र्य हे व्यक्ती आणि समाजाच्या विकासाकरिता आहे. त्याशिवाय मानवी समाज प्रगतीच्या दिशेने आगेकूच करणार नाही हे यावरून स्पष्ट होते.

स्वराज्याशिवाय व्यक्तीविकास खुंटला आहे. परकीय राज्यकारभारामुळे ऐतद्देशीयांचे नैतिक नुकसान झाले आहे. कर्तृत्ववान पुरुषास देखील खालचा दर्जा पत्करावा लागला आहे. अशा स्थितीत आत्मबलाचा प्रभाव अनुभवण्यास संधीच नाही. म्हणूनच डॉ. आंबेडकर म्हणतात, ज्या स्वराज्यवाद्यांना व्यक्तीविकासाची चाड आहे व ज्यासाठी ते बंदिवासही भोगत आले त्यांनी ६ कोटी बहिष्कृत लोकांस व्यक्तीविकासाचा मार्ग खुला करण्यास काय केले आहे असा उलटा प्रश्न विचारणे भाग पडते.

### ४.२.३.४ (क) आर्थिक विकास :-

डॉ. आंबेडकर म्हणतात, 'राष्ट्रातील संपत्तीचा उपयोग दरिद्री आणि गरीब जनतेस जखडून ठेवण्यासाठी होता कामा नये. ती देशावरील आपत्ती ठरेल. दुसरी ही बाब महत्त्वाची आहे ती अशी की, दरिद्री व गरीब जनतेचे शोषण करून संपत्ती वाढवण्याचा प्रयत्न झाल्यासच तो मार्ग 'आसुरी' ठरेल. खोती प्रदेशातील शेतकऱ्यांना माणुसकीचे आणि आर्थिकतेचे हक्क मिळवून देण्यासाठी ग्रामीण व्यवस्थेतील सुधारकांचा प्रश्न, भूसुधारणेचा किंवा केवळ अर्थार्जनाचा विषय नाही तर तो सामाजिक आहे म्हणून डॉ. आंबेडकरांनी कायदे कौन्सिलात खोतीविषयक बिल आणले.

शेतसारा कशावर बसवावा? हे सांगताना आंबेडकरांनी सुचविले की, सावकाराची चढती ऐपत असल्याकारणाने त्यांच्याकडून चढत्या प्रमाणात कर घ्यावा म्हणजे गरीब शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही. उत्पन्नाऐवजी ऐपत हा निकष लावल्यास प्रश्न अधिक सुलभ होईल अशी त्यांची धारणा आहे. त्यासाठी त्यांनी 'इन्कम टॅक्स'ची कल्पना अंमलात आणण्याची सूचना केली. 'माझ्या मते शेतसाऱ्याच्या पध्दतीचे अनेक परिणाम जर आपणास टाळावयाचे असतील तर आपणाला शेतीच्या उत्पन्नावर कर बसविणे हे लँड रेव्हिन्यू कोड कलम १०७ मध्ये गोवलेले तत्व झुगारून दिले पाहिजे? त्याऐवजी शेतसारा हा इन्कम टॅक्सच्या कायद्याखाली आणला पाहिजे.'' आर्थिक स्थिती सुधारण्याकरिता राजकीय हक्क हवेत आणि ते मिळविण्यासाठी सायास करावे लागतील अशी त्यांची दृढ धारणा होती.

### ४.२.३.५ (ड) शैक्षणिक विकास :-

डॉ. आंबेडकर यांनी शिक्षण हे सामाजिक जाणिवा निर्माण करण्याचे साधन मानले. तिचे महत्व पटवून देताना ते म्हणतात की, बहिष्कृत भारताच्या आप घरी बाटा, बापघरी बाटाच्या १५ जुलै, १९२७ च्या अंकातील स्फूट लेखात ते म्हणतात की, ''उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हतबल होऊन अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या अभावे तो निर्बुध्द राहिल्यास जिवंतपणे दुसऱ्याचा गुलाम बनतो.'' डॉ. आंबेडकर शिक्षणाकडे, ज्ञानाकडे व्यक्ती विकासाचे साधन म्हणून पाहतात. स्त्री-पुरुष समानतेचे आणि स्त्री-पुरुषांना एकत्र शिक्षण देणे हा विचार त्यांनी मांडला.

डॉ. आंबेडकर शिक्षण आणि राष्ट्रीय बांधणीच्या अनुषंगाने म्हणतात, 'भारतामध्ये बहुसंख्य जनता अज्ञान आणि भोळसर खुल्या कल्पनेत गुरफटून गेली आहे, तेव्हा येथील समाज रचना खुल्या कल्पनांना जन्म देते. म्हणून उपास-तापास, नवस-सायास, देव-देवर्षी करणे म्हणजे धर्म पालन करणे अशी लोकांची भावना झालेली आहे. या खुळ्या आणि धर्मभोळ्या जनतेची या कल्पनेतून सुटका करावयास पाहिजे. विद्यार्थ्यांनी चाळीचाळीत जाऊन जनतेचे अज्ञान आणि या समजुती दूर केल्या पाहिजेत. तरच आपल्या शिक्षणाचा जनतेला काहीतरी लाभ होईल. आपण आपल्या बांधवांनी सुधारणा प्रगती करण्याकरिता केला पाहिजे, तरच भारत उन्नतावस्थेला जाईल. तसेच ते प्राथमिक शिक्षणाबद्दल म्हणतात,

'सध्याच्या युगात ज्या देशातील बहुजन समाज निरक्षर आहे, अशा देशांचा जीवन कलहात टिकाव लागावयाचा नाही. हे सांगावयास नकोच. प्राथमिक शिक्षणाचा सार्वजनिक प्रसार सार्वजनिक राष्ट्रीय प्रगतीचा इमारतीचा पाया आहे. त्यासाठी प्राथमिक शिक्षणाला सक्तीचा कायदा करावा लागेल. आघाडीत आलेल्या जगातील सर्व देशांनी सक्तीचा कायदा करूनच लोकांची निरक्षरता हद्दपार केली आहे असे आपणास दिसून येते.'

डॉ. आंबेडकर राष्ट्रीय संपत्तीच्या अनुषंगाने म्हणतात, राष्ट्रातील संपत्तीचा उपयोग दरिद्री आणि गरीब जनतेस जखडून ठेवण्यासाठी होता कामा नये, ती देशातील आपत्ती ठरेल. दुसरीही बाब महत्त्वाची आहे ती अशी की, दरिद्री व गरीब जनतेचे शोषण करून संपत्ती वाढविण्याचा प्रयत्न झाल्यासच तो मार्ग असुरी ठरेल. यातून डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रीय संपत्तीचा मूलगामी विचार स्पष्ट होतो.

भारतीय राज्यघटनेमध्ये लोकशाही शासन प्रणाली स्वीकारण्यात आली आहे. एक व्यक्ती-एक मत आणि एक मूल्य हे सूत्र भारतीय व्यवस्थेमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधूता व न्याय या मूल्यांच्या आधारे अंगीकृत करण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत घालून दिले. यातून समताधिष्ठित समाज लोकशाही समाजव्यवस्थेत अभिप्रेत आहे. लोकशाहीमध्ये मानवी मूल्यांची प्रतिष्ठा महत्वाची असते. राजकीय लोकशाहीतील महान अडसर आहे. असा इशाराही डॉ. आंबेडकर देतात. आजच्या प्रस्तुततेत डॉ. आंबेडकरांचे राजकारणातील विभूतीपूजा याबद्दलचे विचार हा शाश्वत विकासातील अडसर ठरतो की काय, याबद्दल शंका उपस्थित होत आहे.

२० जुलै १९४२ साली नागपूरला दलित स्त्रियांची परिषद सभा आयोजित करण्यात आली होती, त्या सभेला उद्देशून डॉ. आंबेडकर म्हणाले, स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मोजत असतो. याच भाषणात त्यांनी लग्नाच्या मुलींसाठी उपदेश दिला, लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची मैत्रीण म्हणून त्याच्या प्रत्येक कार्यात सहकार्य द्यावे, मात्र गुलामाप्रमाणे वागविल्यास तिने खंबीरपणे नकार द्यावा व समतेसाठी आग्रह धरावा, यावरून डॉ. आंबेडकरांनी कोणत्याही समाजातील स्त्रीसह सर्व प्रकारचा वंचिताचा दर्जा हा त्या समाजाच्या मापदंड असतो असे गृहित धरलेले आहे.

शिक्षण स्वातंत्र्याची प्रेरक शक्ती आहे असे सांगताना डॉ. आंबेडकर म्हणतात, 'हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाचे किती महत्व आहे हे मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते. पण ही मोठी चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्यांच्या अन्न, वस्त्र व निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणेच त्यांना उच्च वर्गाची सेवा करावयास लावणे नव्हे, खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागेल, तो न्यूनगंड त्यांच्यापासून नाहिसा करणे, चालू समाजपध्दतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले त्याचे त्यांच्या स्वत:च्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्त्व आहे याची त्यांना

जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेच हे साध्य होणार नाही. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर माझ्या मताप्रमाणे हेच औषध आहे.' डॉ. आंबेडकरांच्या या उद्गारातून त्यांचे शिक्षणविषयक सूत्र स्पष्ट होते.

शैक्षणिक सवलतीच्या धोरणाबाबत डॉ. आंबेडकर म्हणतात, 'दोन मानसे सदृढ असतील तर एखाद्याला मलिदा व दुसऱ्याला कोंडा तर रोग्याला मलिदा हीच व्यवस्था प्रशस्त ठरेल.' असमानता समान पातळीवर आणावयाचे असेल तर असमानांना विशेष सवलती दिल्या पाहिजेत ही आंबेडकरांची अपेक्षा आहे.

विकास म्हणजे आर्थिक उन्नती नव्हे तर त्याबरोबर सामाजिक परिवर्तन हा बदल व्यक्तीच्या व्यक्तिमत्वातील महत्वाचा बदल आहे. तो अधिक मूलगामी असल्याचे डॉ. आंबेडकरांच्या विविध ग्रंथ, पुस्तके व भाषणे यातून स्पष्ट होते. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक परिवर्तन किंवा बदल हाच राष्ट्रीय विकास आहे. हेच आपल्या पत्रकारितेतून स्पष्ट मांडले आहे. डॉ. आंबेडकर यांनी पत्रकारितेतून स्पृश्य आणि अस्पृश्य लोकांना सामाजिक उन्नतीबरोबर सामाजिक संबंध सुधारून सामाजिक परिवर्तनातील मूलगामी बदल मानला. लोकांच्यात ज्ञान आणि जाणिवा निर्माण करण्याची क्षमता डॉ. आंबेडकरांच्या साहित्यातील विकास संकल्पातून निर्माण होते.

डॉ. आंबेडकर यांनी विधायक व समतेच्या तत्वावर अधिष्ठीत असे नवे बदल करण्याचे हेतूने व आदर्श समाज रचनेची संकल्पना व राजकीय विकास शाश्वत करण्याच्या अनुषंगाने आपले जीवन समर्पित केलेले आहे. डॉ. आंबेडकर घटना तज्ञ, राजकीय विचारवंत, अर्थशास्त्रज्ञ, इतिहासकार, कायदेतज्ञ, पत्रकार, संपादक, समाजशास्त्रज्ञ याचबरोबर ते एक विकास तज्ञ तथा विकास पुरुष होते. राजकीय बांधणीच्या अनुषंगाने विकास हा भौतिकदृष्ट्या असो वा जैविक दृष्ट्या असो यातूनच त्यांनी राजकीय विकासाला अनुक्रम दिला आहे. समाज उन्नतीतून राष्ट्रीय विकास साधताना माणसाला माणूसपण मिळवून देण्यासाठी माणूस हा केंद्रबिंदू मानून डॉ. आंबेडकर यांनी शाश्वत विकासातून त्यांच्या समता, बंधूता व न्याय मूल्यांची मांडणी करून मानव आणि राष्ट्राच्या हितासाठी योगदान दिले.

## ४.३ सारांश

'व्हाईस ऑफ अमेरिका' ह्या संस्थेने योजिलेल्या एका संवादमालिकेत 'भारतातील लोकशाहीचे भवितव्य' ह्या विषयावरील भाषणात डॉ. आंबेडकर म्हणतात, 'लोकशाही म्हणजे प्रजासत्ताक किंवा संसदीय सरकार नव्हे. लोकशाहीची मुळे सरकारी पध्दतीत, संसदीय किंवा दुसऱ्या कोणत्याही पध्दतीत नसतात. लोकशाही म्हणजे सहजीवनाने राहण्याची एक पध्दती. लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधात शोधावयाची असतात. जे लोक तो समाज बनवतात त्यांच्या सहजीवनाच्या संदर्भात तिची

मूळे शोधावयाची असतात. हिंदी समाज हा जातिभेदावर अधिष्ठित आहे, आणि जाती या अलग असतात. भारतातील मतदान आणि उमेदवारांची निवड ही जातिनिष्ठेनेच करण्यात येते. उद्योगधंद्यात उद्योगपतींचे जातभाई मोठ्या अधिकाराच्या जागा बळकावतात. मोठमोठे व्यापारी घराणी हे एकाच जातीचे संघ आहेत. धर्मादाय पध्दतीसुध्दा जातिनिष्ठ आहे. जातिसंस्था ही तिरस्काराची उतरंड आहे. जात आणि धर्म यांत फरक असा आहे की, जाती पध्दतीत जितका अलगपणा असतो तितका वर्ण पध्दतीत नसतो.

पुणे जिल्हा विधी वाचनालयाच्या नवीन विभागाचे उद्घाटन डॉ. आंबेडकरांच्या हस्ते २२ डिसेंबर १९५२ रोजी पुणे येथे झाले. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी लोकशाही यशस्वी रीतीने चालण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, या विषयावर भाषण दिले. ते म्हणाले, 'लोकशाही आपले स्वरूप बदलत आहे. एकाच देशात ती आहे त्या परिस्थितीत राहू शकत नाही. तिचे उद्देश बदलत असतात. आधुनिक लोकशाहीचे ध्येय हे एखाद्या अनियंत्रित राजाचे अधिकार कमी करणे नसून लोकांचे कल्याण साधणे हे आहे.'

## ४.४ पारिभाषिक शब्द

- **उदारमतवाद :** सहिष्णूता
- **दृष्टिकोन :** अभ्यासकाची विषयाकडे पहाण्याची पध्दत
- **व्यवस्था :** अनेक घटकांनी मिळून बनलेली एक कार्यात्मक रचना
- **राज्यघटना :** राज्यकारभार करण्यासंबंधी कायद्यांचा व नियमांचा संग्रह
- **मानवी हक्क :** माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक असणारे हक्क

## ४.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१. राज्य समाजवादाची संकल्पना कोणी मांडली?

२. डॉ. आंबेडकरांच्या मते, राजकीय लोकशाहीला कशाची जोड दिली आहे?

३. डॉ. आंबेडकर यांनी कोणत्या ग्रंथात राजकीय लोकशाहीचा पुरस्कार केला आहे?

४. सामाजिक न्यायाशिवाय कोणती लोकशाही परिपूर्ण होऊ शकत नाही, असे आंबेडकरांचे मत होते?

५. उदारमतवादाचा उदय कशातून झाला?

## ४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर*

२. *सामाजिक-आर्थिक लोकशाही*

३. *स्टेट अ‍ॅण्ड मायनॉरिटीज*

४. *सामाजिक*

५. *उदारमतवादाचा उदय व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करणाऱ्या दडपशाही शक्तींना विरोध करणाऱ्या प्रवृत्तीतून झाला.*

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

❐ **दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. डॉ. बी. आर. आंबेडकर यांची यशस्वी लोकशाहीची संकल्पना स्पष्ट करा.

२. डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा लोकशाहीविषयक दृष्टीकोन लिहा.

३. डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे पाश्चात्त्य उदारमतवादी लोकशाहीवरील विवेचन आणि टीका लिहा.

४. डॉ. बी. आर. आंबेडकरांची सामाजिक लोकशाही म्हणजे काय ते सांगून तिचे स्वरूप स्पष्ट करा.

५. विकासाबाबत डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे विचार स्पष्ट करा.

❐ **टिपा लिहा.**

अ) उदारमतवादी लोकशाही संकल्पना

ब) आर्थिक लोकशाही स्वरूप

क) राज्य-समाजवाद संकल्पना

ड) लोकशाहीचा अर्थ

इ) विकास संकल्पना

## ४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **कीर धनंजय :** *''डॉ. बाबासाहेब आंबेडकर''*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

२. **प्रा. जोंधळे अनिल :** *''प्रखर देशभक्त आणि राष्ट्र निर्माते डॉ. आंबेडकर''*, प्रबुध्दभारत पुस्तकालय आणि प्रकाशन व्यवसाय, नागपूर.

३. **प्रा. देशपांडे म. द. :** *''डॉ. आंबेडकर यांचे राजकीय विचार''*, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

४. **कसबे रावसाहेब :** *''आंबेडकर आणि मार्क्स''*, सुगावा प्रकाशन, पुणे.

५. **कसबे रावसाहेब :** *''आंबेडकरवाद''*.

६. **गायकवाड सुर्यकांत :** *''डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भाषावार प्रांत रचना''*, प्राजक्त पब्लिकेशन, पुणे.

७. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ.**

८. **जातपात तोडक मंडळ,** लाहोर सन १९३६ च्या वार्षिक अधिवेशनाकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेले भाषण.

९. **डॉ. आगलावे प्रदीप :** *''समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर''*, सुगावा प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च २००१.

१०. ***Omveat Gail*** : *"Dalits and the Democratic Revolution in Colonial India", Sage Publication, New Delhi.*

११. ***Kavlekar K. K. and Chousalkar A. S.*** : *"Political Indeas and Leadership of Dr. B. R. Ambedkar", Vishwanil Publication, Pune.*

१२. ***Gore M. S.*** : *"Social context of an Rdeology : Political & Social Thought of Dr. Ambedkar", Sage Publication, New Delhi.*


❑ ❑ ❑